
'माझे जीवन हाच माझा संदेश'

# गांधीजींचे जीवन त्यांच्याच शब्दांत



माझे जीवन हाच माझा संदेश

# गांधीजींचे जीवन-त्यांच्याच शब्दांत

संग्राहक आणि संपादक

**कृष्ण कृपालानी**

अनुवादक

**ब्रिजमोहन हेडा**

पहिली आवृत्ती, जुलै २००६

ISBN: 978-81-7229-354-3

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org | Website : www.navajivantrust.org

# प्रकाशकाचे निवेदन

युनेस्कोने (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल साइंटिफिक कल्चरल ऑरगनाईझेशन) जगाच्या आजच्या विषम परिस्थितीत गांधीजींचे जीवन, त्यांचे कार्य आणि त्यांचा संदेश यांचा परिचय करवून देण्याच्या दृष्टीने 'ऑल मेन आर ब्रदर्स' नावाचा एक इंग्रजी संग्रह प्रकाशित केला. त्यात त्यांच्या आत्मकथेचा मुख्य भाग आणि इतर लेखांतील महत्त्वपूर्ण उद्गार यांचा समावेश करण्यात आला आहे. या संग्रहाची रचना अशा प्रकारे करण्यात आली आहे की गांधीजींचे विशाल साहित्य न वाचू शकणाऱ्या वाचकालाही या संग्रहाद्वारे गांधीजींचे कार्य, त्यांची कार्यपद्धती आणि त्यांचे विचार यांचा परिचय व्हावा. हा संग्रह फ्रेंच आणि स्पॅनिश भाषेतही प्रकाशित झालेला आहे.

नवजीवनने या इंग्रजी संग्रहाची भारतीय आवृत्ती हिंदी आणि गुजराती भाषेत प्रकाशित केली आहे. या तिन्ही भाषांमधील संग्रहांचे जनतेने चांगले स्वागत केले आहे आणि आतापर्यंत याच्या तीन-तीन आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत.

ही लहानशी पुस्तिका 'गांधीजींचे जीवन - त्यांच्याच शब्दात' युनेस्को द्वारे प्रकाशित 'ऑल मेन आर ब्रदर्स'चे पहिले प्रकरण आहे. यातून गांधीजींच्या जन्मापासून तर ३० जानेवारी १९४८ला त्यांचा मृत्यू होण्याच्या २० तास आधीपर्यंतचे जीवन आणि विचार सामावलेले आहेत. या अत्यंत संक्षिप्त आणि तरीही सर्वांगीण संग्रहाचे संपादन श्री कृष्ण कृपलानी यांनी केले आहे. हा लघुसंग्रह प्रकाशित करण्याची त्यांनी आम्हांला परवानगी दिली, याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहो.

सर्वसामान्य जनतेत आणि विशेषत: तरुण पिढीत गांधीजींबद्दल अधिक जाणून घेण्याची जी जिज्ञासा निर्माण झाली आहे ती शमवण्याच्या दृष्टीने 'गांधीजींचे जीवन - त्यांच्याच शब्दात' नावाची ही लहानशी पुस्तिका आलेल्या खर्चावर जनतेला उपलब्ध करून देण्यात येत आहे. आशा आहे मराठी भाषिक वाचक या पुस्तिकेचे स्वागत करतील.

# संदर्भसूत्र

**अखेरचं पर्व** – महात्मा गांधी - अखेरचं पर्व लेखक प्यारेलाल, प्रकाशक : पराग एजंसीज, अकोला, खंड १ ते ४. आवृत्ती २००४

आत्म. – सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, गांधीजी : नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १४, आवृत्ती २००५

यं.इं. - यंग इंडिया, गांधीजींच्या संपादकत्वाखाली अहमदाबादहून निघणारे इंग्रजी साप्ताहिक. (१९१९ ते १९३२)

हिं.न. - हिंदी नवजीवन (१९२१-३२) संपादक : गांधीजी.

ह.से. - हरिजनसेवक, हिंदी साप्ताहिक, (१९३३-५६), संस्थापक महात्मा गांधी.

क.व.म.गां – कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, प्रकाशक दक्षिण आफ्रिका पब्लिकेशन डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ इंन्फर्मेशन अॅन्ड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, खंड १, १९५८

मो.क.गां. - महात्मा - लाईफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी, खंड १ ते ८, १९५४, डी. जी. तेंडुलकर, प्रकाशक : विठ्ठलभाई के. झवेरी, आणि डी. जी. तेंडुलकर, मुंबई, ६. आवृत्ती – या पुस्तिकेच्या संदर्भाकरिता उपयोगात आणली गेलेले खंड १, २ - १९५१, खंड ३, ४, ५ - १९५२, खंड ६, ७ - १९५३, खंड ८ – १९५४

ला.फे. - लास्ट फेज - प्यारेलाल, खंड १ आणि २. प्रकाशक : नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, १४, आवृत्ती : खंड १ - १९५६, खंड २ - १९५८.

मा.म.गां. - दक्षिण आफ्रिका माईंड ऑफ महात्मा गांधी, आर. के. प्रभू आणि यु. आर. राव, प्रकाशक : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन. आवृत्ती १९४५.

# गांधीजींचे जीवन - त्यांच्याच शब्दांत

१ मला कुठे आत्मकथा लिहायची आहे ? सत्याचे जे अनेक प्रयोग मी केले होते त्यांची कहाणी या आत्मकथेच्या निमित्तानं मला लिहायची आहे. या प्रयोगांमध्ये मी आकंठ बुडालेलो असल्यामुळे ही कहाणी माझे जीवन-चरित्र बनेल. या कहाणीच्या प्रत्येक पानावर जर त्या प्रयोगांची अभिव्यक्ती झाली तर मी ती निर्दोष आहे असंच मी समजेन. *आत्म. प्रस्ता. ६.*

२ राजकारणाच्या क्षेत्रातील माझ्या प्रयोगांची कल्पना आता संपूर्ण भारताला आहे. एवढंच नाही तर सुसंस्कृत म्हणवल्या जाणाऱ्या जगालाही त्याची थोडीफार माहिती आहे. माझ्या या प्रयोगांचं मूल्य अत्यल्प आहे आणि त्यामुळेच या प्रयोगांमुळे मला 'महात्मा' म्हणून जी पदवी मिळाली आहे तिचेही मूल्य अत्यल्प आहे. या विशेषणाने अनेकदा तर मला अतिशय दुःख दिलं आहे. या विशेषणामुळे मी फुगलो असेन असा एकही क्षण मला आठवत नाही. परंतु माझ्या आध्यात्मिक प्रयोगांचं, ज्यांची मलाच माहिती आहे आणि ज्यांच्यामुळे माझ्या राजकीय शक्तीचाही जन्म झाला आहे, वर्णन करणं मला नक्कीच आवडेल. हे प्रयोग जर खरोखरच आध्यात्मिक असतील तर यांच्याबद्दल गर्व करण्यासारखं काहीच असू शकत नाही. यांच्यामुळे तर नम्रपणाच वृद्धिंगत होऊ शकतो. जसजसा मी विचार करत जातो तसतशी मला माझ्या अपूर्णतेची जाणीव होऊ लागते. *आत्म. प्रस्ता. ६.*

३ मला जे करायचं आहे, तीस वर्षांपासून ज्याचा मी सदैव जप करत असतो ते आत्मदर्शन आहे, ईश्वराचा साक्षात्कार आहे, मोक्ष आहे. माझी सर्व कामे याच दृष्टीनं होत असतात. माझे सर्व लेखनही याच दृष्टीनं होत असतं. राजकारणाच्या क्षेत्रातील माझा प्रवेशही याच ध्येयामुळे झाला आहे. पूर्वीपासूनच माझे मत आहे की जे एकासाठी शक्य आहे ते सगळ्यांकरिता शक्य आहे. यामुळेच माझे प्रयोग खाजगी नव्हते, तसे राहिलेही नाहीत. सर्वांना ते दिसू शकले तर त्यांच्यातील आध्यात्मिकता प्रभावित होईल असं मला वाटत नाही. हे मात्र खरे आहे की काही गोष्टी ज्यांना आपला आत्माच ओळखू शकतो व ज्या आत्म्यातच सामावून जात असतात. परंतु असं काही

देणं माझ्या शक्तीपलीकडील आहे. माझ्या प्रयोगातील आध्यात्मिकतेचा अर्थ आहे नैतिकताः धर्माचा अर्थ आहे नीती. आत्म्याच्या दृष्टिकोनातून आचरली गेलेली नीती म्हणजेच धर्म.

*आत्म. प्रस्ता. ६-७.*

४ माझे प्रयोग परिपूर्ण आहेत असा माझा दावा नाही. एखादा वैज्ञानिक ज्याप्रमाणे आपले प्रयोग अतिशय पद्धतशीर रीतीने विचारपूर्वक आणि सूक्ष्म रीतीने करत असूनही त्यापासून काढलेली अनुमाने अखेरची आहेत असं तो सांगत नाही, किंवा त्या प्रयोगाचे हेच निष्कर्ष निर्विवाद आहेत याबद्दल तो साशंक जरी नसला तरी तटस्थ अवश्य असतो. माझ्या प्रयोगांसंबंधी तशाच त-हेचं माझेही म्हणणे आहे. मी भरपूर आत्मपरीक्षण केलं आहे, एकूणएक भावना तपासली आहे, तिचे पृथक्करण केले आहे. परंतु तिच्यातून निघालेली अनुमाने सर्वांच्याच बाबतीत अंतिम आहेत अथवा ती खरी आहेत वा तीच तेवढी खरी आहेत असा दावा मी करण्याचा माझी इच्छा कधीच नव्हती. होः एवढं मात्र मी नक्कीच म्हणतो की ती माझ्या दृष्टीनं खरी आहेत आणि या वेळी तरी ती अंतिम आहेत असेच वाटते. असे जर वाटणार नसेल तर त्यांच्या आधारे कोणत्याच कार्याची उभारणी मी करू नये. परंतु पदोपदी ज्या गोष्टी समोर येतील त्यांचे ग्राह्य आणि अग्राह्य असे दोन वर्ग पाडतो आणि ग्राह्य मानलेल्या गोष्टीला अनुरूप असे स्वतःचे वर्तन निश्चित करतो.

*आत्म. प्रस्ता. पृष्ठ ६*

५ माझे जीवन संपूर्ण, अखंड आणि अविभाज्य आहे. आणि माझी सर्व कामे एकमेकांशी जुळलेली आहेत. संपूर्ण मानवजातीबद्दल मला वाटणाऱ्या प्रेमातून, ज्याची तृप्ती कधीच होऊ शकत नाही, त्यांचा जन्म होत असतो.

*सिलेक्शन्स. ४५.*

६ पूर्वी गांधी कुटुंब किराणा मालाचा व्यापार करणारे असावे असे समजते. परंतु माझ्या आजोबांपासून गेल्या तीन पिढ्यांपासून ते दिवाणगिरी करत आले आहे. उत्तमचंद गांधी उर्फ ओता गांधी दृढनिश्चयी असावेत असे दिसते. राजकारणातील डावपेचांमुळे त्यांना पोरबंदर सोडावे

लागले आणि त्यांनी जुनागढच्या राज्याचा आश्रय घेतला. तिथे त्यांनी नबाबसाहेबांना डाव्या हाताने सलाम केला. उघड दिसणाऱ्या या उद्धटपणाचे कारण काय असे कोणी तरी विचारले तेव्हा उत्तर मिळाले : 'उजवा हात तर पोरबंदरला समर्पित झालेला आहे.' *आत्म. पृष्ठ १*

७ माझे वडील कुटुंबप्रेमी, सत्यप्रिय, शूर आणि उदार असले तरी ते संतापी होते. कदाचित ते थोडेसे विषयासक्तही असावे. त्यांचा अखेरचा विवाह (चौथा) वयाच्या चाळीशीनंतर झाला असावा. ते लाचखोरीपासून दूर पळणारे होते आणि त्यामुळे ते शुद्ध न्याय देत असत अशी आमच्या कुटुंबात आणि बाहेरही धारणा होती. *आत्म. पृष्ठ ३.*

८ माझी आई साध्वी स्त्री होती असा ठसा माझ्या मनावर उमटलेला आहे. ती फार भाविक होती. पूजापाठ केल्याशिवाय ती जेवत नसे. ती हवेलीत (वैष्णव मंदिर) नियमितपणे जात असे.... ती कठीणातकठीण व्रत घेई आणि ते निर्विघ्नपणे पार पाडत असे. आजारी पडली तरी ती घेतलेलं व्रत सोडत नसे. *आत्म. पृष्ठ ४.*

९ या आईवडलांच्या पोटी पोरबंदर इथे माझा जन्म झाला होता.... माझे बालपण पोरबंदरातच गेले होते. कोणत्या तरी शाळेत मला टाकण्यात आले होते असे मला आठवते. कसेबसे काही पाढे मी तिथे शिकलो. इतर मुलांसोबत आपल्या शिक्षकांना शिव्या द्यायला मी शिकलो होतो एवढेच मला आठवते. यावरून मी मंद बुद्धीचा असेन आणि माझी स्मरणशक्ती दुबळी असावी असा माझा अंदाज आहे. *आत्म. पृष्ठ ५.*

१० मी अतिशय लाजाळू मुलगा होतो. शाळेत मी आपल्या कामाशीच काम ठेवत असे. घंटा व्हायच्या वेळी मी शाळेत पोहोचत असे आणि शाळा सुटताच घरी पळ काढत असे. कुणाशीच गप्पा मारणं मला आवडत नसल्यामुळे 'पळ काढणे' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे. कोणी माझी थट्टा तर करणार नाही ना अशी भीतीही त्याचबरोबर मला वाटत असे.

*आत्म. पृष्ठ ५.*

११ हायस्कूलमधील पहिल्याच वर्षी घडलेली एक घटना उल्लेखनीय आहे. शाळा खात्याचे इन्स्पेक्टर जाईल्स शाळेची तपासणी करण्याकरिता आले होते. पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांनी पाच इंग्रेजी शब्द लिहायला सांगितले. त्यातील एक शब्द 'kettle' होता. मी त्याची वर्णरचना चुकीची केली होती. शिक्षकांनी आपल्या बुटाची ठोकर मारून मला सावध इशारा केला. परंतु तो इशारा मला काही केल्या कळेना. जवळच्या मुलाच्या पाटीवर पाहून माझे शुद्धलेखन मास्तर मला दुरुस्त करायला सांगतील हे माझ्या ध्यानीमनीही येऊ शकत नव्हते. सर्व मुलांनी पाच शब्द अचूक लिहिले. एकटा मीच मूर्ख निघालो ! माझा मूर्खपणा शिक्षकांनी नंतर मला समजावून सांगितला. परंतु माझ्या मनावर त्या समजावून सांगण्याचा काहीही परिणाम झाला नाही. दुसऱ्या मुलाच्या पाटीवरून चोरून पाहून लिहिणे मी कधीही शिकू शकलो नाही. *आत्म. पृष्ठ ६.*

१२ तेराव्या वर्षीच माझे लग्न झालं झालं होतं हे सांगताना मला फार खेद होतो. बारातेरा वर्षांची मुले आज माझ्या डोळ्यासमोर येतात. त्यांना जेव्हा मी पाहतो आणि माझी गोष्ट मला आठवते तेव्हा मला स्वतःबद्दलच कीव वाटू लागते, आणि माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगासारख्या प्रसंगातून वाचल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे असे मला वाटू लागते. तेराव्या वर्षी विवाह करण्याच्या समर्थनार्थ एकही नैतिक युक्तिवाद मला सुचू शकत नाही. *आत्म. पृष्ठ ७.*

१३ चांगले कपडे वापरायला मिळतील, वाजंत्री वाजवतील, वरात निघेल, सुग्रास भोजन मिळेल, एका नव्या मुलीबरोबर खेळता येईल वगैरे हौसेपलीकडे त्या वेळी माझ्या मनात दुसरे काही असल्याचे स्मरत नाही. *आत्म. पृष्ठ ८-९.*

१४. आणि ती पहिली रात्र ! दोन निर्दोष बालकांनी अजाणता संसारसागरात प्रवेश केला ! मी पहिल्या रात्री कसे वागावे त्याची वहिनींनी शिकवण दिली होती. धर्मपत्नीला कोणी शिकवण दिली होती ते विचारून घेतल्याचे मला स्मरत नाही. अजूनही विचारता येईल, परंतु विचारण्याची इच्छादेखील होत नाही. आम्ही दोघे एकमेकांना घाबरत होतो ही गोष्ट वाचकांनी लक्षात घ्यावी. एकमेकांना लाजतही होतो. कसं बोलावं, काय बोलावं ते मला कुठे माहीत होतं ? मिळालेल्या

शिकवणुकीचीसुद्धा यात काय मदत होऊ शकत होती ? परंतु यासंबंधात शिकवणुकीची काय खरोखरच गरज आहे ? जिथे संस्कारच बलवान असतात तिथे मिळालेली शिकवण अनावश्यक ठरते.... हळूहळू आम्ही परस्परांना ओळखू लागलो. आपसात बोलू लागलो. आम्ही दोघे समवयस्क होतो. परंतु मी लवकरच पतीची सत्ता गाजवायला सुरुवात केली. *आत्म. पृष्ठ १०.*

१५ मला सांगितले पाहिजे की मी माझ्या पत्नीच्या बाबतीत विषयासक्त होतो. शाळेतही माझ्या मनात तिचे विचार येत राहायचे. केव्हा रात्र होते आणि केव्हा आम्ही भेटतो असा विचार मनात सदैव सुरूच असायचा. विरह असह्य व्हायचा. माझ्या रिकाम्या बडबडीने मी तिला झोपू देत नसे. या आसक्तीबरोबर माझ्यात कर्तव्यपरायणता नसती तर व्याधिग्रस्त होऊन मी मृत्युवश झालो असतो वा या जगात भार बनून मी राहिलो असतो. 'सकाळ होताच नित्यक्रमाला लागवेच लागायचं. कुणाला फसवता येऊ शकत नव्हते'. माझ्या या विचारांमुळे मी अनेक संकटांतून वाचलो आहे. *आत्म. पृष्ठ ११-१२.*

१६ मला असं आठवते की माझ्या हुशारीबद्दल मला कोणताच गर्व नव्हता. बक्षीस अथवा शिष्यवृत्ती मिळाली की मला आश्चर्य होत असे. परंतु माझ्या आचरणासंबंधी मी फार जागृत होतो. आचरणात थोडीशीही उणीव निघाली की मला रडू येई. शिक्षकांना मला रागवावे लागणे वा त्यांचे तसे मत होणे मला असह्य होत असे. मला आठवतं की एकदा मला मार खावा लागला होता. मला मार खावा लागला याचं मला दुःख नव्हतं तर मी शिक्षेला पात्र आहे असं समजलं गेलं याचं मला दुःख होतं. मी खूप रडलो. *आत्म. पृष्ठ १३.*

१७ हायस्कूलमध्ये अगदी जवळचे विश्वासपात्र मित्र थोडेसेच होते. अशी मैत्री असलेले दोन मित्र वेगवेगळ्या वेळी मला होते.... माझ्या जीवनातील एक दुःखद प्रकरण आहे. ही मैत्री अनेक वर्षे राहिली. ही मैत्री निभावण्यामागे माझी दृष्टी सुधारकाची होती. *आत्म. पृष्ठ १७.*

१८. नंतर माझ्या लक्षात आलं की माझा अंदाज बरोबर नव्हता. सुधारणा करण्याकरिताही माणसाने आपल्या शक्तीपलीकडे खोल पाण्यात उतरता कामा नये. ज्याची सुधारणा करायची

असते त्याच्याशी मैत्री होऊ शकत नाही. मैत्रीत अद्वैत भावना असते. जगात अशी मैत्री क्वचितच आढळते. समान गुण असलेल्या लोकांमधील मैत्रीच शोभत असते व तीच टिकाऊही असते. परस्परांना प्रभावित केल्याशिवाय मित्र राहूच शकत नाहीत. त्यामुळे मैत्रीत सुधारणेला फार कमी वाव असतो. माणूस गुणांपेक्षा दोष लवकर लवकर स्वीकारत असल्यामुळे घनिष्ठ मैत्री अनिष्ट असते असं माझं मत आहे. गुणग्रहणाकरिता प्रयत्नांची गरज असते. ज्याला आत्म्याची, ईश्वराची मैत्री संपादन करायची असेल त्याने एक तर एकाकी राहायला पाहिजे अथवा संपूर्ण जगाशी त्याने मैत्री करायला पाहिजे. वरील विचार चूक असो अथवा बरोबर परंतु घनिष्ट मैत्रीचा माझा प्रयत्न विफल राहिला. *आत्म. पृष्ठ १७-१८.*

१९ या मित्रांचे पराक्रम पाहून मी मुग्ध होत असे. ते वाटेल तितके धावू शकत असत. त्यांचा वेगही उत्तम होता. ते खूप लांब आणि उंच उडी मारू शकत असत. मार सहन करण्याची त्यांची शक्तीही तशीच होती. या शक्तीचे ते माझ्यासमोर वारंवार प्रदर्शन करत असत. आपल्यात नसलेली ही शक्ती इतरांत असलेली पाहून माणसाला आश्चर्य वाटणारच. माझेही तसेच झाले. आश्चर्यातून मोह उद्भवला. माझ्यात धावण्या वगैरेची शक्ती नाही सारखीच होती. या मित्रांप्रमाणेच मी बलवान झालो तर किती चांगले असा विचार मी करू लागलो ! *आत्म. पृष्ठ १८.*

२० मी फार भित्रा होतो. चोर, भूत, साप इत्यादींच्या भीतीने मी पछाडलेला असे. या भीतीचा मला त्रासही खूप होत असे. रात्री एकट्याने कुठे जाण्याची हिंमत होईना. अंधारात तर मी कुठे जातच नसे. दिव्याशिवाय झोपणं जवळपास अशक्य होतं. इकडून भूत आले तर ? तिकडून चोर आला तर ? तिसरीकडून सर्प आला तर ? यामुळे दिव्याची गरज तर असायचीच.

*आत्म. पृष्ठ १९.*

२१ ही माझी दुर्बलता माझ्या या मित्रांना माहीत होती. जिवंत साप मी हाताने पकडू शकतो, चोरांना मी कधीच घाबरत नाही, भुताखेतांवर माझा विश्वास नाही असे तो मला सांगत असे. हा सर्व परिणाम मांसाहाराचा आहे ही गोष्ट त्यांनी माझ्या मनावर ठसवली. *आत्म. पृष्ठ १९.*

२२ या गोष्टींचा माझ्या मनावर भरपूर परिणाम झाला.... मांसाहार चांगला असे मला वाटू लागले. त्यामुळे मी बलवान आणि साहसी बनेन. संपूर्ण देश मांसाहार करील तर इंग्रजांना हरवता येऊ शकते. *आत्म. पृष्ठ १९.*

२३ असे जेवण जेव्हा केव्हा होत असे तेव्हा घरी जेवणं तर शक्यच होत नसे. आई जेवणाकरिता बोलवायची तेव्हा 'मला भूक नाही, माझे पोट ठीक नाही' अशा सबबी मला सांगाव्या लागायच्या. असे सांगताना दरवेळी मला मोठा धक्का बसत असे. एवढे असत्य आणि तेही आईसमोर ! मुले मांसाहारी झाली आहेत असे जर आईवडलांना कळले असते तर त्यांच्यावर वीजच कोसळल्याप्रमाणे झाले असते. हे विचार माझ्या हृदयाला घरे पाडत असत.

म्हणून मी निश्चय केला : मांसाहार हा चांगला असला व त्याचा प्रचार करून हिंदुस्थानला सुधारता येईल असे मला वाटत असले तरी खोटे बोलून आईवडलांना फसवणे हे त्याहूनही वाईट आहे व त्यामुळे यापुढे मांसाहार करायचा नाही असा निश्चय मी केला.

माझा हा निर्णय मी मित्रांना सांगितला आणि तेव्हापासून मांसाहार जो सुटला तो कायमचा सुटलाच. *आत्म. पृष्ठ २१.*

२४ एक वेळ हा मित्र मला वेश्यांच्या वस्तीत घेऊन गेला. योग्य सूचना देऊन एका बाईच्या घरात त्यांनी मला पाठवले. मला पैसे वगैरे काही द्यायचे नव्हते. हिशेब झालेला होता. मी घरात तर शिरलो खरा. परंतु ज्याला देवाला वाचवण्याची इच्छा असते तो पडू पाहत असला तरी पवित्र राहू शकतो. त्या खोलीत तर मी अगदी आंधळा झालेलो होतो. मला बोलण्याचेही भान नव्हते. शरमेने स्तब्ध होऊन त्या बाईपाशी मी खाटेवर बसलो. परंतु तोंडातून शब्दच निघेना. ती बाई संतापली आणि दोनचार शेलक्या विशेषणांचा अहेर करून मला दरवाजा दाखवला.

माझ्या मर्दुमकीला बट्टा लागला आणि धरतीमाता मला आपल्या पोटात घेईल तर बरे असेच त्यावेळी तरी मला वाटले. परंतु अशा रीतीने मला वाचवल्याबद्दल मी ईश्वराचे आभारच मानले आहेत. अशाच प्रकारचे चार प्रसंग माझ्या जीवनात अजून आलेले आहेत. त्यापैकी बहुतेक

प्रसंगी स्वतःच्या प्रयत्नाशिवाय, बाह्य संयोगामुळेच मी वाचलो असे म्हणता येईल. विशुद्ध दृष्टीने या सर्व प्रसंगी माझे पतन झाले. जेव्हा मी विषयाची इच्छा केली तेव्हाच मी विषय करून चुकलो असे म्हणावे लागेल. तरी पण इच्छा करूनही जो प्रत्यक्ष कर्मापासून बचावतो त्याला आपण लौकिक दृष्टीने बचावला असेच म्हणतो. या प्रसंगी एवढ्याच दृष्टीने मी वाचलो असे मानता येईल.

*आत्म. पृष्ठ २२.*

२५ ज्याप्रमाणे पतन न पावण्याचा प्रयत्न करत असतानाही मनुष्याचा अध:पात होतो असा अनेकदा अनुभव येतो, त्याचप्रमाणे कुमार्गाने जाण्याची इच्छा असूनही अनेक बाह्य संयोगांमुळे मनुष्य बचावून जातो ही पण अनुभवसिद्ध गोष्ट आहे. यात पुरुषार्थाला जागा किती आहे, दैवाला किती आहे, अथवा कोणत्या नियमांच्या नियंत्रणानुसार मनुष्याचा अध:पात किंवा बचाव होतो हे गहन प्रश्न आहेत. त्याचा उलगडा आजपर्यंत झाला नाही आणि कधी काळी तो होऊ शकेल की नाही हेही सांगता येणं कठीण आहे. *आत्म. पृष्ठ २३.*

२६ आम्हा नवराबायकोत काही मतभेद निर्माण होण्याकरिता ही मैत्रीही कारणीभूत होती. मी मागे सांगितलेच आहे की मी जसा प्रेमळ पती होतो तसाच संशयी पतीही होतो. या मित्राच्या खरेपणाबद्दल माझ्या मनात कोणताच संशय नसल्यामुळे माझ्या संशयी वृत्तीत भर पडली. या मित्राच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी माझ्या धर्मपत्नीला कितीतरी दु:ख दिलेले आहे. या हिंसेबद्दल मी स्वत:ला कधीच क्षमा केलेली नाही. अशी दु:खे हिंदू स्त्रीच सहन करत असेल. म्हणूनच स्त्रीला मी सहनशीलतेची मूर्तीच मानत असतो. *आत्म. पृष्ठ २२-२३.*

२७ या संशयी वृत्तीचा सर्वथैव नाश मला अहिंसेचे सूक्ष्म ज्ञान झाले तेव्हाच झाला; म्हणजे जेव्हा मी ब्रह्मचर्याचा महिमा समजलो, आणि हेही समजलो की पत्नी पतीची दासी नाही, तर त्याची सहचारिणी आहे, सहधर्मिणी आहे, दोघेही एक मेकांच्या दु:खांचे समान वाटेकरी आहेत आणि जितकी बरेवाईट करण्याची स्वतंत्रता पतीला आहे तितकीच स्त्रीला आहे. या

संशयग्रस्ततेच्या कालाचे स्मरण झाले म्हणजे मला माझा मूर्खपणा व विषयांध निर्दयता याविषयी संताप येतो, आणि मैत्रीच्या बाबतीतील मूढपणाची कीव वाटते. *आत्म. पृष्ठ २३.*

२८ सहाव्या-सातव्या वर्षापासून ते सोळाव्या वर्षापर्यंत मी शाळेत शिक्षण घेतले. परंतु शाळेत कोठेही धर्माचे शिक्षण मिळाले नाही. शिक्षकांपासून सहजपणे जे मिळू शकायला पाहिजे होते तेही मला मिळू शकले नाही असेही म्हणता येईल. परंतु तरीही वातावरणातून काहीना काही मिळतच राहिले. इथे धर्म या शब्दाचा व्यापक अर्थ घेतला पाहिजे. धर्म म्हणजे आत्मभान - आत्मज्ञान. *आत्म. पृष्ठ २९.*

२९. परंतु एक गोष्ट मनात रुजलेली आहे - हे जग नीतीच्या आधारावर टिकलेले आहे. सत्यामध्ये सर्व नीतीचा समावेश होतो. मग तर सत्याचा शोध केलाच पाहिजे. दिवसेंदिवस माझ्या दृष्टीने सत्याचा महिमा वाढत गेला. सत्याची व्याख्या अधिकाधिक विस्तृत होत गेली व अजूनही विस्तृत होत जात आहे. *आत्म. पृष्ठ ३२*

३० अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील सर्वात मोठा कलंक आहे असे मला वाटते. दक्षिण आफ्रिकेत आलेल्या कटू अनुभवातून या विचारांची प्रतीति मला झालेली नाही. एके काळी मी नास्तिक होतो हेही याचे कारण नाही. अनेक लोक समजतात त्याप्रमाणे ख्रिश्चन धर्मातील धार्मिक साहित्यातून मी हे विचार ग्रहण केले आहेत असे समजणे हीही तेवढीच मोठी चूक होईल. ज्यावेळी मी बायबल वाचले नव्हते वा ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांच्या संपर्कात आलेलो नव्हते तेव्हापासूनचे हे माझे विचार आहेत.

अगदी सुरुवातीला हा विचार माझ्या मनात आला त्या वेळी मी फार तर १२ वर्षांचा असेन. त्यावेळी उका नावाचा एक भंगी - अस्पृश्य आमच्या घरातील संडास साफ करायला यायचा. याला स्पर्श करणं का वाईट आहे आणि याला स्पर्श करण्यापासून मला नेहमी का अडवण्यात येते असे मी माझ्या आईला नेहमी विचारत असे. केव्हा केव्हा मी त्याला अचानक स्पर्श करत असे. त्यावेळी आंघोळ करण्याकरिता मला सांगण्यात येत असे. आज्ञाधारकपणाच्या स्वभावामुळे

जरी मी या आज्ञेचं पालन करत असे तरी हिंदू धर्माने अस्पृश्यतेला मान्यता दिली असणं असंभाव्य आहे असे म्हणून मी माझा विरोध नोंदवत असे. माझ्या आईवडलांचा मी कर्तव्यपरायण आज्ञाधारक मुलगा होतो. परंतु त्याचा मान राखत असताना या विषयावर मात्र आमचे भांडण होत असे. त्यांना स्पर्श करण्यात पाप आहे हा तुझा समज अगदी चुकीचा आहे हे मी माझ्या आईला स्पष्टपणे सांगितलं होतं. *यं.इं. २७-४-१९२१, पृष्ठ १३५.*

३१ १८८७ साली मी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो. *आत्म. पृष्ठ ३३.*

३२ पास झाल्यानंतर कॉलेजात जाऊन पुढे शिक्षण घ्यावे अशी वडील मंडळींची इच्छा होती. कॉलेज मुंबईतही होते आणि भावनगरलाही होते. भावनगरला खर्च कमी म्हणून तेथील शामळदास कॉलेजमध्ये जाण्याचे ठरले. तेथे मला काही समजेना. सर्वच कठीण वाटू लागले. अध्यापकांच्या व्याख्यानांमध्ये गोडीही वाटेना, आणि समजही पडेना. त्यात अध्यापकांचा दोष नव्हता. दोष माझ्या कच्चेपणाचा होता. त्यावेळचे शामळदास कॉलजचे अध्यापकच पहिल्या दर्जाचे समजले जात. पहिली सहामाही करून मी घरी आलो. *आत्म. पृष्ठ ३३.*

३३ कुटुंबाचे जुने मित्र व सल्लागार एक विद्वान व व्यवहारकुशल ब्राह्मण.... सुटीच्या दिवसात आमच्या घरी आले होते. आई आणि वडील भाऊ यांच्या गोष्टी सांगत असताना माझ्या शिक्षणासंबंधी त्यांनी चौकशी केली. मी शामळदास कॉलेजमध्ये आहे हे ऐकून ते म्हणाले, 'काळ बदललेला आहे.... तुम्ही त्याला विलायततेत पाठवले पाहिजे. केवलराम (मावजी दवेंचा मुलगा) म्हणतो की तिकडे शिक्षण सोपे आहे. तीन वर्षात शिकून परत येईल. खर्च पण चारपाच हजाराहून जास्त होणार नाही. तो नवा बॅरिस्टर आला आहे. तो पाहा की केवढ्या थाटात राहतो ! हवे असेल तर दिवाणगिरीचे पद त्याला आता मिळू शकेल. माझा तरी सल्ला आहे की तुम्ही मोहनदासला यंदाच विलायतेला पाठवून द्यावे.' *आत्म. पृष्ठ ३४.*

३४ माझ्या आईला काहीच सुचत नव्हते.... कोणी म्हणे तरुण मुले विलायततेत जाऊन बहकतात; कोणी म्हणे ते मांसाहार करतात; तर कोणी सांगत की दारूशिवाय तिथे चालायचेच

नाही. आईने हे सर्व मला सांगितले. मी म्हटले, “पण तुझा विश्वास नाही ? मी तुला फसवणार नाही; शपथ घेऊन सांगतो की मी तुला फसवणार नाही; शपथ घेऊन सांगतो की या तिन्ही वस्तूंपासून मी दूर राहीन. अशी जर भीती असती तर जोशीजींनी मला का जाऊ दिले असते ?” ....मांस, मदिरा आणि परस्त्रीसंग यापासून दूर राहण्याची मी प्रतिज्ञा केली. आईने मला जाण्याची परवानगी दिली. *आत्म. पृष्ठ ३४-३६.*

३५ शिकण्याकरिता लंडनला जाण्याच्या हेतूने निश्चित आकार घेतला, त्याआधीही विलायतेत जाऊन लंडनविषयीचे कुतूहल शांत करावे अशी माझी इच्छा होती.

*कं. व. ऑ. म. ग. पृष्ठ १ आणि ३.*

३६ वयाच्या अठराव्या वर्षी मी इंग्लंडला गेलो.... तेथील लोक विचित्र, राहणी विचित्र, घरे विचित्र आणि घरात राहण्याची पद्धती पण विचित्र ! काय बोलल्याने अथवा केल्याने तेथील रीतीरिवाजांचा भंग होईल त्याचा मला पत्ताच नसायचा. त्यात भर पडली खाण्यापिण्याच्या बंधनांची. खाता येण्यासारखे जिन्नस शुष्क आणि नीरस लागत. यांमुळे अडकित्त्यातील सुपारीसारखी माझी स्थिती झाली. विलायतेत राहणे मला आवडत नव्हते आणि देशात परत जाण्याची सोय नव्हती. विलायतेत पोहोचल्यानंतर तिथे तीन वर्ष पूर्ण करण्याचीच जिद्द होती

*आत्म. पृष्ठ ४३.*

३७. घरधनीणबाईंनी माझ्यासाठी बनवायचं तर काय बनवायचं ? .... मित्र मला मांसाहाराकरिता समजूत घालत. माझी प्रतिज्ञेची अडचण सांगून मी स्वस्थ बसत असे .... एके दिवशी मित्रांनी माझ्यासमोर बेन्थॅमचा ग्रंथ वाचण्याला सुरुवात केली. त्यांनी उपयोगितावादासंबंधीचे प्रकरण वाचले. मी घाबरलो. भाषा अवघड होती. कळायची मारामार ! मित्र अर्थ समजावून सांगू लागले. मी उत्तर दिले : 'तुम्ही मला माफ करा. अशा सूक्ष्म गोष्टी मला कळत नाहीत. मांसाहार केला पाहिजे हे मला मान्य आहे परंतु मी माझी प्रतिज्ञा मोडू शकत नाही. त्यासाठी माझ्याजवळ कोणताच युक्तिवाद नाही.' *आत्म. पृष्ठ ४२-४५.*

३८ मी रोज दहाबारा मैल चालत असे. एखाद्या स्वस्त भोजनगृहात जाऊन पोट भरून डबलरोटी खात असे. परंतु समाधान होत नसे. अशा रीतीनं भटकता भटकता मी एक दिवस फॅरिंग्टन स्ट्रीटमध्ये जाऊन पोहोचलो, व व्हेजिटेरिअन रेस्टरॉ हे नाव वाचले. लहान मुलाला आवडीची वस्तू मिळाल्याने जसा आनंद व्हावा तसा मला झाला. मी हर्षाने वेडा होऊन आत शिरणार त्यापूर्वी दाराजवळील काचेच्या खिडकीत विकायची पुस्तके दिसली. त्यामध्ये मी सॉल्टचे 'शाकाहाराचे समर्थन' या नावाचे पुस्तक दिसले. एक शिलिंग देऊन ते पुस्तक मी खरेदी केले आणि जेवायला बसलो. विलायतेत आल्यानंतर इथे पहिल्यांदा पोट भरून जेवण मिळालं होतं. देवानं माझी भूक शांत केली.

सॉल्टचे पुस्तक वाचले. माझ्या मनावर त्याचा उत्कृष्ट परिणाम झाला. ते पुस्तक वाचले त्या दिवसापासून मी स्वेच्छापूर्वक शाकाहारावर विश्वास करू लागलो. आईसमोर केलेली प्रतिज्ञा आता मला विशेष आनंद देऊ लागली. अजूनपर्यंत ‘सर्व लोग मांसाहारी बनतील तर चांगले’ असे मानत होतो. आधी केवळ सत्यपालनार्थ आणि नंतर प्रतिज्ञापालनार्थ मांसाहाराचा त्याग करत होतो. तसेच कधी काळी स्वतः उघडपणे मनमुराद मांस खाऊ लागून इतरांनाही मांसाहाराच्या कंपूत ओढण्याची उमेद मी बाळगून होतो. परंतु आता त्याच्या उलट स्वतः शाकाहारी राहून इतरांना तसे बनवण्याची इच्छा उत्पन्न झाली. *आत्म. पृष्ठ ४५-४६.*

३९ जो माणूस नवीन धर्माचा स्वीकार करत असतो त्या माणसात नवीन धर्माच्या प्रचाराचा उत्साह असतो. विलायतेत तर शाकाहार एक नवीन धर्मच होता आणि बुद्धीने मी मांसाहाराचा पुरस्कर्ता असल्यामुळे माझ्याकरिताही तो तसाच होता असे म्हटले पाहिजे. शाकाहाराचा बुद्धिपूर्वक स्वीकार मी विलायतेतच केला होता. त्यामुळे नवीन धर्मात प्रवेश करणाऱ्यासारखीच माझी स्थिती होती व माझ्यात नवधर्मीचा जोष आलेला होता. त्यामुळे त्यावेळी मी ज्या वस्तीत राहत होतो त्या वस्तीत मी शाकाहारी मंडळाची स्थापना करण्याचा निश्चय केला. या वस्तीचे नाव बेजवाटर होते. तिथे सर एडविन अर्नोल्ड राहत असत. मी त्यांना उपाध्यक्ष होण्याकरिता विनंती

केली. ते उपाध्यक्ष झाले. डॉ. ओल्डफिल्ड, जे 'द व्हेजिटेरिअनचे संपादक होते, अध्यक्ष झाले. मी चिटणीस झालो. *आत्म. पृष्ठ ५६.*

४० शाकाहारी मंडळीच्या कार्यकारिणीवर माझी निवड तर झाली. तिच्या प्रत्येक सभेला मी हजरही राहत असे. परंतु बोलण्याकरिता माझी जीभ उचलेना.... मला बोलण्याची इच्छा होत नसे असे नाही. पण बोलायचे काय ?.... माझा हा लाजाळू स्वभाव शेवटपर्यंत विलायतेत कायम राहिला. कोणाला भेटायला म्हणून गेलो आणि तेथे पाचसहा माणसे गोळा झालेली असली तरी तेवढ्याने मी मूक बनत असे. *आत्म. पृष्ठ ५७-५८.*

४१ माझ्या असा या लाजाळू स्वभावामुळे फजिती होण्यापलीकडे माझे कोणतेही नुकसान झाले नाही. उलट त्यामुळे माझा लाभच झाला असे आता वाटते. बोलताना वाटणाऱ्या संकोचाबद्दल पूर्वी मला दुःख होत असे परंतु त्याऐवजी आता आनंदच होतो. लाजाळूपणामुळे शब्दांची काटकसर मी शिकलो हा यामुळे एक मोठा लाभ. *आत्म. पृष्ठ ६०.*

४२ सन १८९०मध्ये पॅरिसमध्ये एक महाप्रदर्शन भरले होते. त्याच्या तयारीबद्दल मी वाचत असे. पॅरिस पाहण्याची तीव्र इच्छाही होत असे. प्रदर्शन पाहायला गेलो तर आपला दुहेरी फायदा होईल असे मला वाटले. प्रदर्शन पाहणा ऱ्यांकरिता आयफेल टॉवर हे मोठेच आकर्षण होते. हे बनण्यापूर्वी १००० फूट उंचीची इमारत उभीच राहू शकत नाही अशी लोकांची धारणा होती. प्रदर्शनात इतरही अनेक गोष्टी पाहण्यासारख्या होत्या. *आत्म. पृष्ठ ७४.*

४३ प्रदर्शनाची भव्यता आणि त्यातील वैविध्य याशिवाय तेथील मला काहीच आठवत नाही. आयफेल टॉवरवर तर मी दोनतीनदा चढलो होतो. त्यामुळे मला त्याची चांगली आठवण आहे. पहिल्या माळ्यावर खाण्यापिण्याची व्यवस्था होती. इतक्या उंचावर मी जेवण केलं हे सांगता यावं म्हणून साडेसात शिलिंग फुंकून मी तिथे जेवण घेतले.

पॅरिसच्या जुन्या देवळांची आठवण आजही कायम आहे. त्यांची भव्यता आणि त्यांच्यांत मिळणाऱ्या शांततेचा विसर कधीच पडू शकत नाही. नोत्रदामची कामगिरी आणि आतील

चित्रकला मी आजही विसरलेलो नाही. लाखो रुपये खर्च करून ज्या लोकांनी अशा स्वर्गीय मंदिरांची निर्मिती केली त्यांच्या अंत:करणात खोलवर ईश्वरप्रेम असलेच पाहिजे असे वाटले.

*आत्म. पृष्ठ ७४*

४४ आयफेल टॉवरविषयी दोन शब्द लिहिणे जरुरीचे आहे. या टॉवरचा हल्ली काय उपयोग होते ते मला माहीत नाही. प्रदर्शन पाहून आल्यानंतर प्रदर्शनाची वर्णने कोणीही वाचतोच. त्यात त्याची स्तुतीही वाचली आणि निंदाही. मला आठवते की निंदा करण्यात टॉलस्टॉय प्रमुख होते. त्यांनी लिहिले होते की आयफेल टॉवर माणसाच्या मूर्खपणाचे चिन्ह आहे, त्याच्या ज्ञानाचे नाही. आपल्या लेखातून त्यांनी दाखवले होते की जगातील विविध प्रकारच्या व्यसनांमध्ये तंबाखूचे व्यसन सर्वात जास्त आहे. दुराचरण करण्याचा जो धीर माणसात दारू पिऊन येत नाही तो धीर बिडी प्याल्यामुळे येतो. दारू पिणारे वेडा होतो तर बिडी पिणाराच्या धुरामुळे त्याची बुद्धी झाकोळून जाते. त्यामुळे तो हवेत किल्ले बांधू लागतो. आयफेल टॉवर अशाच व्यसनाची परिणती आहे असे मत टॉलस्टॉय यांनी व्यक्त केले होते.

आयफेल टॉवरमध्ये सौंदर्य तर काहीच नाही. त्याच्यामुळे प्रदर्शनातील शोभा वृद्धिंगत झाली असावी असेही म्हणता येऊ शकत नाही. ती एक नवीन गोष्ट होती, मोठी गोष्ट होती. त्यामुळेच हजारो लोक त्याला पाहण्याकरिता त्याच्यावर चढले होते. ते टॉवर प्रदर्शनातील एक खेळणेच होते. आणि जोपर्यंत आपण मोहवश असू तोपर्यंत आपणही बालकच असतो ही गोष्ट या टॉवरने सिद्ध केली आहे. एवढीच त्या टॉवरची उपयोगिता आहे एवढेच हवे तर आपण म्हणू शकतो.

*आत्म. पृष्ठ ७५-७६.*

४५ परीक्षेत उत्तीर्ण होऊन १० जून १८९१ला मी बॅरिस्टर झालो. अडीच शिलिंग देऊन ११ जूनला इंग्लंडच्या उच्च न्यायालयात मी नाव नोंदवले आणि १२ जूनला मी भारताकरिता रवाना झालो.

*आत्म. पृष्ठ ७८.*

४६ वडील बंधूंनी माझ्या भरवशावर कितीतरी मनोराज्ये रचली होती. पैसा, कीर्ती आणि पद या गोष्टींचा त्यांना फार मोह होता. त्यांच्या उदारपणाचे पर्यवसान उधळपट्टीत होत असे. त्यामुळे आणि त्यांच्या भोळेपणामुळे मैत्री करायला त्यांना वेळ लागत नसे. या मित्रवर्गामार्फत ते माझ्याकरिता दावे मिळवणार होते. मी खूप कमावेन अशीही त्यांची पक्की धारणा होती. त्या आधारावर त्यांनी घरखर्च वाढवून ठेवला होता. माझ्याकरिता वकिलीचे क्षेत्र तयार करण्याकरिता त्यांनी आपल्याकडून काहीही कमी पडू दिले नव्हते. *आत्म. पृष्ठ ८५.*

४७ खर्च वाढलेला असल्यामुळे आणि कमाई काहीच नसल्यामुळे चारपाच महिन्यांपेक्षा अधिक काळ मुंबईत राहणे मला शक्यच नव्हते. अशा रीतीने मी संसारात प्रवेश केला. बॅरिस्टरी मला नकोशी वाटू लागली. अवडंबर मोठे, कौशल्य अल्प. जबाबदारीच्या जाणिवेने माझी छाती दडपून गेली. *आत्म. पृष्ठ ८८.*

४८ मुंबईहून निराश होऊन मी राजकोटला पोहोचलो. तिथे मी माझी वेगळी कचेरी उघडली. गाडे थोडेबहूत ठीकठाक चालू लागले. अर्ज लिहिण्याची कामे मिळू लागली आणि दरमहा सरासरी ३०० रुपये मिळकत होऊ लागली. *आत्म. पृष्ठ ९२.*

४९ मध्यंतरीच्या काळात पोरबंदर येथील एका मेमन पेढीचा निरोप आला : 'दक्षिण आफ्रिकेत आमचा व्यापार आहे. आमची मोठी पेढी आहे. तिथे आमचा एक दावा सुरू आहे. चाळीस हजार पौंडांचा दावा आहे. बरेच दिवसांपासून सुरू आहे. आमच्याजवळ चांगले वकील बॅरिस्टर आहेत. तुमच्या भावाला तुम्ही पाठवले तर आम्हालाही मदत होईल आणि त्यालाही काही मदत मिळेल. आमची बाजू तो आमच्या वकिलांना चांगल्या प्रकारे समजावून सांगू शकेल. शिवाय त्याला नवीन देश पाहायला मिळेल आणि नवनवीन लोकांशी त्याची ओळख होईल ते निराळेच.'

*आत्म. पृष्ठ ९६.*

५० याला काही नोकरी म्हणता येऊ शकत नव्हते. ती नोकरीच होती. परंतु मला तर काहीही करून भारत सोडायचाच होता. नवीन देश पाहायला मिळणार होता आणि अनुभव मिळणार

होता ते वेगळेच. मोठ्या भावाला १०५ पौंड पाठवले तर घरखर्चाकरिताही मदत होईल असा विचार करून पगाराकरिता घासाघीस न करता सेठ अब्दुल करीमचा प्रस्ताव मी मान्य केला व दक्षिण आफ्रिकेत जाण्याकरिता तयार झालो. *आत्म. पृष्ठ ९७.*

५१ विलायतेला जाताना वियोगाचे जे दुःख झाले होते ते दक्षिण आफ्रिकेत जात असताना झाले नाही. आई तर वारलेलीच होती. जगाचा आणि प्रवासाचा अनुभव मी घेतलेला होता. राजकोट आणि मुंबईच्या दरम्यान माझे येणे जाणे सुरूच असायचे. त्यामुळे या वेळी केवळ पत्नीचा वियोगच वेदनादायक होत होता. विलायतेतून आल्यानंतर अजून एक मुलगा झाला होता. आमच्यातील प्रेमात विषयोपभोगाचे जरी प्राबल्य होतं तरी त्यात निर्मळपणा येऊ लागला होता. विलायतेतून मी परतल्यानंतर आम्ही दोघे फार कमी वेळ सोबत राहिलो होतो. बरावाईट कसाही का असेना पण मी तिचा शिक्षक बनलो होतो त्यामुळे आणि पत्नीला मी जे काही शिकवले होते ते टिकावे म्हणून आमचे सोबत राहणे आवश्यक असल्याचे आम्हांला जाणवत होते. परंतु आफ्रिका मला आपल्याकडे ओढत होती. त्यामुळे विरह सुसह्य झाला. *आत्म. पृष्ठ ९७.*

५२ नाताळच्या बंदराला डरबन म्हणतात. तसेच नाताळचे बंदर म्हणूनही ते ओळखले जाते. मला घेण्याकरिता अब्दुल्ला सेठ आले होते. आगबोट धक्क्यावर पोहोचताच नाताळमधील लोक आपल्या मित्रांना भेटण्याकरिता जेव्हा आगबोटीवर आले तेव्हाच माझ्या लक्षात आले की इथे भारतीयांना फारसा मान नाही. अब्दुल्ला सेठ यांना ओळखणारेही त्यांच्याशी ज्या त-हेने वागत होते त्यात एक प्रकारची तुच्छता दिसून येत होती व ती मला बोचल्याशिवाय राहिली नाही. अब्दुल्ला सेठ हे वर्तन सहन करायचे, त्यांना त्याची सवय झालेली होती. माझ्याकडे ज्यांची नजर जाई ते माझ्याकडे कुतूहलानं पाहत. माझ्या पोषाखामुळे इतर भारतीयांपेक्षा मी वेगळा दिसत असे. त्यावेळी मी फ्रॉक कोट आणि बंगाली पगडी असा वेष धारण केला होता.

*आत्म पृष्ठ १००*

५३ डरबन येथील न्यायालय दाखवण्याकरिता अब्दुल्ला सेठ दुस-या अथवा तिस-या दिवशी घेऊन गेले. तिथे काही लोकांशी त्यांनी माझा परिचय करून दिला. न्यायालयात त्यांनी मला

आपल्या वकिलाजवळ बसवले. मॅजिस्ट्रेट माझ्याकडे एकसारखे पाहत होते. अखेरीस माझी पगडी उतरवण्याकरिता त्यांनी मला सांगितले. मी तसं करायला नकार दिला आणि न्यायालयातून निघून आलो. *आत्म. पृष्ठ १०१.*

५४ सातव्या अथवा आठव्या दिवशी मी डरबनहून (प्रिटोरियाकरिता रवाना झालो. माझ्याकरिता पहिल्या वर्गाचे तिकीट काढण्यात आले.... नाताळची राजधानी मारित्सबर्ग येथे रात्रीच्या दहा वाजता गाडी पोहोचली. इथे बिछाना दिला जायचा. ‘तुम्हांला बिछान्याची गरज आहे ? रेल्वेच्या कोणत्या तरी नोकराने येऊन मला विचारले.

मी म्हणालो, ‘माझ्याजवळ बिछाना आहे.’

तो निघून गेला. मध्यंतरीच्या काळात एक प्रवासी आला. त्याने माझ्याकडे पाहिले. मी वेगळ्या वर्णाचा असल्याचे पाहून तो अस्वस्थ झाला. तो बाहेर निघाला आणि एक दोन अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन आला. मला कुणीच काहीही म्हणाले नाही. अखेरीस एक दुसराच अंमलदार आला. तो म्हणाला, “इकडे या, तुम्हाला दुसऱ्या डब्यात जायचे आहे.”

‘माझ्याजवळ पहिल्या वर्गाचे तिकीट आहे' मी म्हणालो.

तो म्हणाला, 'ते काही असो, मी तुम्हाला सांगतो की तुम्हांला शेवटच्या डब्यात जावे लागेल.

मी म्हणालो की, “मला या डब्यात बसवण्यात आले आहे आणि याच डब्यातून प्रवास करण्याचा माझा निर्धार आहे.”

अंमलदार म्हणाला की, “हे शक्य नाही. तुम्हांला उतरावं लागेल आणि उतरला नाही तर शिपाई तुम्हांला खाली उतरवील.”

मी म्हणालो की, “शिपायाला मला उतरवू द्या, मी स्वतःहोऊन काही खाली उतरणार नाही.”

शिपाई आला आणि त्याने मला धक्का मारून खाली उतरवले. माझे सामान उतरवण्यात आले. दुस-या डब्यात जाण्याला मी नकार दिला. गाडी निघाली. मी वेटिंगरूममध्ये बसलो. माझी 'हॅन्डबॅग' तेवढी मी सोबत ठेवली. इतर सामानाला मी हातही लावला नाही. रेल्वेवाल्यांनी ते कुठे तरी ठेवले.

थंडीचे दिवस होते. दक्षिण आफ्रिकेतील उंचावरील प्रदेशात कडाक्याची थंडी असते. मारित्सबर्ग अशाच ठिकाणी होते. त्यामुळे खूप थंडी वाजत होती. माझ्या सामानात माझा ओव्हरकोट होता. परंतु सामान मागण्याचा मला धीरज झाला नाही. पुन्हा अपमान न होवो ? थंडीने मी कापत राहिलो. खोलीत दिवा नव्हता. मध्यरात्रीच्या दरम्यान एक प्रवासी आला. तो काही बोलू इच्छितो असे मला वाटले. परंतु मी बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हतो.

मी माझ्या धर्माचा विचार केला : “एक तर मी माझ्या अधिकारांकरिता झगडले पाहिजे अथवा देशात परतले पाहिजे. असे करायचे नसेल तर अपमान सहन करून प्रिटोरियाला पोहोचले पाहिजे आणि खटल्याचे कामकाज संपवून भारतात परतायला पाहिजे. मध्येच खटला सोडून पळ काढणे म्हणजे नामर्दपणा होय. मला सहन करावे लागणारे कष्ट वरवरचे आहेत. खोलवर दडलेल्या महारोगाच्या - रंगद्वेषाच्या त्या खुणा आहेत. खोलवर रुजलेल्या या रोगाला नेस्तनाबूत करण्याची जर माझ्यात शक्ती असेल तर त्या शक्तीचा उपयोग मी करायला हवा. असं करताना मला स्वतःला जे काही दुःख भोगावे लागेल ते भोगण्याची तयारी मी ठेवली पाहिजे. वर्णद्वेष काढून टाकण्याकरिता जरूर पडेल तेवढ्यापुरतेच दुःखाचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न मी केला पाहिजे.”

हा निर्धार करून जसे जमेल तसे दुसऱ्या गाडीने पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

*आत्म. पृष्ठ १०६-७.*

५५ सर्व हिंदी लोकांची एक सभा भरवून त्यांच्यासमोर त्याचे वास्तव चित्र मांडणे हे माझे पहिले काम होते. *आत्म. पृष्ठ १२०.*

५६ या सभेत मी दिलेल्या भाषणाला माझ्या जीवनातील पहिले भाषण मानता येईल. मी बरीच तयारी केली होती. मला सत्यासंबंधी बोलायचे होते. व्यापारात सत्य चालायचे नाही असे मी व्यापा-यांच्या तोंडून ऐकत आलो होतो. ही गोष्ट तेव्हाही मला मान्य नव्हती आणि आजही मान्य नाही. व्यापार आणि सत्य यांचे परस्परांशी जुळू शकत नाही असे सांगणारे व्यापारी मित्र आजही आहेत. व्यापाराला ते व्यवहार म्हणून संबोधतात, सत्याला धर्म म्हणतात आणि सांगत असतात की व्यवहार एक गोष्ट आहे आणि धर्म दुसरी. त्यांचा विश्वास आहे की व्यवहारात शुद्ध सत्य चालू शकतच नाही, त्याचा अवलंब यथाशक्तीच करता येणार अशी त्यांची समजूत होती. माझ्या भाषणात मी या भूमिकेचा चांगलाच समाचार घेतला आणि व्यापा-यांना त्यांच्या दुहेरी कर्तव्याची जाणीव करून दिली. परदेशात राहणा-या मूठभर हिंदु लोकांच्या वर्तनावरून हिंदुस्थानातील करोडो लोकांचे मूल्य होणार असल्यामुळे स्वदेशात असल्यापेक्षा त्यांची जबाबदारी परदेशात अधिक वाढली आहे. *आत्म. पृष्ठ १२०-२१.*

५७ पादपथावरुन चालण्याच्या प्रश्नाचा मात्र माझ्यावर गंभीर परिणाम घडून आला. मी नेहमी प्रेसिडेंट स्ट्रीटमधून मोकळ्या मैदानात फिरायला जात असे. या पेठेमध्ये प्रेसिडेंट क्रुगरचे घर होते. या घराला डामडौल मुळीच नव्हता, त्याच्या सभोवार कुंपणही नव्हते. शेजारची इतर घरे आणि हे घर यांच्यामध्ये काही अंतर दिसत नसे. प्रिटोरियामध्ये पुष्कळ श्रीमंत लोकांची घरे या घराहून खूप मोठी आणि कुंपण असलेली अशी होती. प्रेसिडेंटचा साधेपणा प्रख्यात होता. हे कोणा अंमलदाराचे घर आहे हे त्या घरासमोर फिरणाऱ्या शिपायावरूनच लक्षात येई. मी नेहमी या शिपायाच्या अगदी जवळून जात असे पण तो काही करत नसे.

शिपाई वरच्यावर बदलत असत. एकदा एका शिपायाने सूचना दिल्याशिवाय, पादपथावरून उतरून जाण्यास न सांगता, मला धक्का दिला, लाथ मारली आणि खाली ढकलले. मी प्रथम थक्कच झालो. त्याला जाब विचारणार त्यापूर्वीच कोट्सनी, जे त्यावेळी घोड्यावर बसून तेथून जात होते, मला हाक मारून म्हटले:

"गांधी, मी सर्व काही पाहिले आहे, तुम्हांला खटला भरायचा असेल तर मी साक्ष देईन. तुमच्यावर अशा त-हेने हल्ला व्हावा याचे मला वाईट वाटते."

मी म्हणालो, "यात खेद वाटण्याचे काही कारण नाही. बिचाऱ्या शिपायाला काय माहीत ? त्याच्याकरिता तर सर्व काळे एकसारखे असतात. हब्शी लोकांनाही तो अशाच प्रकारे खाली उतरवत असावा. त्यामुळे त्याने मलाही धक्का मारला. मी नियमच केला आहे. मला स्वतःला सहन कराव्या लागणाऱ्या व्यक्तिगत क्लेशाकरिता मी न्यायालयात जाणार नाही. त्यामुळे मला खटला भरायचा नाही." *आत्म. पृष्ठ १२४-२५.*

५८ या प्रसंगामुळे प्रवासी भारतीयांबद्दलचा माझा कळवळा अधिक तीव्र झाला.... अशा त-हेने मी हिंदी लोकांच्या दुर्दशेचा वाचून, ऐकून आणि प्रत्यक्ष अनुभवून अभ्यास केला. स्वाभिमानाने जगू पाहणाऱ्या हिंदी माणसाकरिता दक्षिण आफ्रिका योग्य मुलूख नाही असे मला आढळून आले. ही स्थिती कशी बदलता येईल याच्या विचारात माझे मन अधिकाधिक गुंतून राहू लागले.'

*आत्म. पृष्ठ १२५.*

५९ प्रिटोरियात मला जे एक वर्ष मिळाले ते माझ्या आयुष्यात अमूल्य होते. सार्वजनिक काम करण्याच्या माझ्या शक्तीचा काहीसा अंदाज मला तिथे आला. काम शिकायची इथेच संधीही मिळाली. माझी धार्मिक वृत्ती आपोआपच तीव्र होऊ लागली आणि खरी वकिलीही मी इथेच शिकलो असेच म्हणावे लागेल. *आत्म. पृष्ठ १२६.*

६० माझ्या लक्षात आले की वकिलाचे कर्तव्य पक्षकारांमध्ये पडलेली फूट भरून काढण्याचे आहे. हा पाठ माझ्या मनात इतका दृढमूल झाला की माझ्या वीस वर्षांच्या वकिलीतील बराचसा वेळ स्वतःच्या कचेरीत बसून शेकडो दाव्यांच्या तडजोडी करवण्यातच गेला. त्यामुळे मी काहीच गमावले नाही. द्रव्याचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही आणि आत्म्याचे तर नाहीच नाही.

*आत्म. पृष्ठ १२९.*

६१ जशी ज्याची भावना तसे त्याला फळ मिळते या नियमाची प्रचीती मला स्वतःच्या बाबतीत अनेकदा आली आहे. जनतेची म्हणजेच गरिबांची सेवा करण्याच्या माझ्या तीव्र इच्छेने गरिबांबरोबर माझी नेहमीच गाठ घालून दिली आहे आणि त्यांच्याशी तादात्म्य पावण्याची शक्ती मला दिली आहे. *आत्म. पृष्ठ १४६.*

६२ या वेळी वकिली सुरू करून मला चारदोन महिनेच झाले असतील. काँग्रेसचेही बालवय होते. अशा वेळी एके दिवशी बालसुंदरम नावाचा एक मद्रासी हिंदुस्तानी हातात फेटा घेऊन माझ्यासमोर उभा राहिला. त्याचे कपडे फाटलेले होते, तो थरथर कापत होता व त्याच्या तोंडातून रक्त वाहत होते आणि त्याचे समोरचे दोन दातही तुटलेले होते.

मी त्याला डॉक्टरकडे पाठवले. त्या दिवसात गोरे डॉक्टरच मिळायचे. इजांबद्दलचा दाखला मला पाहिजे होता. तो मिळवून मी बालसुंदरमला मॅजिस्ट्रेटकडे घेऊन गेलो. तिथे बालसुंदरमचे शपथपत्र मी दाखल केले. ते वाचून मॅजिस्ट्रेट मालकावर संतापले. मालकावर समन्स बजावण्याचा हुकूम त्यांनी दिला. त्याच्या मालकाने त्याला भयंकर मारहाण केली होती. तमिळ समजणाऱ्या माझ्या कारकुनातर्फ मी त्याची परिस्थिती समजावून घेतली. एका प्रतिष्ठित गो-याकडे बालसुंदरम नोकरी करत होता. कोणत्या तरी कारणामुळे मालकाचा त्याच्यावर संताप झाला असावा. त्याला भान राहिले नाही आणि त्याने बालसुंदरमची जबरदस्त पिटाई केली. परिणामी बालसुंदरमचे दोन दात तुटले होते. *आत्म. पृष्ठ १४६-४७.*

६३ बालसुंदरमच्या खटल्याची माहिती गिरमिटियांमध्ये चोहोकडे पसरली आणि मी त्यांचा बंधू ठरलो. मला हे नाते आवडले. माझ्या कचेरीपुढे गिरमिटियांची रीघच लागली. त्यांची सुखदुःखे जाणण्याची उत्तम संधी मला मिळाली. *आत्म. पृष्ठ १४७.*

६४ दुस-याला अपमानित करून आपला मान कसा वाढू शकतो हे कोडे अजून मला उलगडू शकलेले नाही. *आत्म. पृष्ठ १४८.*

६५ मी हिंदुस्तानी समाजाच्या सेवेत तन्मय होऊन गेलो याचे कारण आत्मदर्शनाची अभिलाषा हेच होते. ईश्वराची ओळख सेवेमुळेच होऊ शकते असे समजून मी सेवाधर्माचा स्वीकार केला होता. मी हिंदी लोकांची सेवा करत होतो कारण ती संधी सहजप्राप्त होती. मला त्यात गोडी वाटत होती. तिच्या शोधार्थ मला जावे लागले नव्हते. मी तर प्रवास करण्याकरिता, काठेवाडमधील कारस्थानांपासून सुटका करून घेण्याकरिता आणि उपजिविकेच्या शोधार्थ दक्षिण आफ्रिकेत गेलो; पण तेथे गुंतलो ईश्वराच्या शोधात - आत्मदर्शनाच्या प्रयत्नात! *आत्म. पृष्ठ १५१.*

६६ शुद्ध राजनिष्ठा जेवढी मला स्वत:मध्ये आढळली तेवढी इतरांमध्ये क्वचितच आढळली आहे. या राजनिष्ठेमागे माझे सत्यावरील प्रेमच होते हे मला स्पष्टपणे दिसू शकते. राजनिष्ठा अथवा इतर कोणत्याही गोष्टीचे प्रदर्शन माझ्याकडून कधीही घडले नाही. नाताळमध्ये जेव्हा केव्हा मी सभेला जात असे तेव्हा 'गॉड सेव्ह द किंग' हे पद गायले जायचेच. ब्रिटिश राजवटीमध्ये दोष तेव्हा मला दिसत असला तरी पण एकंदरीत ती राजवट मला चांगली वाटे. एकूण पाहता ब्रिटिश शासन भारतीय जनतेकरिता हितकारक आहे अशी त्यावेळी माझी मान्यता होती.

दक्षिण आफ्रिकेत याच्या उलट धोरण मला आढळून येत होते. वर्णद्वेष दिसत होता. या गोष्टी तात्पुरत्या व स्थानिक आहेत असे मला वाटत होते. त्यामुळे राजनिष्ठेच्या बाबतीत मी इंग्रजांच्याही पुढे जाण्याचा प्रयत्न करत असे. इंग्रजांचे राष्ट्रगीत 'गॉड सेव्ह द किंग'ची चाल मी आस्थापूर्वक प्रयत्नाने शिकून घेतली. ते सभांमध्ये गात त्यावेळी मी त्यात आपला सूर मिळवत असे. आंणि पुढे पुढे केल्याशिवाय राजनिष्ठा व्यक्त करण्याचे जे जे प्रसंग येत त्यामध्ये मी भाग घेत असे.

या राजनिष्ठेचा माझ्या जीवनात मी कधी व्यापार करण्याचा प्रयत्न केला नाही. राजभक्तीला कर्ज समजून ते फेडण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला आहे. *आत्म. पृष्ठ १६४.*

६७ आता मला दक्षिण आफ्रिकेत येऊन तीन वर्षे झाली होती. मी लोकांना ओळखू लागलो होतो, लोक मला ओळखू लागले होते. १८९६ साली सहा महिन्यांकरिता मी घरी जाण्याची

परवानगी मागितली. दक्षिण आफ्रिकेत मला बराच काळ राहावे लागणार हे मला दिसत होते. माझी वकिली चांगली चालली होती असे म्हणायला हरकत नाही. सार्वजनिक कामासाठी लोकांना माझी जरुरी वाटत होती, मलाही वाटत होती. म्हणून मी दक्षिण आफ्रिकेमध्ये सहकुटुंब राहण्याचा विचार केला आणि त्यासाठी स्वदेशी जाऊन येणे मला योग्य वाटले.

*आत्म. पृष्ठ १५७.*

६८ कुटुंबासोबत मी पहिल्यांदाच समुद्रप्रवास करत होतो.... ज्या काळासंबंधी मी लिहीत आहे त्या काळी माझी अशी समजूत होती की, सुधारलेल्या लोकांत आपली गणना व्हायला पाहिजे असेल तर आपला बाह्याचार शक्य तोपर्यंत युरोपिअन लोकांशी जुळता असला पाहिजे. असे केल्यानेच आपली छाप पडणार; आणि छाप पडल्याशिवाय देशसेवा साधायची नाही .... यासाठी पत्नीचा, मुलांचा पोशाख मीच पसंत केला... पारशी हे हिंदी लोकात अधिकात अधिक सुधारलेले. म्हणून जेथे युरोपिअन पोषाखाचे अनुकरण करणे अयोग्य वाटले तेथे पारशी पोषाखाचे केले. पारशी बाया वापरतात तशा साड्या पत्नीसाठी घेतल्या; मुलांसाठी पारशी कोट पाटलोणी घेतल्या. सर्वांना पायमोजे बूट तर पाहिजेतच. पत्नीला, त्याचप्रमाणे मुलांना दोन्ही वस्तू कित्येक महिने आवडत नसत. बूट लागत, पायमोज्यांना घाण सुटे, पाय सुजत. या अडचणींवर माझ्याजवळ प्रत्युत्तरे तयार असत. उत्तराच्या समर्पकपणापेक्षाही हुकुमाचे बळ जास्त होतेच ना ? अर्थात पत्नीने आणि मुलांनी नाइलाजास्तव पोशाखातील फेरफाराचा स्वीकार केला. तितक्याच नाइलाजाने व अधिक कंटाळ्यानिशी जेवताना सुरीकाट्याचा उपयोग सुरु केला. माझा मोह जेव्हा दूर झाला तेव्हा त्यांनी परत मोजे, बूट व सुरीकाटा यांचा त्याग केला. फेरफार ज्याप्रमाणे दुःखकारक झाला त्याचप्रमाणे एकदा त्यांची सवय पडल्यानंतर त्यांचा त्यागही दुःखकारक झाला. पण आता मला दिसत आहे की सुधारणेची कात टाकून दिल्यामुळे आम्हा सर्वांनाच हलके वाटू लागले. *आत्म. पृष्ठ १७५-७६.*

६९ आमच्या जहाजाने १८ अथवा १९ तारखेला डरबन बंदरात नांगर टाकला.

*आत्म. पृष्ठ १७७.*

७० मुंबई सोडल्यापासून तेवीस दिवसांपर्यंत जहाजाला सुतकात ठेवण्याचा डॉक्टरांनी हुकूम दिला. परंतु सुतकाच्या या आदेशामागे केवळ आरोग्य रक्षणाचा हेतू नव्हता. डरबनचे नागरिक आम्हांला परतवून लावण्याकरिता जे आंदोलन करत होते ते आंदोलनच या आदेशाच्या मुळाशी होते.... कसेही करून एजंटला किंवा आम्हांला धाकदपटशा दाखवून आम्हांला वाटेला परत पाठवण्याचा त्याचा हेतू होता. एजंटला तर धमक्या मिळतच होत्या, आता आमच्या नावानेही धमक्या येण्याला सुरुवात झाली : "तुम्ही जर परतला नाही तर तुम्हांला समुद्रात बुडवून टाकले जाईल. परतायला तयार असाल तर परतण्याचे भाडे देखील तुम्हांला मिळू शकेल." उतारुंमध्ये मी खूप फिरलो. त्यांना धीर दिला. *आत्म. पृष्ठ १७७-७८.*

७१ शेवटी उतारूंवर व माझ्यावर निर्वाणीचा खलिता आला. तुमचा जीव धोक्यात आहे अशा धमक्या दोघांनाही देण्यात आल्या. दोघांनीही नाताळच्या बंदरात आपल्याल्या उतरण्याचा हक्क आहे असे लिहिले आणि कोणतीही संकटे आली तरी आम्ही आमचा हा अधिकार सोडणार नाही असा निर्धार दोघांनीही व्यक्त केला.

अखेरीस तेविसाव्या दिवशी म्हणजे १३ जानेवारी १८९७ला आगबोटींची सुटका झाली आणि उतारूंना उतरण्याची परवानगी देण्यात आली. *आत्म. पृष्ठ १७७-८०.*

७२ आम्ही आगबोटीतून उतरत नाही तोच मुलांनी आम्हांला ओळखले आणि ते 'गांधी गांधी' म्हणून ओरडू लागले. लगेच काही लोक गोळा झाले आणि आरडाओरड अजूनच वाढली.... आम्ही पुढे चाललो. जमावही वाढू लागला.... मग माझ्यावर दगडाधोंड्यांचा आणि सडक्या अंड्यांचा वर्षाव सुरू झाला. कुणी तरी माझी पगडी उडवली. माझ्यावर लाथांचा वर्षाव सुरु झाला. मला घेरी आली. मी जवळच्या घराची जाळी धरून दम खाल्ला. तिथे उभे राहणे तर शक्यच नव्हते. थापडा बसू लागल्या. एवढ्यात पोलीस अंमलदाराची बायको, जी मला ओळखत होती, त्या वाटेने जात होती. मला पाहताच ती माझ्या शेजारी येऊन उभी राहिली आणि उन्हं नसतानाही तिने आपली छत्री उगडली. यामुळे जमाव थोडा शांत झाला. आता माझ्यावर हल्ला करायचा असला तर मिसेस अलेक्झांडर यांना वाचवूनच करता येऊ शकत होता.

*आत्म. पृष्ठ १८१-८२.*

७३ माझ्यावर हल्ला करणारांवर खटला चालवून मला न्याय मिळवून द्यावा असे तत्कालीन वसाहत मंत्री स्वर्गीय मि. चेम्बर्लन यांनी तारेद्वारे नाताळ सरकारला कळवले मि. एस्कॉम्ब यांनी मला आपल्याकडे बोलावले. मला झालेल्या जखमांबद्दल खेद व्यक्त करत ते म्हणाले की, "तुमच्या केसाला जरी धक्का लागला तरी मला आनंद होणार नाही हे तर तुम्ही मान्य करालच.... हल्ला करणारांना तुम्ही ओळखू शकत असाल तर त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरायला मी तयार आहे. चेम्बर्लेन यांचीही अशीच इच्छा आहे."

मी उत्तर दिले : 'मला कुणावरच खटला भरायचा नाही. हल्ला करणारातील एकदोघांना मी ओळखू शकेन हे शक्य आहे. परंतु त्यांना शिक्षा करवून मला काय मिळणार ? शिवाय हल्ला करणारे दोषी आहेत असेही माझे मत नाही. हिंदुस्थानात अतिशयोक्ती करून नाताळच्या गोऱ्यांना मी बदनाम केले आहे असे तर त्यांना सांगण्यात आले आहे. या गोष्टीवर विश्वास ठेवल्यामुळे त्यांचा संताप झाला असेल तर त्यात आश्चर्य काय ? दोष तर मोठ्यांचा आहे आणि मला परवानगी देण्यात आली तर दोष तुमचा आहे असेच समजले पाहिजे. तुम्ही लोकांना योग्य मार्गाने नेऊ शकला असता. पण तुम्हीसुद्धा रुटरची तार खरी मानली, आणि मी अतिशयोक्ती केली अशी समजूत करून घेतली. मला कुणावरच खटला भरायचा नाही. सत्य बाहेर आले आणि ते लोकांना कळले की त्यांना स्वतःलाच आपल्या व्यवहाराचा पश्चात्ताप होईल. *आत्म. पृष्ठ १८४-८५.*

७४ जहाजावरून मी उतरलो त्याच दिवशी म्हणजे पिवळा बावटा उतरताक्षणीच 'नाताळ ॲडव्हरटाईझर'चा प्रतिनिधी माझी मुलाखत घेऊन गेला होता. त्याने मला खूप प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे देताना मी एकूणएक आरोपाचे निराकरण करू शकलो होतो.... या खुलाशाचा त्याचप्रमाणे हल्ला करणारांवर मी फिर्याद करण्याचे मी नाकारले त्याचा, इतका काही परिणाम झाला की, गो-या लोकांना त्याची शरम वाटली. वर्तमानपत्रांनी मला निर्दोष घोषित केले आणि हुल्लड करणारांची निंदा केली. अशा रीतीने मला अखेरीस लाभच झाला आणि माझा लाभ हा कार्याचाच लाभ होता. यामुळे भारतीय समाजाची प्रतिष्ठा वाढली माझा मार्ग अधिक सरळ झाला.

*आत्म. पृष्ठ १८५-८६.*

७५ वकिलीचा माझा व्यवसाय चांगला सुरू होता परंतु त्यामुळे मला संतोष वाटत नव्हता.... तेवढ्याने माझे समाधान होत नव्हते. अशा त-हेच्या सेवा-शुश्रुषेचे काम मी नेहमी करत राहिलो तर किती बरे होईल असे मनातून सारखे वाटत राहायचे.... त्यामुळे मी एका लहानशा इस्पितळात काम करू लागलो. रोज सकाळी तिथे जावे लागायचे. येणेजाणे आणि इस्पितळातील काम याकरिता रोज दोनेक तास लागायचे. या कामामुळे मला काहीसे समाधान मिळाले. आजाऱ्याचे दुखणे डॉक्टरला समजावून सांगणे आणि डॉक्टर सांगतील ते औषध रोग्याला तयार करून देणे हे काम माझ्याकडे इस्पितळात होते. या कामामुळे दुःखी-कष्टी भारतीयांशी निकटचा संबंध आला. त्यांत बरेचसे तमिळ, तेलगू अथवा उत्तर भारतातील गिरमिटिये असायचे.

हा अनुभव भविष्यात मला फार उपयोगी पडला. बोअर युद्धाच्या वेळी जखमी लोकांची आणि इतर रोग्यांची शुश्रुषा करण्याच्या कामी याचा मला खूप उपयोग झाला.

*आत्म. पृष्ठ १९१-९२.*

७६ शेवटच्या मुलाच्या जन्माच्या वेळी माझी पुरेपूर कसोटी झाली. पत्नीला एकाएकी प्रसुती वेदना सुरू झाल्या. डॉक्टर घरी नव्हते. दाईला बोलवायचे होते. ती जवळ असती तरी तिच्याकडून प्रसुतीचे काम झाले नसते. अखेरीस बाळांतपणाच्या वेळी सर्व कामे मला आपल्या हातानेच करावी लागली. *आत्म. पृष्ठ १९३.*

७७ मी असे पाहिले आहे की स्वतःच्या मुलांचे योग्य त-हेने पालनपोषण करायचे असेल आई-वडील या दोघांनीही तत्संबंधीचे ज्ञान मिळवून ठेवले पाहिजे. मी या बाबतीत जी दक्षता घेतली होती तिचा फायदा मला पावलोपावली आढळून आला. आरोग्यासंबंधीचे ज्ञान मी जर मिळवले नसते व त्याचा अंमल केला नसता तर माझी मुले आज जे सामान्य आरोग्य उपभोगत आहेत तसे त्यांना उपभोगता आले नसते. आपल्यामध्ये असा एक चुकीचा समज आहे की पहिल्या पाच वर्षांमध्ये मुलांना शिक्षणाची वगैरे जरुरी नसते. वस्तुस्थिती अशी आहे की पहिल्या पाच वर्षांत

मूल जेवढे मिळवते तेवढे ते नंतरच्या सबंध आयुष्यात मिळवू शकत नाही. मुलाचे शिक्षण आईच्या उदरातूनच सुरू होते असे मी अनुभवाने सांगू शकतो. *आत्म. पृष्ठ १९३.*

७८ जी समजदार दांपत्ये हा विचार करतील ते पति-पत्नीसंबंधाला विषयवासनेच्या तृप्तीचे साधन बनवणार नाहीत. संततीची त्यांना जेव्हा इच्छा होईल तेव्हाच ते संग करतील. रतिसुख स्वतंत्र वस्तू आहे असे मानण्यामध्ये घोर अज्ञान आहे असा माझा समज आहे. जननक्रियेवर जगताचे अस्तित्व अवलंबून आहे. विश्व हे ईश्वराच्या लीलेचे स्थान आहे. त्याच्या महिम्याचे प्रतिबिंब आहे. त्याच्या सुव्यवस्थित निर्मितीसाठीच जननक्रिया निर्मिलेली आहे. हे ज्याच्या लक्षात आले तो आटोकाट प्रयत्न करून विषयवासनेचे नियंत्रण करील, आणि रतिभोगाच्या परिणामी जी संतती होईल तिच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संगोपनासाठी जरूर लागणारे ज्ञान संपादन करील व त्या ज्ञानाचा फायदा आपल्या संततीला देईल. *आत्म. पृष्ठ १९३-९४.*

७९ भरपूर चर्चा केल्यानंतर आणि पूर्ण विचार केल्यानंतर सन १९०६ साली (बह्मचर्याचे) व्रत घेतले. व्रत घेण्याच्या वेळेपर्यंत मी पत्नीचा विचार घेतला नव्हता. तो व्रताच्या वेळी घेतला. तिच्याकडून मला यत्किंचितही विरोध झाला नाही. हे व्रत घेणे मला फार कठीण गेले. माझी शक्ती अल्प होती. विकारांना दाबात ठेवण्याचे कसे जुळेल ? स्वपत्नीशी विकारी संबंधांचा त्याग ही गोष्ट चमत्कारिक वाटत होती. तरी पण माझे कर्तव्य हेच आहे एवढे मला स्पष्ट दिसत होते. माझी दानत शुद्ध होती. ईश्वर शक्ती देईल असे म्हणून मी उडी घेतली.

आज वीस वर्षांनंतर त्या व्रताचे स्मरण झाले म्हणजे मला सानंदाश्चर्य वाटते. संयम पाळण्याची वृत्ती १९०१पासूनच बळावत होती व मी संयम पाळतच होतो. परंतु जी स्वतंत्रता व जो आनंद मी आता उपभोगू लागलो तो १९०६ सालापूर्वी उपभोगल्याचे मला आठवत नाही. आता वासना माझ्यावर स्वार होण्यात असमर्थ झाली आहे. *आत्म. पृष्ठ १९७.*

८० अशा प्रकारे ब्रह्मचर्याचा दिवसेंदिवस अधिक रसपान करत असलो तरी त्याच्या कठीणपणाचा अनुभव मला येत नव्हता असा याचा अर्थ नाही. आज मी छप्पन वर्षांचा झालो

असलो तरीही याच्या कठीणपणाचा अनुभव मला आल्याशिवाय राहत नाही. हे एक असिधारा व्रत आहे. हे मला अधिकाधिक समजून येत आहे. त्यामुळे अखंड जागरुकतेची आवश्यकता दिर सून येत आहे.

ब्रह्मचर्याचे पालन करायचे असेल तर स्वादेंद्रियावर प्रभुत्व मिळवलेच पाहिजे. स्वादावर विजय मिळवला तर ब्रह्मचर्याचे पालन सोपे होते याचा मी स्वतः अनुभव घेतला आहे. त्यामुळेच आहारासंबंधीचे माझे प्रयोग केवळ शाकाहाराच्या दृष्टीने नव्हे तर ब्रह्मचर्याच्या दृष्टीने होऊ लागले आहेत. *आत्म. पृष्ठ १९८.*

८१ खाण्यापिण्याशी आत्म्याचा कोणताच संबंध नाही, तो खातही नाही आणि पीतही नाही. पोटात जे जाते त्यामुळे आत्म्याचा लाभ अथवा हानी होत नाही तर जे वचन आतून बाहेर पडतात त्यांचा संबंध आत्म्याच्या हानी-लाभाशी असतो इत्यादी युक्तिवाद मला माहीत आहेत. त्यांच्यामध्ये तथ्यांशही आहे. परंतु त्या युक्तिवादात न शिरता मी येथे मनाचा दृढनिशचयच नमूद करतो की जो माणूस ईश्वराला भिऊन चालू इच्छितो अशा साधकाच्या किंवा मुमुक्षूच्या बाबतीत स्वतःच्या आहाराची निवडानिवड - त्याग व स्वीकार - तितकीच आवश्यक आहे जितकी वाणी व विचार यांची. *आत्म. पृष्ठ २५८.*

८२ भोग भोगण्यास सुरुवात तर केली पण ते फार दिवस टिकले नाही. सामानसुमान थाटतानाही मला त्यांच्याबद्दल मोह असा वाटलाच नाही. त्यामुळे घर थाटल्यानंतर लगेच मी खर्च कमी करायला सुरुवात केली. धोब्याचाही खर्च फाजील वाटला. आणि शिवाय धोबी वेळेवर कपडे आणून देत नसे. त्यामुळे दोनतीन डझन शर्ट आणि तितक्याच कॉलरी एवढ्यानेही माझे भागेना. कॉलरी रोज बदलायच्या, शर्ट रोज जरी नाही तरी एक दिवसाआड बदलवावा लागत असे. याप्रमाणे दोन्हीकडून खर्च होई. हे मला अनावश्यक वाटले. म्हणून धुण्याचे सामान आणून ठेवले. धुण्याच्या कलेचे पुस्तक वाचून धुवायला शिकलो; पत्नीलाही शिकवले. कामाचा बोजा काहीसा वाढला, पण काम नवीन त्यामुळे मजा वाटे.

पहिल्यांदाच माझी स्वतःची कॉलर मी धुतली होती तो प्रसंग मी विसरणेच शक्य नाही. तिला खळ जास्त लागली आणि इस्त्री पुरेशी गरम नव्हती. त्यातच कॉलरला आच लागेल या भीतीने इस्त्री पुरेशी दाबली नाही. त्यामुळे कॉलर कडक तर बनली पण तिच्यातून खळ गळून पडत होती. अशा थाटात मी कोर्टात गेलो आणि बॅरिस्टरांच्या थट्टेचा विषय होऊन बसलो. पण अशा त-हेची थट्टा सहन करण्याची शक्ती माझ्यामध्ये त्यावेळीही भरपूर होती.

*आत्म. पृष्ठ २००*

८३ धोब्याच्या गुलामगिरीतून मी ज्याप्रमाणे सुटलो त्याचप्रमाणे हजामाच्या गुलामगिरीतून सुटण्याचा प्रसंग आला. विलायतेत जाणारे सर्वच लोक दाढी करायला शिकतात, पण केस कापायला कोणी शिकत असतील अशी माझी कल्पना नाही. प्रिटोरियामध्ये एकदा मी एका इंग्रज हजामाच्या दुकानात गेलो. त्याने माझी हजामत करण्याचे साफ नाकारले; आणि नाकारताना जो तिरस्कार व्यक्त केला तो निराळाच. मला वाईट वाटले. लगेच बाजारात जाऊन केस कापण्याचा संच आणला आणि आरशासमोर उभे राहून केस कापले. समोरचे केस कसेबसे कापले तर गेले, पण मागचे कापताना फार पंचाईत पडली. सरळ तर कापता आलेच नाही. कोर्टात हशा पिकला.

“तुमचे केस असे का झाले ? डोक्यावर उंदीर तर नव्हते चढले ?"

मी म्हटले, “नाही. माझ्या काळ्या डोक्याला गोरा हजाम स्पर्श कसा करणार ? त्यामुळे बरेवाईट असले तरी स्वतः कापलेले केस मला बरे वाटतात.”

या उत्तराने मित्रांना आश्चर्य वाटले नाही. खरे पाहता त्या हजामाचा काही दोष नव्हता. काळ्या कातडीच्या लोकांचे तो केस कापू लागला असता तर त्याचा रोजगार मारला गेला असता.

*आत्म. २०२-३.*

८४ बोअर युद्ध जेव्हा झाले तेव्हा माझी स्वतःची सहानुभूती बोअरांकडूनच होती. परंतु अशा बाबतीत व्यक्तिगत विचाराप्रमाणे काम करण्याचा अधिकार मला प्राप्त झालेला नाही असे मला वाटले. या बाबतीतील विचारांच्या ओढाताणीचे सूक्ष्म वर्णन 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा

इतिहास'मध्ये केलेले असल्यामुळे इथे करत नाही. जिज्ञासू वाचकांनी तो इतिहास वाचावा अशी माझी सूचना आहे. ब्रिटिश राज्याबद्दलच्या निष्ठेने मला बळजबरीने मला या युद्धात भाग घ्यायला लावले एवढेच इथे मी सांगतो. ब्रिटिश प्रजाजनाच्या नात्याने ज्याअर्थी मी हक्कांची मागणी करत आहे त्याच नात्याने ब्रिटिश राज्याच्या रक्षणात भाग घेणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटले. हिंदुस्तानची संपूर्ण उन्नती ब्रिटिश साम्राज्यात होणे शक्य आहे असे त्यावेळी मला वाटत होते. त्यामुळे मिळतील तेवढे सहकारी घेऊन आणि अनेक अडचणी सहन करून घायाळ सैनिकांची शुश्रुषा करणारी एक तुकडी आम्ही उभी केली. *आत्म. पृष्ठ २०३.*

८५ असा रीतीने दक्षिण आफ्रिकेत भारतीयांची सेवा करता करता मी स्वतः हळूहळू अनेक गोष्टी सहजपणे शिकत होतो. सत्य एक विशाल वृक्ष आहे. जसजशी त्याची सेवा करावी तसतसे त्याला अनेक फळे लागत असतात. त्यांना अंतच नसतो. सत्यामध्ये जसजसे खोलखोल उतरावे तसतशी त्यातून रत्ने हाती येतात, सेवेचे प्रसंग चालून येतात. *आत्म. पृष्ठ २०७.*

८६ मनुष्य आणि त्याचे काम - या दोन भिन्न वस्तू आहेत. चांगल्या कामाबद्दल आदर आणि वाईट कामाबद्दल तिरस्कार वाटलाच पाहिजे. बरीवाईट कामे करणारांबद्दल नेहमीच आदर अथवा करुणा या भावना आपल्या मनात राहिल्या पाहिजे. ही गोष्ट समजायला सोपी आहे परंतु यानुसार कमीतकमी आचरण होत असते. यामुळेच या जगात विष पसरत असते.

सत्याच्या शोधाच्या मुळात अशी अहिंसा आहे. जोपर्यंत ही अहिंसा हाती लागत नाही तोपर्यंत सत्याचा शोध लागू शकत नाही याची प्रचीती मला क्षणोक्षणी येत असते. व्यवस्था अथवा पद्धती यांच्याविरुद्ध संघर्ष करणे चांगलेच आहे. परंतु आपण सर्व एकाच कुंचल्याने रंगले गेलेलो असल्या मुळे, एकाच परमेश्वराची लेकरे असल्यामुळे व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणे म्हणजे आपल्या स्वत:च्या विरुद्धच संघर्ष करणे होय. व्यवस्थेत किती तरी शक्ती भरलेली असते. व्यवस्थेचा अनादर अथवा तिरस्कार केला तर तो शक्तीचाही अनादर वा तिरस्कार होतो आणि तसे केल्यामुळे व्यवस्थापकाला अथवा जगाला हानी पोहोचते. *आत्म. पृष्ठ २६१*

८७ माझ्या जीवनात अशा त-हेचे अनेक प्रसंग वारंवार घडून आले आहेत की ज्यामुळे मी भिन्न धर्माच्या व जातीच्या लोकांच्या निकट सहवासामध्ये येऊ शकलो. या सर्वांच्या अनुभवावरून एवढे सांगता येईल की आप्त आणि परके, देशी आणि परदेशी, गोरे आणि काळे, हिंदू आणि मुसलमान किंवा ख्रिश्चन पारशी अथवा यहुदी यांच्यामध्ये भेद कसा तो कधी माझ्या मनाला शिवलेलाही नाही. माझे हृदय असे भेद ओळखूच शकत नाही असे, मी सांगू शकतो.

*आत्म. पृष्ठ २६१.*

८८ संस्कृतचा माझा सखोल अभ्यास नाही. अनुवादाच्या स्वरूपातच मी वेद आणि उपनिषद वाचले आहेत. त्यामुळे मी त्यांचा जो अभ्यास केला आहे तो विद्वत्तापूर्ण आहे असे म्हणता येऊ शकत नाही. त्या बाबतीतील माझे ज्ञान सखोल आहे असे समजले जाऊ शकत नाही. परंतु एका हिंदूने त्यांचा जसा अभ्यास केला पाहिजे तसाच मी त्यांचा अभ्यास केला आहे. आणि त्यातील खरी भावना माझ्या मनाला कळली आहे असा माझा दावा आहे. एकवीस वर्षांचा होईपर्यंत इतरही धर्मांचा माझा अभ्यास झालेला होता.

माझ्या जीवनात एक काळ असा होता की जेव्हा मी हिंदू धर्म आणि ख्रिश्चन धर्म यांच्यामध्ये झुलत होते. परंतु जेव्हा परत माझी मानसिक परिस्थिती स्थिरावली तेव्हा हिंदू धर्माद्वारेच मला मोक्षप्राप्ती होऊ शकते असे मला जाणवले. त्यामुळे हिंदू धर्मावरील माझी श्रद्धा अधिक सखोल आणि समंजसपणाची झाली, प्रबुद्ध झाली.

परंतु तेव्हाही माझा विश्वास होता की अस्पृश्यता हिंदू धर्माचा भाग नाही आणि जर ती हिंदू धर्माचा भाग असेल तर असा हिंदू धर्म माझ्याकरिता नाही. *मो. क. गां. पृष्ठ ४९.*

८९ इतिहासाच्या रूपात आत्मकथेची अपूर्णता आणि तिच्यातील अडचणी यासंबंधी आधी मी जे वाचले होते त्याचा अर्थ आज अधिक चांगला माझ्या लक्षात येतो आहे. मला माहीत की सत्याच्या प्रयोगाच्या या आत्मकथेत जेवढ्या माझ्या आठवणी आहेत तेवढ्या मी सांगितलेल्या नाहीत. सत्याची प्रचीती आणून देण्याकरिता मी किती सांगायला हवे आणि किती नको ते कोण

सांगू शकेल ? या एकांगी आणि अपूर्ण साक्षीची न्यायालयात किती किंमत केली जाईल हे तरी कोण सांगू शकेल ? लिहिलेल्या प्रकरणांसंबंधी सवडीत असलेला एखादा माणूस वाद घालू लागला तर तो या प्रकरणांवर किती प्रकाश टाकू शकेल ? आणि टीकाकार म्हणून तो या आत्मकथेची चिकित्सा करू लागला तर किती 'ढोंगे' उघडकीला आणून जगाची करमणूक करू शकेल आणि स्वतःही फुलून जाईल ? *आत्म. पृष्ठ २६५.*

९० वर्तमानपत्रे सेवाभावनेनेचे चालवली पाहिजे हे 'इंडियन ओपिनियन'च्या पहिल्या महिन्याच्या कारकिर्दीवरून माझ्या लक्षात आले. वर्तमानपत्र ही महान शक्ती आहे. परंतु ज्याप्रमाणे पाण्याचा निरंकुश लोट गावचे गाव बुडवून टाकतो, आणि पिकांचा नाश करतो त्याचप्रमाणे लेखणीची निरंकुश गती विनाशक होते. हा अंकुश बाहेरून लादण्यात आल्यास तो निरंकुशतेपेक्षाही अधिक घातक ठरतो. अंतर्गत अंकुशच लाभदायी ठरत असतो. आंतरिक अंकुशच लाभदायी होऊ शकतो. ही विचारसरणी बरोबर असेल तर जगातील किती वर्तमानपत्रे या कसोटीवर टिकतील ? परंतु बेकार वृत्तपत्रांना बंद कोणी करावे ? कुणी कुणाला नावे ठेवावी ? चांगली आणि वाईट अशी दोन्ही प्रकारची वृत्तपत्रे सोबतसोबतच सुरू राहतील. त्यातून माणसाला आपली निवड करावी लागेल. *आत्म. पृष्ठ २५९.*

९१ यापूर्वी (अन टु धिस लास्ट) रस्किनचे मी एकही पुस्तक वाचले नव्हते. विद्यार्थीदशेत अभ्यासाच्या पलीकडचे माझे वाचन नाहीसारखेच म्हणता येईल. कर्मभूमीमध्ये प्रवेश केल्यानंतर वेळ फार थोडा मिळे. त्यामुळे आजही असेच म्हणता येईल की माझे पुस्तकांचे ज्ञान तुटपुंजे आहे. सहजासहजी किंवा निरुपायास्तव पाळल्या गेलेल्या या संयमामुळे माझे काही एक नुकसान झालेले नाही असा माझा समज आहे. पण जी थोडी पुस्तके मी वाचली ती चांगली पचवली आहेत असे म्हणता येईल. अशा पुस्तकांपैकी हेच एक असे पुस्तक म्हणता येईल की ज्याने माझ्या जीवनामध्ये तात्काळ रचनात्मक फेरफार घडवून आणला. नंतर मी त्याचे भाषांतरही केले व ते सर्वोदय या नावाने छापलेले आहे.

माझा विश्वास आहे की जी गोष्ट माझ्यामध्ये खोलवर लपलेली होती. तिचेच स्पष्ट प्रतिबिंब रस्किनच्या या ग्रंथरत्नामध्ये पाहावयास मिळाले. त्यामुळे त्याने माझ्यावर संपूर्ण ताबा मिळवला आणि त्याच्यातील विचारांची अंमलबजावणी माझ्याकडून करवली. आपल्यामध्ये ज्या सद्भावना सुप्त असतात त्या जागृत करण्याची शक्ती ज्याच्यामध्ये असते तो कवी होय. सर्वांमध्ये सर्वच चांगल्या भावना एकसारख्या प्रमाणात नसल्यामुळे सर्व कवींचा सर्वांवरच सारखा परिणाम होत नाही. *आत्म. पृष्ठ २८४.*

९२ घर थाटून बसल्यानंतर स्थिरपणे एका ठिकाणी राहण्याचे माझ्या कधी नशिबातच आले नाही. जोहान्सबर्गमध्ये मी नित्यक्रमात रुळल्यासारखा होतो न होतो इतक्यात एक अकल्पित घटना घडून आली. नाताळमध्ये झुलूंनी बंड केल्याची बातमी वृत्तपत्रातून वाचायला मिळाली. झुलू लोकांशी माझे कोणतेच वैर नव्हते. त्यांनी एकाही हिंदुस्तानी माणसाचे काहीही वाकडे केले नव्हते. 'बंड' या शब्दाच्या औचित्याबद्दलही मला शंका होती. परंतु त्या काळात ब्रिटिश साम्राज्याला जगाकरिता कल्याणकारी समजत होतो. त्यामुळे माझी निष्ठा अंतःकरणापासून होती. त्या साम्राज्याचा नाश मला नको होता. त्यामुळे सरकार आपली शक्ती न्यायाने वापरत आहे की अन्यायाने हा विचार माझ्या कर्तव्यपालनाच्या आड येण्यासारखा नव्हता. नाताळवर संकट आले तर रक्षण करण्यासाठी त्याच्याजवळ स्वयंसेवकांचे लष्कर होते आणि संकटकाळी त्याच्यामध्ये पुरेशी भरतीही होण्यासारखी होती. स्वयंसेवकांचे लष्कर हे बंड मोडण्याकरिता बाहेर पडल्याचेही मी वाचले. *आत्म. पृष्ठ २९८-९९.*

९३ 'बंडाच्या' ठिकाणी जाऊन पाहतो तर तिथे बंड म्हणावे असे काहीही नव्हते. बंड म्हणावयास कारण एवढेच की झुलू लोकांवर नवीन कर लादण्यात आला होता. तो देऊ नये असा सल्ला एका झुलू सरदाराने आपल्या लोकांना दिला आणि कर वसूल करण्याकरिता गेलेला एक सार्जंट त्याने कापून काढला. ते काहीही असो, माझे हृदय झुलू लोकांच्या बाजूला होते आणि ठाण्यावर पोहोचल्यानंतर जेव्हा मुख्यतः झुलू जखमी लोकांची शुश्रुषा करण्याचेच काम आमच्याकडे आले तेव्हा मला फार समाधान वाटले. तेथील डॉक्टर अधिका-याने आमचे स्वागत

केले. तो म्हणाला, 'या जखमी लोकांची शुश्रुषा करण्याकरिता कोणतेही गोरे लोक तयार होत नाहीत. मी एकटा किती लोकांकडे पाहणार ? त्यांच्या जखमा सडून जात आहेत. आता तुम्ही आलात ही या निर्दोष लोकांवर ईश्वराचीच कृपा झाली असे मी तरी समजतो.' असे म्हणून त्याने पट्ट्या, जंतुनाशक पाणी वगैरे माझ्याजवळ दिले आणि मला त्या रोग्यांजवळ घेऊन गेला. जखमी लोकांनाही आम्हाला पाहून आनंद झाला. त्या जखमी झुलूंच्या जखमा साफ करू नये म्हणून गोरे या शिपाई जाळीतून खुणा करून आम्हांला सांगत होते. आम्ही त्यांचे ऐकले नाही म्हणून ते आमच्यावर चिडत. झुलू लोकांविषयी ते जे अपशब्द बोलत त्यामुळे तर कान किटत असत. *आत्म. पृष्ठ ३००*

९४ ज्या जखमी शिपायांचे काम आमच्याकडे सोपवण्यात आले होते तेही लढाईत घायाळ झालेले शिपाई होते असे कोणी समजू नये. त्यांच्यापैकी काही जणांना वहिमावरून कैद केलेले होते; त्यांना सेनापतींनी फटक्यांची शिक्षा फर्मावली होती. चाबकाचे हे वळ औषधपाणी न मिळाल्यामुळे सुजून आले होते. इतर काही मित्र समजले जाणारे झुलू होते. त्यांनी मैत्री दर्शवणारी चिन्हे धारण केली असताही चुकीने शिपायांनी त्यांना घायाळ केले होते. *आत्म. पृष्ठ ३००*

९५ झुलू बंडामध्ये मला खूप अनुभव मिळाले, आणि विचारही करायला मिळाला. युद्धाचा भयंकरपणा बोअर युद्धामध्ये जेवढा जाणवला नव्हता तेवढा इथे जाणवला. येथे लढाई नव्हे तर माणसाची शिकार चालली होती. माझे एकट्याचेच हे मत नव्हे तर ज्यांच्याशी बोलण्याचा मला प्रसंग आला त्या इंग्रज लोकांचेही असेच मत होते. सकाळच्या प्रहरी लष्कर खेडेगावात जाऊन फटाके वाजवीत असावे अशा त-हेचे त्यांच्या बंदुकांचे आवाज आम्हा दूर असणा-यांना ऐकू येत. हे आवाज ऐकणे आणि त्यामध्ये राहणे मला असह्य झाले. पण कडू औषधाचा तो घोट मी पिऊन टाकला. माझ्या वाट्याला काम आले तेही झुलू लोकांच्या सेवेचेच आले. आम्ही गेलो नसतो तर दुसऱ्या कोणी त्यांची शुश्रुषा केली नसती हे मला दिसतच होते. एवढ्यावर मी माझ्या मनाचे सांत्वन केले. *आत्म. पृष्ठ ३०१*

९६ मन-वचन-काया यांनी ब्रह्मचर्याचे पालन कसे करावे याची मला काळजी होती. त्याचबरोबर सत्याग्रह युद्धाकरिता अधिकात अधिक वेळ वाचून शुद्धी कशी व्हावी ही मला वाटणारी दुसरी काळजी होती. या काळज्यांनी आहारात अधिक संयमन आणि नवीन फेरफार करण्यास लावले. शिवाय पूर्वी जे फेरफार मुख्यत्वेकरून आरोग्याच्या दृष्टीतून करत असे, ते आता धार्मिक दृष्टीने होऊ लागले.

यामध्ये उपवास आणि अल्पाहार यांना अधिक स्थान मिळाले. ज्या माणसाला विषयवासना आहे त्याच्यामध्ये जिभेची स्वादलोलुपताही भरपूर असायचीच. माझीही तीच स्थिती होती. जननेंद्रिय व स्वादेंद्रिय यांच्यावर पूर्ण जय मिळवला आहे असे अद्यापही मी म्हणू शकत नाही. मी स्वतःला अत्याहारी मानत आलो आहे. मित्रमंडळी ज्याला माझा संयम समजतात त्याला मी कधीच संयम समजत नाही. थोडासा जो संयम करायला मी शिकलो तेवढाही करू शकलो नसतो तर मी पशुपेक्षाही नीच कोटीतला ठरलो असतो आणि माझा कधीच नाश झाला असता. माझ्यातील दोषांची मला पूर्ण जाणीव असल्यामुळे मी ते दूर करण्याचा भगीरथ प्रयत्न केला आहे, असे म्हणता येईल; आणि म्हणूनच इतकी वर्षे हे शरीर मला टिकवून धरता आले व त्याच्याकडून थोडेबहूत काम घेता आले. *आत्म. पृष्ठ ३०५-६*

९७ मी फलाहार करण्यास सुरुवात केली. परंतु संयमाच्या दृष्टीने फलाहार आणि धान्याहार यांमध्ये विशेष फरक दिसून आला नाही. ज्याला आपण धान्य म्हणतो त्यातून आपण जे स्वाद मिळवतो ते सर्व स्वाद फलाहारामधूनही मिळतात; आणि सवय झाल्यानंतर तर फलाहारातून अधिक चव मिळते, असे मला दिसून आले आले. म्हणून धार्मिक दिवशी उपवास किंवा एकदा जेवण यांनाच मी अधिक महत्त्व देऊ लागलो. शिवाय प्रायश्चित्तासारखे थोडेसेही काही कारण मिळाले की, मी एक दिवसाचा उपवास करून टाकत असे.

यातूनही मला अनुभव आला की, शरीर अधिक स्वच्छ झाल्यामुळे तोंडाची चव वाढली, भूक अधिक चांगली लागू लागली, आणि मला दिसून आले की उपवास वगैरे जेवढ्या अंशी संयमाचे साधन आहे, तेवढ्याच अंशी ते भोगाचेही साधन होऊ शकते. हे ज्ञान झाल्यानंतर त्याचेच

समर्थन करणारे अशाच प्रकारचे अनुभव मला त्याचप्रमाणे इतरांना, कितीदा तरी आले आहेत. शरीर अधिक चांगले व कसलेले बनवणे हा जरी माझा हेतू असला, तरी पण यापुढे मुख्य हेतू संयम करणे, स्वाद जिंकणे हाच झाला. त्या दृष्टीने आहारातील निरनिराळ्या वस्तू सोडून तिच्याऐवजी दुसरी घ्यावी तर तिच्यातून अधिकच गोडी वाटू लागे ! *आत्म. पृष्ठ ३०६*

९८ अनुभवाने लक्षात आले की, अशा स्वादसुखामध्ये रमून राहणे हेही अयोग्यच होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर माणसाने स्वादासाठी नव्हे तर शरीरधारणेसाठी खावे. प्रत्येक इंद्रियाचे व्यापार जेव्हा शरीराच्या हिताच्या दृष्टीने व शरीरामार्फत आत्मदर्शन करण्याच्या दृष्टीने चालतात, तेव्हा त्यांतील इंद्रियसुख शून्यवत होते; आणि तेव्हाच इंद्रिये स्वाभाविकपणे वागत आहेत असे म्हणता येईल.

अशा त-हेची स्वाभाविकता साधण्यासाठी प्रयोग करावे तेवढे थोडेच आहेत. आणि ते करत असताना अनेक शरीरांची आहुती द्यावी लागली तरी त्याची आपण पर्वा करू नये. सध्या याच्या उलट प्रवाह चालू आहे. नाशिवंत शरीराच्या शृंगारासाठी, त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी आपण अनेक प्राण्यांची आहुती देत असतो. त्यामुळे उलट शरीर व आत्मा या दोघांचीही हानीच होते. *आत्म. पृष्ठ ३०६-७*

९९ जेलचा पहिला अनुभव मला १९०८ साली मिळाला. त्या मुदतीत मला दिसून आले की, जेलमध्ये कैद्यांना पाळावे लागणारे कित्येक नियम संयमी किंवा ब्रह्मचारी इसमाने स्वखुशीने पाळण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, कैद्यांनी सूर्यास्तापूर्वी पाच वाजेपर्यंत जेवून घेतले पाहिजे. त्यांना – हिंदी व हब्शी कैद्यांना – चहा किंवा कॉफी मिळंत नसे. मीठ खायचे झाल्यास निराळे घ्यायचे. स्वादासाठी काहीच खायचे नाही. *आत्म. पृष्ठ ३११*

१००. जेलमध्ये बरीच धडपड करून आवश्यक तेवढे परिवर्तन आम्ही तिथे घडवून आणले. परंतु केवळ संयमाच्या दृष्टीने पाहायचे तर, दोन्ही प्रतिबंध चांगलेच होते. असे प्रतिबंध जेव्हा जबरदस्ती लादले जातात तेव्हा ते सफल होत नाहीत. परंतु स्वेच्छापूर्वक स्वीकारलेले निर्बंध फार हितकारक

होतात. म्हणून तुरुंगातून सुटल्यानंतर लगेच मी तसे फेरफार करून टाकले. होता होईल तो चहा पिणे बंद केले आणि संध्याकाळी लवकर जेवण्याची सवय पाडली जी आता स्वाभाविक झाली आहे. *आत्म. पृष्ठ ३११-१२.*

१०१ इंद्रियनिग्रहाच्या हेतूने केलेल्या उपोषणाचा संयमाच्या कामी उपयोग होऊ शकतो. काही मित्रांचा अनुभव आहे की उपवासाच्या समाप्तीनंतर विषयेच्छा आणि स्वाद तीव्र होतात. याचा अर्थ असा आहे की, उपवासाच्या दिवसात विषयांना संयमित करण्याची आणि स्वादाला जिंकण्याची भावना ठेवली तरच त्याचा परिणाम शुभ होऊ शकतो. हेतूपूर्वक किंवा मन:पूर्वक न केलेल्या उपवासाचा स्वतंत्र परिणाम विषयनिग्रहच होईल असे मानणे अगदी चुकीचे होईल.

*आत्म. पृष्ठ ३१८*

१०२ सारांश उपवास वगैरे संयमी माणसाच्या मार्गामध्ये साधन म्हणून आवश्यक आहेत. पण तेवढ्याने सर्व काही भागत नाही. आणि जर शारीरिक उपवासाबरोबर मनाचा उपवास नसेल तर तो दंभच म्हणावा लागेल व तो हानिकारक होईल. *आत्म. पृष्ठ ३१८*

१०३ टॉलस्टॉय आश्रमात सुरुवातीपासून अशी पद्धत होती की जे काही काम आम्ही शिक्षक करणार नाही ते मुलांकडूनही करवून घेऊ नये. त्यामुळे ते काम करताना त्यांच्याबरोबर एक शिक्षकही राही. त्यामुळे मुले हौसेने शिकत. *आत्म. पृष्ठ ३२१*

१०४ पाठ्यपुस्तकांसंबंधी अनेकदा ओरड करण्यात येत असते. पण मला त्यांची उणीव कधीच जाणवली नाही. असलेल्या पुस्तकांचाही विशेष उपयोग केल्याचे मला स्मरत नाही. माझी अशी समजूत आही की, शिक्षक हेच विद्यार्थ्याचे पाठ्यपुस्तक असावे. शिक्षकांनी पुस्तकातून शिकवलेले असे फारच थोडे आज माझ्या स्मरणात आहे. त्यांनी स्वमुखाने शिकवले ते मात्र आजही आठवते.

मुले डोळ्यांनी जेवढे ग्रहण करतात, त्यापेक्षा कानांनी कमी श्रमात अधिक ग्रहण करू शकतात. मुलांकडून एक तरी पुस्तक संपूर्ण वाचून घेतल्याचे मला स्मरत नाही. परंतु अनेक

पुस्तकांच्या वाचणातून मी स्वत: जे पचवले होते, ते मी त्यांना त्यांच्या भाषेत सांगत असे. मी तोंडी सांगत असे आणि ते ते मला लगेच म्हणून दाखवत असत. वाचायचा त्यांना कंटाळा येई. मीच श्रमामुळे किंवा अन्य कारणांनी मंद व निरस झालो तर गोष्ट वेगळी. नाहीपेक्षा सांगितलेले ऐकण्यात त्यांना गोडी वाटे. त्यांच्या मनामध्ये प्रश्न उद्‌भवून त्यांची उत्तरे देताना मला त्यांच्या ग्रहणशक्तीचाही अंदाज येत असे. *आत्म. पृष्ठ ३२२-२३*

१०५ शारीरिक शिक्षण शरीराच्या कसरतीने देता येते, बौद्धिक शिक्षण बुद्धीच्या कसरतीने त्याचप्रमाणे आत्म्याचे शिक्षण आत्म्याच्या कसरतीने देता येणार. आत्म्याची कसरत शिक्षकाच्या वर्तनानेच प्राप्त होणार. म्हणून युवक पाहत असो वा नसो सदासर्वदा शिक्षकाने सावध राहिले पाहिजे. *आत्म. पृष्ठ ३२४*

१०६ मी खोटे बोलत गेलो आणि स्वतःच्या शिष्यांना मात्र सच्चे बनवण्याचा प्रयत्न केला, तर तो व्यर्थच जायचा. भित्रा शिक्षक शिष्यांना शौर्य शिकवू शकणार नाही. व्यभिचारी शिक्षक शिष्यांना संयम कसा शिकवणार ? मी मनाशी ठरवले की, माझ्यापाशी असलेले तरुण मुलगे व मुली यांना मी वस्तुपाठरूप होऊन राहिले पाहिजे. अशा त-हेने माझे शिष्यच माझे शिक्षक बनले. स्वतःसाठी नाही तर त्यांच्यासाठी तरी मला चांगले झाले पाहिजे व चांगले राहिले पाहिजे हे माझ्या ध्यानात आले. टॉलस्टॉय आश्रमातील माझा बहुतेक संयम या मुलामुलींमुळेच झाला असे म्हणायला हरकत नाही.

आश्रमात एक मुलगा आडदांडपणा करी, खोटे बोले, कुणाला जुमानत नसे व इतरांबरोबर भांडत असे. एके दिवशी त्याने फारच दंगा केला. मी फिकिरीत पडलो. विद्यार्थ्यांना मी कधी शिक्षा करत नसे. या वेळी मला फार राग आला. मी त्याच्याकडे गेलो. त्याची समजूत घालावी तर त्याची समजूत पटेना. त्याने मला फसवण्याचाही प्रयत्न केला. मी जवळ पडलेला रूळ उचलला आणि त्याच्या दंडावर मारला. मारताना मी कापत होतो हे त्याच्या लक्षात आले असावे. अशा त-हेचा अनुभव माझ्या बाबतीत कोणाही विद्यार्थ्याला आला नव्हता. विद्यार्थी रडू लागला. त्याने माझ्यापाशी माफी मागितली. त्याला रूळ लागून दुःख झाले यासाठी तो रडला नाही. मनात

आणता तर तो मला भारी झाला असता इतकी शक्ती त्याच्यामध्ये होती; त्याचे वय सतरा वर्षांचे होते; बांध्याने तो मजबूत होता. पण माझ्या रुळात त्याला माझे दु:ख दिसून आले. या प्रसंगानंतर तो कधी माझ्याविरुद्ध गेला नाही. पण मला मात्र तो रूळ मारल्याबद्दल अजून पश्चात्ताप होतो आहे. मला धास्ती वाटते की त्याला मारून मी आत्म्याचे नव्हे तर आपल्या पशुतेचे आविष्करण केले.

मारहाण करून मुलांना शिकवण्याच्या पद्धतीच्या मी नेहमीच विरोधी राहत आलो आहे. माझ्या मुलातील एकाला मारल्याची एकच घटना मला आठवते. रुळाने मारण्याचे काम योग्य होते की नाही याचा निर्णय मी आजपर्यंत करू शकलेलो नाही. या शिक्षेच्या संयुक्ततेविषयी मला शंका आहे. कारण तिच्या मागे राग होता व शिक्षा करण्याचा हेतू होता. जर तीत केवळ माझ्या दु:खाचे प्रदर्शन असते तर ती शिक्षा मी योग्यच म्हटली असती. परंतु तिच्यात संमिश्र भावना होती.

*आत्म. पृष्ठ ३२४-२५.*

१०७ त्यानंतर असेच दोष मुलांकडून घडले पण मी दंडनीतीचा कधीच अवलंब केला नाही. अशा त-हेने दुस-याला ज्ञान देण्याचा प्रयत्न करत असताना मला स्वतःच्या आत्म्याच्या गुणधर्माचे ज्ञान अधिक होऊ लागले. *आत्म. पृष्ठ ३२५.*

१०८ त्या दिवसांत जोहान्सबर्ग आणि फिनिक्सला माझे येणे जाणे सुरू असायचे. एकदा मी जोहान्सबर्गमध्ये असताना दोन व्यक्तींच्या भयंकर पतनाची बातमी मला कळली. सत्याग्रहाच्या महान संघर्षात कोठेही अपयश आल्यासारखे दिसले तरी त्याने माझ्या मनाला धक्का बसत नसे. पण या बातमीने जणू माझ्यावर वज्राघातच केला. माझ्या हृदयाला मोठी जखम झाली. मी त्याच दिवशी फिनिक्सची गाडी पकडली. *आत्म. पृष्ठ ३२७.*

१०९ माझा धर्म काय याचा रस्त्यात मी नीट विचार केला. अथवा तो मला समजला अशी मी मनाची समजूत करून घेतली असेही म्हणता येईल. मला असे वाटले की आपल्या देखरेखीखाली राहिलेल्यांच्या पतनाला पालक किंवा शिक्षक काही अंशाने जबाबदार असतात. या प्रसंगाबद्दलची

माझी जबाबदारी तर मला स्पष्ट दिसत होती. माझ्या पत्नीने मला सूचनाही दिली होती. पण मी स्वभावतः विश्वासावर चालणारा असल्यामुळे मी तिची सूचना मनावर घेतली नाही. शिवाय माझी अशीही कल्पना होती की मी जर या पतनाबद्दल प्रायश्चित्त घेतले तरच त्या पतितांना माझे दुःख कळून येईल. आणि त्यामुळे त्यांना स्वतःच्या चुकीचा जाणीव होईल तसेच तिच्या गांभीर्याचीही थोडीबहुत कल्पना येईल. म्हणून मी सात दिवस उपवास व साडेचार महिने एकभुक्त राहण्याचे व्रत घेतले. *आत्म. पृष्ठ ३२७*

११० माझ्या उपवासामुळे सर्वांना कठीण तर वाटलेच, पण त्यामुळे वातावरण निर्मळ झाले. पापाचरणाची भयानकता सर्वांच्या लक्षात आली, आणि विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचा आणि माझा संबंध अधिक दृढ आणि सरळ झाला. *आत्म. पृष्ठ ३२८*

१११ वकिलीच्या व्यवसायात मी कधीही असत्याचा प्रयोग केला नाही. आणि माझ्या वकिलीचा मोठा भाग सेवा कार्यांसाठी अर्पण केलेला होता. त्या कामाकरिता येणा-या खर्चापेक्षा मी अधिक काहीही घेत नसे. केव्हा केव्हा तर हा खर्चही मी माझ्या खिशातून करत असे.... खोटे बोलल्याशिवाय वकिलीच्या व्यवसायात चालायचेच नाही असे मी विद्यार्थीदशेत असतानाही ऐकत असे. मला तर खोटे बोलून प्रतिष्ठाही मिळवायची नव्हती आणि धनही कमवायचे नव्हते. त्यामुळे त्या गोष्टीचा माझ्या मनावर परिणाम होत नसे. दक्षिण आफ्रिकेत याची परीक्षा अनेकदा झाली आहे. प्रतिपक्षाच्या साक्षीदारांना पढवलेले आणि माझ्या अशिलाच्या साक्षीदाराला मी थोडेसे जरी खोटे बोलायला प्रोत्साहन दिले तरी माझ्या अशिलाचा विजय होऊ शकेल हे मला माहीत असायचे. परंतु या मोहापासून मी नेहमीच दूर राहिलो. एकच अशी घटना मला आठवते की माझ्या अशिलाने खटला जिंकल्यानंतर त्याने मला धोका दिला असल्याची जाणीव मला झाली. अशिलाच्या दाव्यात सत्य असेल तर तो जिंकावा अन्यथा प्रतिपक्षाचा विजय व्हावा असेच मला नेहमी वाटत असे. फी घेताना हार-जीत या आधारावर मी कधी फी ठरवली असेल असे मला आठवत नाही. अशील हारो वा जिंको, मी नेहमी माझा मेहनतानाच मागत असे व तो खटला जिंकल्यानंतरही तेवढीच आशा ठेवत असे.

अशिलाला मी सुरुवातीलाच सांगत असे की, 'दावा खोटा असेल तर माझ्याकडे येऊ नकोस, साक्षीदाराला पढवण्याचे काम माझ्याकडून होईल अशी अपेक्षा करू नकोस'. अखेरीस या बाबतीत माझा एवढा लौकिक पसरला की खोट खटले माझ्याकडे येतच नसत. काही अशील असेही होते की जे खरे खटले माझ्याकडे आणायचे आणि थोडीशीही शंका असेल तर ते खटले दुस-या वकिलाकडे नेत. *आत्म. पृष्ठ ३४६-४७.*

११२ वकिली करत असताना मी अशीही सवय लावली की माझे अज्ञान मी अशिलांपासूनही लपवायचे नाही आणि वकिलांपासूनही. जिथे कुठे मला काही सुचत नसे तिथे तिथे मी अशिलाला दुस-या वकिलाकडे जाण्याकरिता सांगत असे. तरीही त्याने मलाच वकील केले तर अधिक अनुभवी वकिलाचा सल्ला घेऊन मी करेन असे मी त्या अशिलाला सांगत असे. माझ्या या प्रांजलपणामुळे मला माझ्या अशिलांचे अगाध प्रेम व विश्वास संपादू शकलो. मोठ्या वकिलाकडे जाण्याकरिता जी फी द्यावी लागायची तीही ते मोठ्या आनंदाने द्यायचे. या विश्वासाचा आणि प्रेमाचा लाभ मला माझ्या सार्वजनिक कामात मिळाला. *आत्म. पृष्ठ ३५१*

११३ १९१४ साली जेव्हा सत्याग्रहाचा लढा समाप्त झाला, तेव्हा गोखल्यांच्या इच्छेवरून मला इंग्लंडहून स्वदेशी जायचे होते.... ४ ऑगस्टला युद्धाची घोषणा झाली आम्ही ६ ऑगस्टला विलायतेत पोहोचलो. *आत्म. पृष्ठ ३२९-३१.*

११४ माझे असे मत होते की विलायतेत राहणा-या भारतीयांनी युद्धात स्वतःचा वाटा उचलला पाहिजे. इंग्रज विद्यार्थ्यांनी लढाईमध्ये भाग घेण्याचा आपला निर्धार जाहीर केलेला होता. हिंदी विद्यार्थ्यांनी मागे राहून चालणार नाही. या युक्तीवादाविरुद्धही त्या सभेत पुष्कळ मतभेद झाले. 'आपल्या व इंग्रजांच्या स्थितीमध्ये हत्तीघोड्याएवढे अंतर आहे. एक गुलाम, दुसरे सरदार. अशी स्थिती असताना अडचणीच्या प्रसंगी स्वेच्छापूर्वक धन्याला मदत कशी करू शकणार ? धन्याच्या अडचणींचा स्वतःच्या मुक्ततेकरिता फायदा घेणे हे गुलामगिरीतून मुक्त होऊ इच्छिणा-या गुलामाचे कर्तव्य नाही काय ?' हा युक्तिवाद त्या वेळी मला कसा पटावा ? दोघांच्या स्थितीतील भेद मला

कळत नव्हता असे नाही. आमची स्थिती केवळ गुलामगिरीची आहे, असे तरीही त्या वेळी मला वाटत नव्हते. माझी अशी समजूत होती की, इंग्रजी राज्यपद्धतीत दोष होते त्यापेक्षा कित्येक इंग्रज अधिका-यांमध्ये अधिक दोष होते. ते दोष आपण प्रेमाने दूर करू शकू. जर इंग्रजांमार्फत वा त्यांच्या साह्याने आपण आपली स्थिती सुधारण्याची इच्छा करत असू तर, त्यांच्या अडचणीच्या प्रसंगी त्यांना मदत करूनच आपण आपली परिस्थिती सुधारून घेतली पाहिजे. राज्यपद्धती सदोष असली तरी आज जशी ती असह्य वाटते तशी त्या वेळी ती वाटत नव्हती. परंतु आज ज्याप्रमाणे त्या पद्धतीवरून माझा विश्वास उडून गेला आहे आणि त्यामुळे आज इंग्रज राज्याला मी मदत करत नाही त्याचप्रमाणे त्यावेळी इंग्रजांच्या राज्यपद्धतीवरूनच नाही तर त्यांच्या अंमलदारांवरूनही विश्वास उडून गेला होता ते मदत करायला कसे तयार होऊ शकत होते ?

*आत्म. पृष्ठ १३१-३२.*

११५ माझी समजूत अशी होती की इंग्रजांच्या आपत्तीची ही वेळ आपल्या मागण्या करण्याची वेळ नाही. लढाई चालू असताना आपल्या मागण्या तहकूब करणे यातच सभ्यता आणि दूरदृष्टी असल्याचे मला दिसत होते. त्यामुळे मी माझ्या सल्ल्यावर दृढ राहिलो आणि ज्यांना स्वयंसेवकांच्या भरतीकरिता आपली नावे नोंदवायची असतील त्यांनी ती नोंदवावी असे मी सांगितले. *आत्म. पृष्ठ ३३२*

११६ युद्धाची अनैतिकता आम्हा सर्वांना मान्य होती. मला मारहाण करणा-यांवर फिर्याद करण्यास मी तयार नव्हतो. तर मग दोन राज्यांमध्ये लढाई सुरू झाली असता, त्यांच्या परस्पर गुणदोषांची मला माहितीही नसताना, मी त्यात भाग कसा घ्यावा ? बोअर युद्धामध्ये मी भाग घेतल्याचे मित्रांना माहीत होतेच; तरी पण त्यांची अशी कल्पना होती की, त्यानंतर माझे मतपरिवर्तन झाले असावे.

खरे पाहता ज्या विचारसरणीला अनुसरून मी बोअर युद्धामध्ये पडलो होतो त्याच विचारसरणीचा उपयोग या वेळीही मी केला होता. युद्धात भाग घेण्याचा अहिंसा तत्त्वाशी मेळ

बसत नाही हे मला पूर्णपणे कळत होते. परंतु कर्तव्याचे ज्ञान हे सूर्यप्रकाशाप्रमाणे नेहमीच स्पष्ट नसते. सत्याच्या पुजा-याला अनेकदा अंधारात ठेचाळावे लागत असते. *आत्म. पृष्ठ ३३३-३४.*

११७ दक्षिण आफ्रिकेत घायाळांना मदत करण्याकरिता आणि हिंदुस्तानात युद्धाच्या मोर्च्यावर जाण्याकरिता मी युद्धाच्या उद्दिष्टांना मदत केलेली नव्हती, तर ब्रिटिश साम्राज्याला केली होती. त्यावेळी माझा विश्वास होता की अंतिमतः ब्रिटिश साम्राज्य आमच्याकरिता हितकारक असल्याचे सिद्ध होईल. युद्धाबद्दल आज जेवढा तिरस्कार मला वाटतो तेवढाच तेव्हाही वाटत होता. ज्याप्रमाणे आज मी बंदूक उचलू शकत नाही त्याचप्रमाणे त्या वेळीही उचलू शकत नव्हतो. परंतु माणसाचे जीवन सरळ रेषा नाही. कर्तव्याचा समूह त्यात कार्यरत असतो. आणि अनेकदा एक कर्तव्य दुस-या कर्तव्याच्या विरोधी असते, आणि माणसाला दोनमधून एकाच कर्तव्याची निवड करणे भाग पडत असते. युद्धाच्या विरोधात आंदोलन करणारा सुधारक मी त्यावेळी नव्हतो आणि आजही नाही. आपल्या भित्रेपणामुळे अथवा क्षुद्र उद्दिष्टांमुळे वा ब्रिटिश सरकारबद्दलच्या संतापामुळे सैन्यात भरती होण्याचे जे लोक टाळत होते त्यांना एक नागरिक म्हणून त्यावेळी मार्ग दाखवायचा होता. युद्धनीतीवर जोपर्यंत तुमचा विश्वास आहे आणि ब्रिटिश साम्राज्याबद्दलची निष्ठा तुमच्या मनात असल्याचा दावा तुम्ही करत आहात तोपर्यंत सैन्यात दाखल होऊन ब्रिटिश साम्राज्याची मदत करणे तुमचे कर्तव्य आहे असा सल्ला त्यांना देण्यात मला त्यावेळी किंचितही संकोच वाटला नाही.... तलवारीला तलवारीने उत्तर देण्याच्या नीती जरी मला मान्य नसली तरीही चार वर्षांपूर्वी अहिंसेबद्दल काहीच माहिती नसणा-या बेतिया गावातील लोकांना मी म्हणालो होतो की मालमत्ता आणि स्त्रिया यांच्या रक्षणाकरिता शस्त्र न उचलून तुम्ही तुमच्या भित्रेपणाचाच परिचय करून दिला आहे. असे सांगताना मला मुळीच संकोच वाटला नव्हता.... तुमचा जर अहिंसेवर संपूर्ण विश्वास नसेल आणि त्याप्रमाणे तुम्ही वर्तन करू शकत नसाल तर तुमच्या स्त्रियांना पळविणा-याचा सामना आणि त्या स्त्रियांच्या शीलाचे रक्षण तुम्ही शस्त्र उचलून करायला पाहिजे. असे जर तुम्ही करणार नसाल तर तुम्ही धर्म आणि मानवता या दोघांचेही अपराधी ठराल असा सल्ला नुकताच हिंदूंना देण्यात मला किंचितही संकोच वाटला नव्हता. आणि हा सर्व सल्ला

आणि माझे आधीचे आचरण या गोष्टी माझ्या शुद्ध अहिंसा धर्माशी सुसंगत तर आहेतच शिवाय माझ्या अहिंसा धर्माची ती सरळ निष्पत्ती आहे. हा महान सिद्धान्त तोंडाने उच्चारणे सोपे आहे परंतु दु:ख आणि विकार यांनी भरलेल्या जगात त्यानुसार आचरण करणे कठीण काम आहे. ही अडचण दिवसेंदिवस मला अधिकाधिक जाणवते आहे. परंतु अहिंसेशिवाय जीवन जगण्यासारखे राहणार नाही ही माझी श्रद्धाही दिवसेंदिवस बळावते आहे. *हिं. न, ५-११-१९२५, ९६.*

११८ केवळ अहिंसेची कसोटी लावूनच माझ्या वर्तनाचे समर्थन करता येऊ शकणार नाही. हिंसेच्या दृष्टीने शस्त्र धारण करून मारणारा आणि नि:शस्त्र राहून घायाळांची सेवा करणारा यांच्यात काहीच अंतर नाही. दोघेही लढाईत सहभागी होत असतात आणि त्याच उद्दिष्टांनी पुढे जात असतात. दोघेही युद्धअपराधी असतात. परंतु इतकी वर्षे आत्मनिरीक्षण केल्यानंतरही मला असेच वाटते की मी ज्या परिस्थितीत होतो त्या परिस्थितीत बोअर युद्धाच्या वेळी, १९०६ साली झुलूंच्या बंडाच्या वेळी, युरोपमधील महायुद्धाच्या वेळी मी जो मार्ग निवडला होता तोच मार्ग श्रेयस्कर होता.

जीवनाचे संचालन अनेक शक्तींद्वारे होत असते. असा जर एखादा सर्वसामान्य नियम असता की कोणत्याही प्रसंगी ज्याचा अवलंब केला तर कर्तव्य-अकर्तव्यचा प्रश्न सुटू शकेल तर काहीच विचार करावा लागला नसता आणि जीवन फार सोपे झाले असते. परंतु ज्याचा निर्णय इतक्या सहजपणे करता येईल असा एकही प्रसंग मला आठवत नाही.

मी स्वतः युद्धविरोधी आहे. त्यामुळे संधी मिळाल्यानंतरही मारक अस्त्र-शस्त्रांचा प्रयोग करणे मी शिकलो नाही. कदाचित त्यामुळे प्रत्यक्ष मानवसंहारापासून मी वाचलो असेन. परंतु जोपर्यंत पशुबळावर स्थापन झालेल्या शासनाच्या मी अधिनस्थ राहतो आणि त्याने दिलेल्या सोयीसवलतींचा आणि अधिकारांचा उपभोग स्वेच्छेने घेतो तोपर्यंत ते शासन जर एखादे युद्ध लढणार असेल तर त्याला मदत करणे माझ्याकरिता अनिवार्य ठरते. परंतु त्या शासनाबरोबर मी जेव्हा असहकार पुकारतो व त्याने दिलेल्या सवलतींचा यथाशक्ती त्याग करतो तेव्हा त्या शासनाला युद्धात मदत करणे माझ्याकरिता अनिवार्य राहत नाही.

एक उदाहरण घेऊ या. मी एका संस्थेचा सदस्य आहे. त्या संस्थेजवळ काही शेती आहे. त्या शेतीला माकडांपासून नुकसान होऊ शकते अशी शक्यता आहे. सर्व प्राण्यांचा जीव पवित्र आहे अशी माझी मान्यता आहे. त्यामुळे माकडांना इजा करण्याने अहिंसेचा भंग होतो असेही मला वाटते. परंतु पीक वाचवण्याकरिता  माकडांवर हल्ला करण्याकरिता इतरांना प्रोत्साहन देण्यात मी मागेपुढे पाहत नाही. या पापापासून वाचण्याची माझी इच्छा असेल. ती संस्था सोडून अथवा तोडून या पापापासून मी वाचू शकतो. या संस्थेतून बाहेर पडलो की जिथे शेती होत नाही व त्यामुळे कोणत्या ना कोणत्या प्राण्याची हत्या होत नाही असा समाज सापडण्याची शक्यता नसल्यामुळे मी ती संस्था सोडत नाही. त्यामुळे या पापापासून वाचण्याचा मार्ग कधी ना कधी सापडेल या आशेने नम्रतापूर्वक आणि दुःखी अंतःकरणाने माकडांना इजा पोहोचवण्याच्या त्या कामात मी सहभागी होतो.

अशा प्रकारे मी तिन्ही युद्धात सहभागी झालो होतो. ज्या समाजाचा मी एक सदस्य आहे त्या समाजाशी मी संबंध तोडू शकत नाही. तो तोडणे वेडेपणा होईल. या तीनही प्रसंगी ब्रिटिश सराकारशी असहकार करण्याचा माझा काहीच विचार नव्हता. आज त्या शासनाबद्दलची माझी भूमिका अगदीच बदललेली आहे. त्यामुळे त्यांच्या युद्धात मी स्वेच्छेने सहभागी होऊ नये; आणि शस्त्र धारण करण्याकरिता अथवा युद्धात सामील होण्याकरिता कोणी माझ्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न करील तर जेलमध्ये जाण्याची वा फासावर चढण्याची मी तयारी ठेवली पाहिजे.

परंतु एवढ्यानेही प्रश्न सुटत नाही. भारतात राष्ट्रीय सरकार असेल तर त्याच्या कोणत्याही युद्धात सहभागी न होताही अशा प्रसंगाची मी कल्पना करू शकतो की, जेव्हा सैनिकी शिक्षण मिळवण्याची इच्छा ठेवणा-यांना ते शिक्षण देण्यात यावे या बाजूने मला मत देणे माझे कर्तव्य ठरू शकते. अहिंसेवर ज्या प्रमाणात माझा विश्वास आहे त्या प्रमाणात या देशातील सर्व लोकांचा नाही. कोणत्याही समाजाला वा व्यक्तीला बळजबरीने अहिंसक बनवले जाऊ शकत नाही.

अहिंसा अतिशय गूढ पद्धतीने आपले काम करत असते. अहिंसेच्या दृष्टीने कोणत्याही माणसाच्या क्रमाची परीक्षा घेणे कठीण असते. त्याचप्रमाणे अन्य प्रसंगी एखाद्या व्यक्तीचे काम

वरवर हिंसक वाटू शकत असले तरी अहिंसेच्या शुद्ध अर्थाच्या दृष्टीने ते अहिंसक असू शकते व नंतर कधी काळी ते तसे असल्याचे सिद्धही होऊ शकते. त्यामुळे वरील प्रसंगी मी केलेल्या वर्तनाबद्दल मी एवढाच दावा करू शकतो की त्या कामांच्या मुळाशीही अहिंसाच कार्यरत होती. त्यात शुद्ध राष्ट्रीय वा अन्य हिताचा समावेश नव्हता. एखाद्या हिताचा बळी देऊनच राष्ट्रीय वा अन्य हिताचे रक्षण करता येऊ शकते अशी माझी मान्यता नाही.

हा युक्तिवाद यापुढे आता मी लांबवणे योग्य नाही. आपले विचार व्यक्त करण्याकरिता अखेरीस भाषा हे अपूर्ण साधन आहे. माझ्याकरिता अहिंसा केवळ तात्त्विक सिद्धान्त नाही. ती तर माझ्या जीवनाचा नियम आहे; तिच्याशिवाय मी जगूच शकत नाही. कधी जाणीवपूर्वक तर अनेकदा अजाणता हिचे पालन करणे मला शक्य झालेले नाही हे मला माहीत आहे. अहिंसा बुद्धीचा विषय नाही तर हृदयाचा विषय आहे. सतत ईश्वराची प्रार्थना, अतिशय नम्रता, आत्मत्याग, आणि आपल्या बलिदानाची तयारी यांच्यातूनच आपल्याला मार्गदर्शन मिळू शकते. अहिंसेच्या साधनेकरिता सर्वोच्च प्रतीची निर्भयता आणि साहस यांची आवश्यकता असते. मला माझ्या दुबळेपणाची माहिती आहे आणि त्या दुबळेपणाबद्दल मला खेदही आहे.

परंतु माझ्या आतील ज्योत स्थिर आणि स्पष्ट आहे. अहिंसा आणि सत्य याशिवाय आमच्या उद्धाराचा दुसरा कोणताच मार्ग नाही. मला माहीत आहे की युद्ध एक प्रकारचे वाईट कृत्य आहे आणि ते केवळ वाईट आहे. मला हेही माहीत आहे की एके दिवशी याचा अंत होणं अपरिहार्य आहे. खूनकराबी अथवा धोकेबाजी यांच्या मार्गाने मिळवलेले स्वातंत्र्य खरे स्वातंत्र्यच असू शकत नाही असा माझा विश्वास आहे. अहिंसेच्या तत्त्वाशी मी तडजोड केली आहे वा असत्य वा हिंसा यांचा मी समर्थक आहे असे माझ्या कोणत्याही कामामुळे समजले जाण्यापेक्षा माझी सर्व कामेच असमर्थनीय आहेत असे लोकांनी समजावे अशी माही इच्छा आहे. हिंसा आणि असत्य नाही तर अहिंसा आणि सत्य हेच आमच्या जीवनाचे नियम आहेत.

*सिलेक्शन्स, १६८-७०*

११९ माझ्या सीमेची मला स्पष्ट कल्पना आहे. हे भान - हे ज्ञान हीच माझी एकमेव शक्ती आहे. माझ्या जीवनात मी जे काही करू शकलो ते सर्व इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा माझ्या मर्यादांच्या या भानामुळेच होऊ शकले. *सिलेक्शन्स, २१४.*

१२० माझ्या नावाने पसरवण्यात येत असलेल्या गैरसमजांची मला सवय झालेली आहे. सर्वच सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या नशिबी ही गोष्ट लिहिलेली असते. त्यांची कातडी राठ असली पाहिजे. सर्वच गैरसमजांचे उत्तर वा स्पष्टीकरण दिले गेले तर त्यामुळे जीवन भाररूप होईल. जोपर्यंत उद्दिष्टाला बाधा पोहोचत नाही तोपर्यंत कोणत्याही गैरसमजाचे उत्तरच द्यायचे नाही हा तर मी नियमच बनवला आहे. या नियमामुळे माझा बराचसा वेळ वाचला असून मी अनेक चिंतांपासून मुक्त राहिलो आहे. *हिं.न. २७-५-१९२६, ३२५.*

१२१ माझा जर कोणत्या सद्‌गुणावर दावा असेल तर ते सद्गुण सत्यनिष्ठा आणि अहिंसा परायणता हेच आहेत. माझ्यात दैवी शक्ती असल्याचा माझा कोणताच दावा नाही. आणि तशा शक्तीची मला गरजही नाही. एखाद्या दुबळ्याहून दुबळ्या माणसाचा देह जसा नश्वर असावा तसाच माझा देहही नश्वर आहे आणि त्या माणसाच्या हातून जशा चुका होण्याची शक्यता असते तशाच चुका माझ्याकडूनही होऊ शकतात. माझ्या सेवेला अनेक मर्यादा आहेत. परंतु त्यांच्या अपूर्णतेशिवायही ईश्वराने त्यांच्यावर आपल्या आशीर्वादाची आणि कृपेची पखरण केली आहे.

आपली चूक मान्य करणे फार चांगली गोष्ट आहे. ती एका झाडूचे काम करते. ज्याप्रमाणे झाडू संपूर्ण घाण दूर करून जमीन आधीपेक्षाही स्वच्छ करतो त्याचप्रमाणे आपली चूक मान्य केल्यामुळे मन हलके आणि स्वच्छ होते.

चूक कबूल केल्यामुळे मला अधिकच हिंमत आल्यासारखे वाटते. अशा प्रकारे सिंहावलोकन केल्यामुळे आपल्या कार्याची उन्नती होत असते. सरळ मार्ग सोडण्याचा आग्रह धरून माणूस आपल्या गंतव्य स्थानावर कधीही पोहोचू शकत नाही.

*हिं. न. १९-२-१९२२, २१४.*

१२२ 'महात्मा’ला तर त्याच्या नशिबाच्या भरवशावर सोडू द्यावे लागेल. मला महात्मा म्हणणे वा माझ्या पाया पडण्याला अपराध ठरवणा-या कोणत्याही कायद्याचे असहयोगी असूनही मी समर्थन करेन. जिथे माझा स्वतःचा कायदा मी चालवू शकतो तिथे म्हणजे आश्रमात मला महात्मा म्हणणे वा माझ्या पाया पडणे हा अपराध मानला जातो. *हिं. न. १७-३-१९२७, २४६.*

१२३ आता ही प्रकरणे बंद करण्याची वेळ आली आहे. यापुढील माझे जीवन इतके काही जाहीर होऊन गेले आहे की, जनतेला माहीत नाही असे क्वचितच काही असेल.... माझे जीवन एक उघडे पुस्तक राहिले आहे. माझ्या जीवनात काहीही गुप्त नाही आणि मी गुप्त गोष्टींना प्रोत्साहनही देत नाही. *आत्म. पृष्ठ ४७३.*

१२४ सत्य सोडून दुसरा कोणताही परमेश्वर नाही. सत्यमय होण्याचा एकमेव मार्ग अहिंसा हाच आहे, हे या प्रकरणांच्या पानापानातून उघड झाले नसेल तर हा माझा प्रयत्न व्यर्थ आहे असे मी समजतो. प्रयत्न व्यर्थ असू शकेल परंतु हा महान सिद्धान्त - तो व्यर्थ असू शकत नाही.

*आत्म. पृष्ठ ४७३.*

१२५ शस्त्रयुद्धाने सर्व जग जिंकण्यापेक्षा मनाचे विकार जिंकणे मला कठीण वाटते. हिंदुस्तानात आल्यानंतरसुद्धा माझ्या मनात दडून राहिलेले विकार माझ्या दृष्टीस आले आहेत. त्यांची मला शरम वाटते. पण पराभूत झालेलो नाही. सत्याचे प्रयोग करताना मी आनंदाची लूट केली आहे आणि आजही करत आहे. परंतु मला माहीत आहे की अजूनही मला बिकट मार्ग कापायचा आहे. याकरिता मला शून्यवत बनले पाहिजे. माणूस स्वत: होऊन स्वत:ला सर्वांच्या शेवटी ठेवत नाही तोपर्यंत त्याला मुक्ती मिळू शकत नाही. अहिंसा नम्रतेची पराकाष्ठा आहे. *आत्म. पृष्ठ ४७४.*

१२६ मानवसमूहाच्या अडाणीपणाच्या पूजेला मी खरोखरच घाबरलेलो आहे. लोक जर माझ्यावर थुंकले असते तर माझ्या वास्तव परिस्थितीची मला जाणीव झाली असती. तसे झाले असते तर हिमालयासारख्या महान चुका कबूल करण्याची वा माघारी वळण्याची वा नवीन योजना तयार करण्याची माझ्यावर वेळ आली नसती. *मा.म.गां. ७.* १२७

कुठेही प्रतिष्ठा मिळावी अशी माझी इच्छा नाही. प्रतिष्ठा राजदरबारातील वस्तू आहे. मी तर हिंदुंप्रमाणेच मुसलमान, ख्रिश्चन, पारशी आणि ज्यू लोकांचा सेवक आहे. आणि सेवकाला प्रेमाची गरज असते, प्रतिष्ठेची नाही. जोपर्यंत मी जनतेचा एकनिष्ठ सेवक आहे तोपर्यंत ते प्रेम मला मिळत राहील. *मा.म.गां. ८.*

१२८ कोणत्या का कारणाने असेना युरोप वा अमेरिकेला जाण्याची मला भीती वाटते. आपल्या लोकांपेक्षा या महाद्वीपातील लोकांबद्दल माझ्या मनात अविश्वास आहे आणि त्यामुळे मला ही भीती वाटते असे नाही. माझा स्वतःवरच विश्वास नाही हे या भीतीचे कारण आहे. प्रकृती सुधारण्याकरिता अथवा फेरफटक्याकरिता पश्चिमेत जाण्याची इच्छा नाही. सार्वजनिक सभांमध्ये भाषणे देण्याचीही मला इच्छा नाही. महात्मा वा महापुरुषांशी करतात तसा व्यवहार लोकांनी करावा याची मला घृणा वाटते. सार्वजनिक सभेत भाषणे करण्याची वा सार्वजनिक प्रदर्शनाची शक्ती कधी काळी माझ्या शरीरात येईल असेही मला लाटत नाही. परमेश्वर कधी मला पश्चिमेत घेऊन गेला तर तेथील जनतेच्या हृदयात शिरण्याकरिता, पश्चिमेच्या तरुणांशी शांतपणे गप्पागोष्टी करण्याकरिता आणि शांततेसाठी सत्य सोडून इतर कोणत्याही गोष्टीचा त्याग करण्याची तयारी असलेल्या माझ्या विचाराच्या शांतता प्रेमी माणसांच्या भेटीचे भाग्य प्राप्त व्हावे म्हणून मी तिथे जाईन.

परंतु मला वाटते की स्वतः पश्चिमेत जाऊन सांगायलाच हवा असा कोणताच संदेश सध्या तरी माझ्याजवळ नाही. माझा विश्वास आहे की माझा संदेश संपूर्ण जगासाठी आहे. परंतु आतापर्यंत मला असेच वाटत आले आहे की स्वदेशात काम करूनच मी माझा संदेश जगाला चांगल्या रीतीने सांगू शकतो. जर भारतात मी माझ्या कामाचे चांगले यश दाखवू शकलो तर मी समजेन की संदेश देण्याचे माझे काम पूर्ण झाले आहे. भारताला माझ्या संदेशाची काही गरज नाही या निष्कर्षापर्यंत जर मी पोहोचलो तर त्यावर विश्वास ठेवत माझा संदेश जगाला ऐकवण्याकरिता मी अन्यत्र कुठेही जाणार नाही. त्यामुळे भारताबाहेर जाण्याचे साहस कधी

काळी मी केलेच तर ते एवढ्याचसाठी करेन की अत्यंत हळूहळू का होईना भारत माझ्या संदेशाचा स्वीकार करत आहे ही श्रद्धा आणि विश्वास माझ्यात असल्यामुळेच.

अशा रीतीने आमंत्रण देणा-या मित्रांसोबत बिचकत बिचकत माझा पत्रव्यवहार सुरू आहे. त्यावेळी माझ्या लक्षात आले की इतर कोणत्याही कारणासाठी जरी नाही तरी रोलॉ यांना भेटण्याकरिता मी युरोपमध्ये जाणे आवश्यक आहे. संपूर्ण युरोपच्या प्रवासाबद्दल माझ्या स्वतःबद्दल माझ्या मनात अविश्वास असल्यामुळे या बुद्धिमान पुरुषाशी भेटणे हेच माझ्या युरोप यात्रेचे मुख्य उद्दिष्ट राहील असे मी ठरवले आहे. माझ्या अडचणी मी त्यांच्यासमोर ठेवल्या आणि माझ्या युरोप यात्रेचे मुख्य उद्दिष्ट बनवू द्याल का असे मी त्यांना विचारले. उत्तरात त्यांनी लिहिलं की 'केवळ माझ्या मुलाखतीला युरोप यात्रेचे उद्दिष्ट सत्याच्या नावावर बनवू देऊ शकत नाही. केवळ आमच्या भेटीसाठी माझ्या इथल्या कामाचा खोळंबा व्हावा हे त्यांना पसंत नाही. आणि त्यांच्या भेटीशिवाय इतर कोणतीच आंतरिक प्रेरणा मला युरोप यात्रेकरिता प्रेरित करीत नाही. माझ्या या निश्चयाबद्दल मला खेद होतो परंतु हाच निश्चय योग्य आहे असे मला वाटते. युरोपमध्ये जाण्याकरिता एकीकडे कोणतीच आंतरिक प्रेरणा नाही तर दुसरीकडे देशात बरेचसे काही करण्याचे शिल्लक आहे असे माझा आतला आवाज मला सारखा सांगतो आहे.

*हिं. न. २६-४-१९२८, २८४.*

१२९ जगातील कोणत्याही प्राण्याबद्दल मी द्वेष करूच शकत नाही हे मला मान्य आहे. वर्षांपासून प्रार्थनापूर्ण संयम केल्यामुळे जवळपास ४० वर्षांपासून कुणाबद्दलही द्वेषभावना बाळगणे मी सोडून दिले आहे. हा फार मोठा दावा आहे याची मला जाणीव आहे. तरीही नम्रतापूर्वक मी हा दावा करत आहे. परंतु दुर्गुणांबद्दल, मग ते कुठेही असोत, मला द्वेष वाटू शकतो, वाटतो. ज्याप्रमाणे अस्पृश्यतेच्या घृणित पद्धतीची मला घृणा वाटते त्याचप्रमाणे इंग्रजांनी स्थापित केलेल्या या शासनपद्धतीचीही मला घृणा वाटते. ही शासनपद्धती भारताची मनमानेल त्याप्रमाणे लूट करत आहे आणि त्याकरिता कोट्यवधी हिंदू स्वतःच जबाबदार आहेत. परंतु इथे

येऊन मोठे बनलेल्या इंग्रजांची मी घृणा करत नाही ज्याप्रमाणे येथील उच्चपदस्थ हिंदूची मी घृणा करत नाही. सर्व प्रकारच्या प्रेमाच्या साधनांनीच मी त्यांच्यात सुधारणा घडवून आणू इच्छितो.

*हिं. न. ६-८-१९२५, ४१४.*

१३० काही दिवसांपूर्वी आश्रमातील अपंग झालेले एक वासरू वेदनांनी तडफडत होते. त्याचा औषधोपचार करण्यात आला. पशू डॉक्टरचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी त्याच्या जगण्याची आशा सोडून दिली होती. ते वेदनांनी तडफडत असलेले आम्हांलाही दिसत होते. कड पलटवण्याचाही त्याला त्रास होत होता.

अशा परिस्थितीत त्या वासराला मारून टाकणे हाच धर्म आहे, अहिंसा आहे असे मला वाटले. सहका-याबरोबर मी यासंबंधी चर्चा केली. त्यांच्यातील अनेकांनी माझ्या मताचे समर्थन केले. नंतर संपूर्ण आश्रमातील लोकांशी मी बोललो. त्यांच्यातील एकाने वासराला न मारण्याविषयी अनेक प्रकारचा युक्तिवाद केला. त्या बंधूंचा युक्तिवाद होता की ज्याच्यात प्राण देण्याची शक्ती नाही त्याला प्राण घेण्याचाही हक्क नाही. या प्रसंगी त्यांचा हा युक्तिवाद मला अप्रासंगिक वाटला. स्वार्थाच्या प्रेरणेने कुणी दुस-याचा जीव घेत असेल तिथे हा युक्तिवाद उचित ठरू शकतो. अखेरीस करूण अंतःकरणाने जवळ उभे राहून डॉक्टरला सांगून त्या वासराला मी इंजक्शन टोचून मारायला लावले. जीव जाण्याकरिता दोन मिनिटांपेक्षाही कमी वेळ लागला असावा.

हे काम आजच्या लोकमताला पसंत पडू शकत नाही हे मला माहीत होते. यात त्याला हिंसा दिसणार होती. परंतु धर्माचे पालन करणारा लोकमताचा विचार करत नसतो. ज्यात मला धर्म दिसतो त्यात इतरांना अधर्म दिसत असला तरी मला दिसत असलेल्या धर्माप्रमाणेच मी आचरण केले पाहिजे हे मी शिकलो आहे आणि हीच गोष्ट योग्य आहे हे अनुभवांती सिद्ध झाले आहे. वास्तवात मी मानलेला धर्म अधर्मही असू शकतो. परंतु केव्हा केव्हा नकळत चूक केल्याशिवाय अधर्माचा शोध लागू शकत नाही. लोकमतामुळे अथवा इतर कोणत्या तरी गोष्टीला घाबरून मी ज्याला धर्म मानतो त्यानुसार आचरण केले नाही तर धर्माधर्माचा निर्णय मी कधीही

करू शकणार नाही आणि अखेरीस मी धर्महीन होऊन जाईन. अशाच कारणांमुळे गुजराती कवी प्रीतम म्हणाले आहेत :

‘प्रेमपंथ पावकनी ज्वाळा भाळी पाछा भागे जोने’

अर्थात प्रेमपंथ आगेची ज्वाला आहे. तिला पाहूनच लोक पळ काढतात. अहिंसाधर्माचा पंथ प्रेमाचा पंथ आहे. या पंथात माणसाला अनेकदा एकट्यानेच चालावे लागत असते.

या प्रश्नांसंबंधी मी आपल्या मनात विचार केला आणि नंतर मित्राशीही त्यासंबंधी चर्चा केली आणि म्हणालो की, 'वासरातील प्रकरणी ज्याप्रमाणे मी वागलो तसाच मी माझ्याही बाबतीत वागू इच्छेन काय ? माणसासंबंधी अशाच प्रकारचे वर्तन करण्याची माझी तयारी असेल काय ?’ दोघांनाही एकच न्याय लागू होतो असे मला वाटले. स्पष्टपणे मला जाणवले की इथे जर 'यथा पिंडे तथा ब्रह्मांडे’ हा न्याय लागू पडत नसेल तर वासरालाही मारता येऊ शकत नाही. अशा उदाहरणाची कल्पना करता येऊ शकते की जेव्हा मारण्यातच अहिंसा असू शकते आणि न मारण्यात हिंसा. असे समजा की माझ्या मुलीत कोणतेच मत देण्याची पात्रता नाही. तिच्यावर कोणी तरी आक्रमण करण्याकरिता आला. त्याला जिंकण्याचा माझ्याजवळ कोणताच मार्ग नसेल तर आपल्या मुलीचा जीव घेऊन आक्रमकाच्या तलवारीला बळी चढणे यात मला शुद्ध अहिंसाच दिसते. आजाराने तडफडणा-या माणसाला आपण मारत नाही कारण त्यांची सेवा करण्याची साधने आपल्याजवळ असतात व त्यांना समजत असते. परंतु सेवा संभव नसेल, जगण्याची आशा नसेल, आजारी बेशुद्ध असेल आणि त्याला अतिशय वेदना होत असतील तर त्याचे प्राण घेण्यात मला काहीच चूक वाटत नाही.

ज्याप्रमाणे रोग्याच्या हितासाठी डॉक्टर त्याच्या शरीराची चीर-फाड करतात व त्यात कोणतीही हिंसा नसते उलट अहिंसाच असते त्याचप्रमाणे रोग्याला मारण्यातही शुद्ध अहिंसेचे पालन होऊ शकते. चीर-फाड करताना रोगी दुरुस्त होण्याची शक्यता असते परंतु प्राण घेतला तर रोगी मरतो असा युक्तिवाद करण्यात आला आहे. परंतु विचारांती लक्षात येईल की दोन्ही ठिकाणी साध्य एकच आहे. प्राण घेऊन म्हणा की चीर-फाड करून म्हणा रोग्याच्या आत्म्याला

वेदनामुक्त करणे हाच हेतू अखेरीस दोन्ही ठिकाणी असतो. शरीराची चीर-फाड केल्यामुळे शरीराला नाही तर आत्म्याला सुख पोहोचत असते. आत्मारहित शरीरात सुखदु:खाची जाणीवच नसते.

मृत्युदंडाची जी भीती आपल्या समाजात दिसून येते ती अहिंसा धर्माच्या प्रचाराला बाधक आहे. कुणाला शिव्या देणे, त्याचे वाईट इच्छिणे, त्याला मारणे, त्याला त्रास देणे या सर्व गोष्टी हिंसाच आहेत. जो माणूस आपल्या स्वार्थाकरिता दुस-या माणसाला दुःखी करतो, त्याचे नाक-कान कापतो, त्याला पोट भरून जेवण देत नाही आणि त्याला अपमानित करतो तो मृत्युदंड देणा-यापेक्षा अधिक निर्दय असतो. ज्याने अमृतसरच्या गल्लीमधून लोकांना किड्याप्रमाणे रांगायला लावले, त्याने जर त्यांना मारून टाकले असते तर त्याचे ते कर्म कमी क्रूरपणाचे गणले गेले असते. जर कोणी असे समजत असेल की पोटावर रांगायला लावलेली माणसे आजही जिवंत आहेत त्यामुळे पोटावर रांगायला लावणे ही गोष्ट मृत्युदंडापेक्षा कमी हिंसक आहे तर त्या माणसाला अहिंसेचा अर्थच कळलेला नाही असे मी म्हणण्यात मला किंचितही संकोच वाटणार नाही. असे अनेक प्रसंग असू शकतात की जेव्हा माणसाच्या मृत्यूचे स्वागत करणेच उचित ठरावे. ज्यांना हा धर्म कळत नाही, त्यांना अहिंसेचे मुलतत्त्व समजत नाहीत.

'हरिनो मारग छे शूरानो नहीं कायरनू काम जोने'. म्हणजेच धर्माचा मार्ग शूरांकरिता आहे, तिथे नेभळटांना स्थान नाही.

अहिंसा धर्माचे पालन करणारा मनुष्य आपल्या शत्रूजवळ अशी प्रार्थना करील : 'हे शत्रू! माझा अपमान करणे, माझ्याशी अमानुष कर्म करणे यापेक्षा तू मला मारून टाकशील तर मी तुझे उपकार मानेन.'

माणसाला वा पशूला थोड्या वेळेकरिता केवळ मरणापासून वाचवण्यातही अहिंसा नक्कीच आहे हा भ्रम आहे आणि यामुळे आज देशात घोर हिंसा होत असलेली मला दिसत आहे.

*हिं.न.४-१०-१९२८, ५२-५३.*

१३१ महात्मा पदवीपेक्षा सत्य मला अनंत पटीने प्रिय आहे. मला माहीत आहे की मी महात्मा नाही, अल्पात्मा आहे. या गोष्टीची मला सदैव जाणीव असते. त्यामुळे महात्मा पदवीने मी कधी भ्रमिष्ट झालो नाही. मी मान्य केले पाहिजे दर क्षणी हिंसा करूनच मी माझ्या शरीराचा निर्वाह करत असतो. प्रत्येक श्वास घेताना मी सूक्ष्म जिवांची हत्त्या करत असतो. आणि हे माहीत असूनही मी श्वास घेणे थांबवत नाही. वनस्पतीचा आहार घेत असतानाही मी हिंसा करत असतो आणि तरीही मी जेवण बंद केलेले नाही. डासांवगैरेंपासून वाटण्याकरिता मी मातीचे तेल वगैरे वापरल्यामुळे त्यांचा नाश होत असतो हे माहीत असूनही नाशक द्रव्यांचा उपयोग करणे मी थांबवलेले नाही. सापांना मारल्याशिवाय दूर करता येत नाही तेव्हा सापाच्या उपद्रवापासून आश्रमवासीयांना वाचवण्याकरिता सापांना मी मारू देतो. बैलांकडून काम घेताना आश्रमातील माणसे बैलांना तीक्ष्ण कुराणी टोचतात व ती गोष्ट मी सहन करतो. एवढ्यानेच माझी हिंसा संपत नाही. आता माकडांचा उपद्रव मला त्रासदायक होतो आहे. माकडांना मारण्याचा निश्चय कधी काळी मी करू शकेन की नाही हे मला माहीत नाही. अशा निशचयांपासून मी पळ काढत असतो. अनेक उपयुक्त सूचना देऊन सध्या मित्र मला मदत करत आहेत. परंतु आश्रमाची शेती असो वा नसो, माकडांचा नाश मी कधीच करणार नाही अशी प्रतिज्ञा घेण्याचा धीर आज तरी मला होत नाही. माझ्या या विनम्र स्वीकृतीमुळे मित्रांनी माझा त्याग केला तर मी लाचार होऊन तो त्याग सहन करीन. परंतु अहिंसेसंबंधीचा माझा दुबळेपणा अथवा माझी अपूर्णता लपवून कुणाशी मैत्री ठेवण्याची माझी इच्छा नाही. माझ्याबद्दल मी केवळ एवढाच दावा करू शकतो की अहिंसेसारख्या महान व्रतांना ओळखण्याकरिता आणि त्यांचा काया-वाचा-मनाने संपूर्ण पालन करण्याकरिता मी सतत प्रयत्नशील असतो. त्या प्रयत्नात मला कमी अथवा अधिक यश मिळाले आहे. आणि तरीही अजून मला बराच मोठा पल्ला गाठायचा आहे याचे मला भान आहे. *हिं. न. १-१९२८, ८४.*

१३२ मी एक गरीब भिकारी आहे. माझ्या संग्रही हे चरखे, जेलची ताटे, बकरीच्या दुधाचे भांडे, सहा हाताने विणलेले पंचे आणि टॉवेल आणि माझी प्रसिद्धी - जिची काहीच किंमत नाही - आहे.

(ही गोष्ट गांधीजींनी ११ सप्टेंबर १९३१ ला मारसिले येथील जकात अधिका-याला सांगितली होती.) *मो. क. गां. -३, १४२.*

१३३ राजकारणाच्या भोव-यात मी ओढला गेलो असल्याचे जेव्हा मला आढळले, तेव्हा मी स्वतःलाच विचारले की अनैतिकता, असत्य आणि राजनैतिक लाभ या गोष्टींपासून वाचण्याकरिता मी काय केले पाहिजे. मी निश्चितपणे या निष्कर्षावर पोहोचलो की ज्या लोकांमध्ये मला राहायचे आहे आणि ज्यांच्या अडचणी रोजच्यारोज मला दिसत असतात त्या लोकांची सेवा जर मला करायची असेल तर मी संपूर्ण संपत्ती आणि संग्रह यांचा त्याग केला पाहिजे.

या निष्कर्षावर पोहोचल्याबरोबर सर्व गोष्टींचा मी त्याग केला हे असे मी प्रामाणिकपणे बोलायचे तर म्हणू शकत नाही. सुरुवातीला या त्यागाची गती कमी होती. आणि संघर्षाच्या त्या दिवसांची मी जेव्हा आठवण करतो तेव्हा आठवते की सुरुवातीला हा त्याग दु:खदही होता. परंतु जसजसे दिवस लोटत गेले तसतसे मला जाणवू लागले की मी ज्या गोष्टींना आपली मानतो त्या गोष्टींचाही मी त्याग केला पाहिजे. अशी एक वेळ आली की त्या वस्तूंचा त्याग ही माझ्यासाठी हर्षाची गोष्ट झाली. आणि मग एकामागून एक सर्व वस्तू माझ्यापासून वेगात सुटत गेल्या. त्या सुटत असताना माझ्या खांद्यावरील एक मोढे उतरले व आता मी आरामात चालूफिरू शकतो व माझ्या बांधवांची सेवा निश्चिंत होऊन प्रसन्नतापूर्वक मी करू शकतो असे मला वाटू लागले हे मी तुम्हाला नक्कीच सांगू शकतो. त्यानंतर तर कोणत्याही वस्तूचा संग्रह माझ्याकरिता कष्टदायक आणि भाररूप होऊ लागला.

त्या आनंदाच्या कारणाचा मी शोध घेऊ लागतो तेव्हा माझ्या लक्षात येते की जर एखादी वस्तू आपली समजून मी माझ्याजवळ ठेवली तर सर्व जगापासून तिचे रक्षण मला करावे लागते. मला असेही दिसले आहे की असे अनेक लोक आहेत की ज्यांना या गोष्टी हव्या असल्या तरी त्यांच्याजवळ त्या नाहीत. आणि मला एकांतात पाहून काही उपाशीतापाशी, दुष्काळपीडीत लोकांचे माझ्याजवळील त्या वस्तूंची वाटणी करूनच समाधान होणार नाही तर त्यांना त्या गोष्टी

माझ्याजवळून हिसकावून घ्याव्या असेही वाटेल. अशा वेळी मला पोलिसांची मदतही घ्यावी लागेल. मी स्वतःलाच म्हणालो : या लोकांना या गोष्टी हव्या आहेत त्याचे कारण मत्सर नाही तर त्यांना या गोष्टींची माझ्यापेक्षा अधिक गरज आहे हे आहे.

आणि मग मी स्वतःलाच म्हणालो : परिग्रह हा अपराध आहे असे मला जाणवते. विशिष्ट वस्तूंचा संग्रह मी तेव्हाच करू शकतो जेव्हा त्या वस्तूंचा संग्रह करू इच्छिणा-या लोकांनाही त्या वस्तूंचा संग्रह करता येऊ शकेल. परंतु आपल्याला माहीत आहे की हे अशक्य आहे. त्यामुळे एकच गोष्ट अशी आहे की जी सर्व लोक ठेवू शकतात आणि ती आहे असंग्रह - अपरिग्रह – कोणतीही वस्तू आपल्याजवळ न ठेवणे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर स्वेच्छेने केलेला त्याग.... त्यामुळे ईश्वराला इच्छा झाल्यानंतर या शरीराचाही मला त्याग करता आला पाहिजे आणि जोपर्यंत हे शरीर आहे तोपर्यंत या शरीराचा उपयोग दुराचार, ऐषआराम अथवा सुखोपभोग यांसाठी नाही तर आपल्या जागृतीचा प्रत्येक क्षण सेवेकरिता आहे अशी इच्छा ईश्वराप्रती संपूर्ण विश्वास मनात ठेवून मी बाळगली पाहिजे. आणि हा नियम देहासाठी बरोबर आसेल तर वस्त्रादी वस्तूंकरिता, ज्यांचा आपण उपयोग करतो, तर किती अधिक बरोबर असेल?

आणि ज्यांनी स्वेच्छेने स्वीकारलेल्या या गरिबीच्या व्रताचे पालन परिपूर्णतेच्या सीमेपर्यंत केले आहे - आत्यंतिक परिपूर्णतेपर्यंत पोहोचणे अशक्य आहे, परंतु माणूस ज्या सीमेपर्यंत पोहोचू शकतो त्या सीमेपर्यंत - आणि जे त्या आदर्शापर्यंत पोहोचले आहेत त्यांची साक्ष आहे की, जेव्हा आपण आपल्याजवळील प्रत्येक वस्तूचा त्याग करतो तेव्हा जगातील सर्व धनसंपत्ती आपली होते. (२७-९-१९३१ ला लंडन येतील गिल्ड हॉलमध्ये दिलेल्या भाषणातून)

*मो. क. गां. -३, १५५-५७.*

१३४ धर्मग्रंथाचे मूल्य त्यांच्या नैतिक शिक्षणाच्या आधारे करण्याची कला मी माझ्या तारुण्यापासूनच शिकलो आहे. त्यांच्यात वर्णित चमत्कारांमध्ये मला काहीच रस नाही. येशूच्या ज्या चमत्कारांविषयी सांगितले गेले आहे त्यांच्या आधारे मी बायबलमधील असा कोणताच उपदेश मान्य करत नाही की जो सार्वभौम नैतिक नीतिमत्तेच्या विरोधी असेल. कोणत्या ना

कोणत्या कारणामुळे माझ्याकरिता, आणि मला वाटते की माझ्यासारख्या लक्षावधी लोकांकरिताही धर्म शिक्षकांचे शब्द एका जिवंत शक्तीप्रमाणे असतात. सामान्य माणसांनी उच्चारलेल्या तशाच शब्दांमध्ये ही शक्ती नसते. इतर धर्म शिक्षकांप्रमाणेच येशू एक महान धर्म शिक्षक होते. त्यांच्या काळातील लोकांकरिता ते निश्चितच 'ईश्वर-प्रसूत' पुत्र होते. परंतु त्या लोकांचा जो विश्वास होता तो माझाही असला पाहिजे अशी जरुरी नाही. ईश्वर-प्रसूत अनेक पुत्रांपैकी येशूला मी एक पुत्र मानतो म्हणून काही त्यांच्या उपदेशाचा माझ्या जीवनावर कमी प्रभाव पडलेला नाही. माझ्याकरिता 'प्रसूत' या विशेषणाचा अर्थ शब्दार्थापेक्षा किती तरी अधिक विशाल आणि सखोल असण्याचा संभव आहे. आपल्या काळात येशू ईश्वराच्या सर्वात जवळ होते.

जे लोक त्याच्या शिकवणुकीचा स्वीकार करायचे त्यांच्या पापमुक्तीकरिता येशूने स्वतःला शुद्ध बनवून त्यांच्यासमोर आपल्या उदाहरणाचा आदर्श ठेवला. परंतु ज्यांनी आपल्या जीवनाला उन्नत करण्याकरिता काहीही प्रयत्न केला नाही त्यांच्याकरिता येशूच्या उपदेशाचे काहीही मूल्य नाही. परंतु ज्याप्रमाणे सोन्याला तापवल्यामुळे त्याचा मूलभूत दोष दूर होतो त्याचप्रमाणे या दिशेने नव्याने प्रयत्न केला गेला तर मूळ दोष नष्ट होऊ शकतो.

माझी अनेक पापे मी अगदी स्पष्ट शब्दात कबूल केली आहेत. परंतु दरवेळी त्यांचे ओझे घेऊन मी हिंडत नसतो. मी ईश्वराकडे जर जात असेन, आणि मला वाटते की मी त्याच्याकडे जातो आहे, तर त्याच्या उपस्थितीच्या प्रखर प्रकाशाचा मला अनुभव येत असेल व त्यामुळे मी सुरक्षित असेन. मला हे माहीत की आत्मसुधारणेकरिता आत्मदमन, उपवास आणि प्रार्थना केवळ यांच्यावरच मी जर अवलंबून राहिलो तर काहीही लाभ होणार नाही. परंतु निर्मात्याच्या मांडीवर आपले चिंताकुल डोके ठेवण्याची आकांक्षा या गोष्टींमधून व्यक्त होत असेल तर - आणि मला आशा आहे की या गोष्टी याच आकांक्षेची अभिव्यक्ती करतात - यांचे मूल्य अनंत असेल.

*मो. क. गां. ४. ९३.*

१३५ हिंदू धर्मात पापी माणसाकरिता नरक यातनेशिवाय काहीच नसल्यामुळे मी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला पाहिजे असे एक इंग्रज गृहस्थ गत तीस वर्षांपासून मला समजावून सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. मी तुरुंगात असताना मला 'लाईफ ऑफ सिस्टर थेरेसा' या पुस्तकाच्या वेगवेगळ्या ठिकाणांवरून तीन प्रती मिळाल्या. त्या प्रती पाठवणा-यांना आशा वाटत होती की सिस्टर थेरेसाच्या उदाहरणाने प्रभावित होऊन मी येशूला ईश्वराचा पुत्र मानेन आणि माझ्या उद्धारक म्हणून मी त्याचा स्वीकार करेन. मी नम्र भावनेने ते पुस्तक वाचले परंतु सेंट थेरेसाचा पुरावाही मला पटू शकला नाही. आयुष्याच्या या पडावावर मन मोकळे ठेवणे शक्य असेल तर मी म्हणेन की अजूनही या गोष्टीकडे मी मोकळ्या मनाने पाहतो हे मी सांगितले पाहिजे. पॉल बनण्याच्या आधी सॉलच्या जीवनात घडलेल्या घटना माझ्याही जीवनात घडल्या तर मी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करायला मागेपुढे पाहणार नाही या अर्थाने मी म्हणतो की या गोष्टीकडे मी मोकळ्या मनाने पाहतो. परंतु प्राचीन रुढीग्रस्त ख्रिश्चन धर्माने येशूच्या संदेशाची मोडतोड करून तो जगाला सादर केलेला असल्यामुळे माझे मन त्या धर्माविरुद्ध विरुद्ध बंड करून उठते. येशू एक आशियायी महापुरुष होते. अनेक माध्यमांद्वारे त्यांचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यात आला होता. आणि त्याला एका रोमन सम्राटाचा जेव्हा आधार मिळाला तेव्हा तो धर्म साम्राज्यवादी बनला. आज तो तसाच आहे. अर्थात त्यात काही फार चांगले आणि क्वचितच आढळणारे अपवाद आहेत. परंतु त्या धर्माचा सामान्य कल मी म्हणालो तसाच आहे.

*मो. क. गां.* ४,९५.

१३६ माझ्या मनाला मर्यादा आहेत. मी फार साहित्य वाचलेले नाही. जगाचा बराचसा भाग मी पाहिलेला नाही. जीवनातील विशिष्ट भागावर मी माझे लक्ष केंद्रित केले आहे आणि त्या बाहेरील भागात मला काहीच स्वारस्य वाट्त नाही.

*मो. क. गां. ६, ३५६.*

१३७ कोणत्याही पुरुषाने अथवा स्त्रीने माझ्यासारखाच प्रयत्न केला आणि माझ्याप्रमाणेच आशा आणि श्रद्धा यांचा विकास आपल्या मनामध्ये केला तर मी जे काही सिद्ध केले आहे ते कोणताही पुरुष अथवा स्त्री सिद्ध करू शकेल याबद्दल मला कोणतीही शंका नाही.

*सिलेक्शन्स २१६.*

१३८ माझी अशी कल्पना आहे की अहिंसक रीतीने कसे जगावे आणि कसे मरावे याची कला मला माहीत आहे. परंतु अजूनही एका परिपूर्ण कृतीद्वारे तिचे प्रात्यक्षिक मला दाखवायचे आहे.

*अखेरचं पर्व प्यारेलाल खंड ३ पृष्ठ ५६.*

१३९ 'गांधीवाद' अशी कोणतीच गोष्ट अस्तित्वातच नाही आणि माझ्या मागे कोणताही संप्रदाय सोडून जाण्याची माझी इच्छा नाही. एखाद्या नव्या सिद्धान्ताचा अथवा शिकवणुकीचा मी शोध लावला आहे असा माझा दावाही नाही. जे शाश्वत सत्य आहे त्याचे माझ्या नेहमीच्या जीवनात आणि दैनंदिन प्रश्नात माझ्या पद्धतीने अनुसरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यामुळे मनस्मृतीसारखी कोणतीही स्मृती मागे सोडून जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्या महान विधी-निर्मात्याशी - स्मृतीकाराशी माझी कुठेच तुलना होऊ शकत नाही. जी माझी मते निश्चित झाली आहेत आणि ज्या निर्णयांवर मी पोहोचलो आहे तीही कायम नाहीत. शक्य आहे की उद्याच मी ती बदलवीन. जगाला कोणतीच नवीन गोष्ट मला शिकवायची नाही. सत्य आणि अहिंसा अनादि काळापासून चालत आलेले आहेत. मी तर यथाशक्ती प्रचंड प्रमाणात माझ्या जीवनात या दोन्ही गोष्टींचे प्रयोग केले आहेत. असे करताना कधी कधी मी चुकाही केल्या आहेत आणि माझ्या त्या चुकांपासून मी धडाही घेतला आहे. अशा रीतीने जीवन आणि त्याच्या समस्यांनी माझ्याकरिता अहिंसा आणि सत्य यांच्या पालनातील प्रयोगाचे रूप धारण केले आहे. स्वभावाने मी सत्यनिष्ठ होतो परंतु अहिंसक नव्हतो.

एका जैन मुनीने माझे योग्य वर्णन करताना योग्य विधान केले की मी सत्याचा जेवढा चांगला भक्त आहे तेवढा अहिंसेचा नाही. मी सत्याला पहिले स्थान दिले आहे आणि अहिंसेला

दुसरे. त्यांचे म्हणणे आहे की मी सत्याकरिता अहिंसेचा बळी देऊ शकतो. वास्तवात सत्याची उपासना करता करताच मला अहिंसा भेटली आहे. आमच्या शास्त्रात सांगितले आहे की ‘न हि सत्यात्परो धर्म:.’ सत्याच्या पलीकडे कोणताच धर्म नाही. परंतु त्यांचे असेही म्हणणे आहे की ‘अहिंसा परमो धर्म:’ माझ्या मते वरील दोन सूत्रांमध्ये धर्म या शब्दाचा वेगवेगळा अर्थ आहे.

वर मी जे काही सांगितले आहे त्यात माझे सर्व तत्त्वज्ञान - माझ्या विचारांना एवढे मोठे नाव देता येत असेल तर – समाविष्ट झालेले आहे. त्याला तुम्ही ‘गांधीवाद’ असे म्हणू नका कारण ‘वाद’ यासारखी त्यात कोणतीही गोष्ट नाही. तसेच त्याच्यासाठी विस्तृत साहित्याचीही जरुरी नाही आणि प्रचाराचीही जरुरी नाही. माझ्या विचारांच्या विरोधात शास्त्रातील पुरावे देण्यात आले आहेत. परंतु कोणत्याही वस्तूसाठी सत्याचा बळी देता येऊ शकत नाही या गोष्टीला मी अजूनच घट्ट पकडून ठेवले आहे. ज्या सरळ सत्यांना मी समोर ठेवले आहे त्यांवर ज्यांचा विश्वास असेल ते त्याप्रमाणे आचरण करूनच जगात त्यांचा प्रचार करू शकतात. लोकांनी माझ्या चरख्याची अनेकदा टवाळी केली आहे. एक कठोर टीकाकार तर एकदा म्हणाला होता की मी मरेन तेव्हा माझ्या चितेकरिता या चरणख्यांचा उपयोग होईल. परंतु यामुळे चरख्यावरील माझी दृढ श्रद्धा विचलित झालेली नाही. माझ्या सर्व रचनात्मक कार्याचे मूळ अहिंसेत आहे हे मी पुस्तकांच्या माध्यमातून जगाला कसे समजावून सांगू ? माझे जीवनच त्याचा प्रत्यक्ष पुरावा असू शकतो.

*ह.से. २८-३-३६, ४१-४२.*

१४० थोरोच्या रूपात तुम्हीच मला असा गुरू दिला आहे की ज्याच्या ‘ड्यूटी ऑफ सिव्हिल डिसओबिडिअन्स’ नावाच्या निबंधांमुळे मला माझ्या त्या कार्याकरिता वैज्ञानिक आधार मिळाला जे मी त्या काळात दक्षिण आफ्रिकेत करत होतो. ग्रेट ब्रिटनने मला रस्किनसारखा गुरू दिला. त्यांच्या अन टु धिस लास्ट ग्रंथामुळे माझ्या विचारात एवढे परिवर्तन घडवून आणले की मी एका रात्रीतून अगदी बदलून गेलो. मी वकिली सोडली. शहरात राहणे सोडले आणि एक खेडूत बनून डरबनपासून दूर एका शेतावर मी राहू लागलो. ते शेत जवळच्या रेल्वेस्टशनपासूनही ३ मैल दूर होते. आणि टॉलस्टॉयच्या रूपाने रशियाने मला तो गुरु दिला की ज्यामुळे माझ्या अहिंसेकरिता

तर्कशुद्ध आधार मिळाला. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेत जे आंदोलन नुकतंच सुरू झाले होते आणि ज्याच्या शक्तीचे भान त्या वेळी मलाही आले नव्हते त्या आंदोलनाला त्यांनी आशीर्वाद दिला होता. माझ्या नावाने लिहिलेल्या एका पत्रातून भविष्य वर्तवत त्यांनी लिहिलेले होते की ज्यामुळे जगातील पददलित लोकांना आशेचा एक संदेश मिळू शकेल असे आंदोलन मी करत आहे. त्यामुळे तुम्हांला कळू शकेल की मी सुरू केलेल्या कामात ग्रेट ब्रिटन वा पश्चिमेकडील देश यांच्याशी शत्रुत्वासारखे काहीही नाही. ज्या फॅसिझममध्ये व्यक्ती आणि त्याचे स्वातंत्र्य यांच्या दमनाचे समर्थन आहे त्या फॅसिझमचा समर्थक अन्टु धिस लास्टमधील संदेश चांगल्या प्रकारे पचवल्यानंतर आणि आत्मसात केल्यानंतर मी होऊ शकत नाही. *ह.से. ९-८-१९४२, २५२.*

१४१ या जीवनात माझे असे कोणतेच गुपित नाही. मी माझी दुर्बलता आधीच मान्य केली आहे. मला जर विषयोपभोगाची इच्छा झाली तर ती धीराने ती गोष्ट मी कबूल करेन. माझ्या पत्नीबरोबरच संभोग करण्याची मला घृणा वाटू लागली आणि त्या बाबतीत मी स्वतःची बरीच परीक्षा घेतली. त्यानंतर १९०६ साली मी ब्रह्मचर्याचे व्रत घेतले आणि ध्यास घेऊन पाळण्याकरिताच ते घेतले. त्या दिवसापासून माझे उघड जीवन सुरु झाले.... आणि ज्या दिवसापासून मी ब्रह्मचर्याचे पालन सुरू केले त्या दिवसापासून आम्हा दोघांचे (पती-पत्नी) स्वातंत्र्य सुरू झाले. माझी पत्नी स्वतंत्र स्त्री झाली आणि पती आणि स्वामीच्या नात्यातून ती मुक्त झाली. आणि माझ्या ज्या कामवासनेची तृप्ती तिला करावी लागत होती त्या कामवासनेच्या गुलामीतून मीही मुक्त झालो. ज्या अर्थाने माझी पत्नी माझ्या आकर्षणाचे केंद्र होती त्या अर्थाने दुसरी कोणतीही स्त्री माझ्या आकर्षणाचे केंद्र नव्हती. पतीच्या नात्याने मी माझ्या पत्नीशी अतिशय प्रामाणिक होतो त्याचप्रमाणे आईजवळ घेतलेल्या प्रतिज्ञेशी मी एवढा प्रामाणिक होतो की दुस-या एखाद्या स्त्रीचा गुलाम बनण्याचा विचार माझ्या मनाला शिवलाही नव्हता. परंतु ज्या पद्धतीने ब्रह्मचर्याने माझ्या जीवनात प्रवेश केला त्या प्रकारामुळे मनुष्याची माता म्हणून स्त्री मला आकर्षित केल्याशिवाय राहू शकत नाही.... माझ्या ब्रह्मचर्याला ब्रह्मचर्य पालनाच्या प्राचीन पद्धतीची काहीच माहिती नव्हती. प्रसंगानुरूप मी त्याचे नियम स्वतःच बनवले. परंतु ब्रह्मचर्याच्या

पालनाकरिता स्त्रीशी सर्व संबंध तोडले पाहिजे अशी माझी मान्यता कधीच नव्हती. जो संयम स्त्रीशी असलेले सर्व संबंध तोडण्याची मागणी करतो. - मग तो संबंध कितीही निर्दोष असला तरीही - तो संयम लादलेला संयम असतो. त्याचे मूल्य फार कमी असते. त्यामुळे सेवेकरिता स्त्रियांशी माझे स्वाभाविक संबंध जेव्हा आले तेव्हा मी ते टाळले नाही. दक्षिण आफ्रिकेत अनेक युरोपिअन आणि भारतीय भगिनींचा विश्वास मी संपादित केला. आणि दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या लढ्यात भारतीय भगिनींना सामील होण्याकरिता निमंत्रण दिले तेव्हा मी त्यांच्यातीलच एक झालो. स्त्रियांची विशेष सेवा करण्याची माझ्यात योग्यता आहे असे माझ्या लक्षात आले. ही गोष्ट - जरी ही मला आकर्षक वाटते - मी लहान करून मी सांगेन की भारतात परतल्यानंतर काहीच वेळात येथील स्त्रियांशी मी एकरूप होऊन गेलो. त्यांच्या अंतःकरणापर्यंत सहजतेने पोहोचू शकतो ही जाणीव मला सुखद वाटायची. मुसलमान भगिनींनी ज्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत माझ्यासमोर कधीच पडदा ठेवला नाही त्याचप्रमाणे इथे भारतातही त्यांनी माझ्यासमोर कधी पडदा ठेवला नाही. आश्रमात मी झोपतो तिथे चोहोकडे स्त्रियांचा घेरा असतो. मी असतो तिथे त्यांना सर्वप्रकारे सुरक्षित वाटते त्यामुळे त्या असे करतात. शेगावच्या आश्रमात कोणत्याही प्रकारच्या एकांताची जागा नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे.

विषयोपभोगाच्या दृष्टीने जर मी स्त्रियांकडे आकर्षित झालो असतो तर या वयातही बहूविवाहाचा पुरस्कार करण्याचे धैर्य माझ्यात आहे. गुप्त असो वा उघड-स्वतंत्र प्रेमावर माझा विश्वास नाही. गुप्त प्रेमात भ्याडपणाही भरलेला असतो. *मो. क. गां; ५, २४१-४२*

१४२ गावातील साध्याभोळ्या लोकांना चुकीचा रस्ता दाखवला आहे आणि माझ्या जीवनाचा चुकीचे चित्र उभे करून माझा अपमान केला आहे. यामुळे पूजेचा अर्थ सिद्ध होत नाही तर अनर्थ सिद्ध होतो. आपल्या उदरनिर्वाहार्थ अथवा स्वराज्याकरिता यज्ञाच्या रूपात सूतकताई करणे ही माझ्या मते खरी चरखापूजा आहे. पोपटाप्रमाणे गीतेचे पारायण करण्याऐवजी तिच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणे ही खरी गीतापूजा आहे. गीतापाठही त्याच सीमेपर्यंत उचित मानता येईल ज्या सीमेपर्यंत त्यानुसार आचरण करण्याला त्याची मदत होईल. माणसाच्या दुबळेपणाचे

नाही तर त्याच्या गुणांचे अनुकरण करणे हीच खरी पूजा आहे. जिवंत माणसाची मूर्ती बनवून तिची पूजा करून आम्ही हिंदू धर्माला पतनाच्या शेवटच्या पायरीवर पोहोचवतो. मृत्यूच्या आधी कोणत्याही माणसाला पूर्णपणे चांगला म्हणता येऊ शकत नाही आणि 'तुम्ही तुमच्या मुलालाही सोबत ठेवू शकला नाही आणि तो स्वैराचारी बनलेला असताना तुम्ही तुमचे घर आधी सांभाळून त्यातच समाधान मानणेच उचित होणार नाही काय ?"

हा एक टोमणा आहे असे समजले जाऊ शकते. हा प्रश्न इतर कुणाच्या मनात निर्माण होण्याआधीच माझ्या मनात निर्माण झालेला असल्यामुळे याला मी टोमणा समजत नाही. पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांवर माझा विश्वास आहे. आपले सर्व संस्कार पूर्वजन्माचे फळ असतात. ईश्वराचा कायदा अगम्य आहे. तो अखंड शोधाचा विषय आहे. कुणालाही त्याचा थाक लागू शकत नाही.

माझ्या मुलासंबंधी माझी जी कल्पना आहे ती अशी आहे : माझ्या घरात कुपुत्राने जन्म घेतला तर ती गोष्ट माझ्या पापाचे फलित आहे असे मी समजेन. माझ्या पहिल्या मुलाचा जन्म केवळ माझ्या मोहांध दशेचे फळ आहे. शिवाय माझी जेव्हा घडण होत होती त्याच काळात तो मोठाही होत होता. त्या वेळी मी स्वतःला कमी ओळखत होतो. आजही मी स्वतःला पूर्णपणे ओळखतो असा दावा मी करू शकत नाही. परंतु माझी मान्यता आहे की त्या वेळेपेक्षा आज मी स्वतःला अधिक ओळखतो. तो मुलगा माझ्यापासून दीर्घकाळ वेगळा राहिला. त्याला घडवण्याचे काम पूर्णपणे माझ्या हातात नव्हते. त्यामुळे त्याचे जीवन 'अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट' प्रमाणे झाले. मी ज्याला चुकून परमार्थ समजतो त्यात मी त्याची आणि त्याच्या भावांची आहुती दिली अशी त्याची माझ्याविरुद्ध तक्रार आहे. अशा प्रकारचा आरोप इतर मुलांनीही कमी अधिक संकोचाने माझ्यावर केला आहे. परंतु उदार अंतःकरणाने त्यांनी मला क्षमा केली आहे. माझ्या जीवनात झालेल्या परिवर्तनांचा माझ्या मोठ्या मुलाने प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. त्यामुळे त्याच्या समजाप्रमाणे माझे हे अपराधी वर्तन तो विसरू शकला 'नाही'. अशा परिस्थितीत मी त्याला गमावले आहे. याचे कारण मी स्वतः आहे असे समजून मी शांत होऊन बसलो आहे. ईश्वराला मी नेहमीच प्रार्थना

करत असतो की त्याने त्याला सद्बुद्धी द्यावी आणि त्याची सेवा करण्यात माझ्याकडून जी कसर राहिली त्याकरिता त्याने मला क्षमा करावी असे वाटत असल्यामुळे 'मी शांत होऊन बसलो आहे' हे वाक्यही बरोबर नाही. माणसाचा स्वभाव उर्ध्वगामी आहे असा माझा दृढविश्वास आहे. त्यामुळे या अज्ञाननिद्रेतून कधी ना कधी तो जागा होईल ही आशा मी सोडलेली नाही. यामुळेच ज्याप्रमाणे सर्व जग माझ्या अहिंसेच्या प्रयोगाचे क्षेत्र आहे त्याचप्रमाणे तोही माझ्या अहिंसेच्या प्रयोगाचे क्षेत्र आहे. यात यश कधी मिळेल याची चिंता मी कधीच करत नसतो. जे कर्तव्य मला सुचते ते पूर्ण करण्यात माझ्याकडून हयगय झाली नाही तरी मला समाधान वाटेल. "माणसाचा अधिकार' कर्तव्यावर आहे फळावर नाही' हे गीतेचे वाक्य सोन्यासारखे आहे असे मी समजतो.

*ह. से. १०-८-१९४०, २१५-१६.*

१४३ एका बांधवाने वर्तमानपत्रातील एक कात्रण मला पाठवले आहे. माझ्या नावाचे एक मंदिर बनवले गेले आहे आणि त्यात माझ्या मूर्तीची पूजा केली जाते. मुर्तीपुजेचे हे हिडीस रूप आहे असे मी समजतो. ज्याने हे मंदिर बनवले आहे त्याने आपले पैसे वाया घालवले आहेत. गावातील भोळ्याभाबड्या लोकांना चुकीचा रस्ता दाखवला आहे आणि माझ्या जीवनाचे चुकीचे चित्र उभे करून मला अपमानित केले आहे. यामुळे पूजेचा अर्थ सिद्ध होत नाही तर नेमकी उलटच गोष्ट त्यामुळे होते. आपल्या जीवननिर्वाहाकरिता अथवा स्वराज्याकरिता यज्ञस्वरूपात केलेली कटाई ही माझ्या मते खरी चरखापूजा आहे. पोपटाप्रमाणे गीतेचा पाठ करण्याऐवजी तिच्या उपदेशानुसार ज्याप्रमाणात आचरण केले जाईल त्याप्रमाणात आपले आचरण उचित मानले जाईल. माणसाच्या उणिवांचे नाही तर त्याच्या गुणांचे अनुकरण करणे हीच त्याची खरी पूजा आहे. जिवंत माणसाची मूर्ती बनवून त्याची पूजा केल्यामुळे आपण हिंदू धर्माला पतनाच्या अखेरच्या पायरीपर्यंत पोहोचवतो. मृत्यूच्या आधी कोणत्याही माणसाला पूर्णपणे चांगला म्हणता येऊ शकत नाही. मृत्यूनंतरही ज्याचा त्या माणसाच्या आरोपित गुणांवर विश्वास असेल तोच त्याला चांगला म्हणेल. खरी गोष्ट अशी आहे की एकट्या ईश्वरालाच माणसाच्या मनाची माहिती असते. यामुळेच कोणत्याही जीवित वा मृत माणसाची पूजा करण्याऐवजी सत्यस्वरूप ईश्वराची

पूजा करणे आणि त्याचेच भजन करणे यातच खरी सुरक्षितता आहे. चित्र ठेवणे हाही पूजेचाच एक प्रकार आहे की नाही हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो. या विषयासंबंधी मी आधीच लिहिलेले आहे. चित्र ठेवण्याची प्रथा खर्चिक आहे. परंतु निर्दोष समजून ती गोष्ट मी सहन करत असतो. यामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने मूर्तीपूजेला मी किंचितही प्रोत्साहन देत असेन तर त्या गोष्टीला हास्यास्पद आणि हानिकारक समजून सोडून देईन. यामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने मूर्तीपूजेला मी किंचितही प्रोत्साहन देत असेन तर त्या गोष्टीला हास्यास्पद आणि हानिकारक समजून मी सोडून देईन. मंदिराचे मालक मंदिरातील माझी मूर्ती हलवून त्या ठिकाणी खादीचे केंद्र उघडतील तर ती गोष्ट योग्य होईल आणि आता जे पाप ते करत आहेत त्या पापापासूनही ते वाचतील. त्या इमारतीत गरिबांनी रुईची धुनाई आणि कताई करावी. इतरांनी यज्ञ म्हणून धुनाई आणि कताई करावी. सर्वांनी खादी वापरावी. हाच गीतेचा कर्मयोग आहे. जीवनात याप्रमाणे आचरण करणे हीच गीतेची आणि माझी खरी पूजा आहे. *ह. से. २४-३-१९४६, ५२.*

१४४ ज्याप्रमाणे माझी प्रतिभा आणि माझे यश या गोष्टी ईश्वरदत्त वरदान आहे त्याचप्रमाणे माझी अपूर्णता आणि माझे अपयश याही ईश्वरदत्त गोष्टी आहेत. आणि या दोन्ही गोष्टी मी ईश्वरचरणी अर्पण करून टाकतो. माझ्यासारख्या अपूर्ण मानवाला त्याने या भव्य प्रयोगाकरिता का निवडले असावे ? मला वाटते की त्याने जाणीवपूर्वक असे केले. त्याला कोट्यवधी गरीब, मूक आणि अज्ञानी लोकांची सेवा - मदत करायची होती. परिपूर्ण माणसामुळे कदाचित ते निराश झाले असते. त्यांच्यासारखाच एक अपूर्ण माणूस अहिंसेकडे आगेकूच करतो आहे असे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांच्या मनातही आपल्या क्षमतेबद्दल आत्मविश्वास निर्माण होऊ शकेल. एखादा परिपूर्ण माणूस आपला नेता म्हणून आपल्यामध्ये आला असता तर आपण त्याला ओळखणारही नाही आणि एखाद्या गुफेत त्याला आम्ही पळवून लावले असते. शक्य आहे की माझ्यानंतर जो माणूस येईल तो माझ्यापेक्षा अधिक पूर्ण असेल आणि त्याचा संदेश ग्रहण करण्याचे सामर्थ्य तुमच्यात असेल. *अखेरचं पर्व, खंड ४: प्यारेलाल, पृष्ठ ४५७.*

१४५ अण्वस्त्राने हिरोशिमाला भस्मसात केले आहे असे जेव्हा मी अगदी सुरुवातीला ऐकले तेव्हा माझ्या मनावर त्याचा किंचितही परिणाम झाला नाही. या उलट मी स्वतःलाच म्हणालो की “आताही जगाने अहिंसेचा स्वीकार केला नाही तर मानव जातीची आत्महत्या हा त्याचा निश्चित परिणाम असेल.” *ला. फे. २, ८०१.*

१४६ जगातील वाईट कामाचा न्यायनिवाडा करणारा मी पंच बनू इच्छित नाही. मी स्वतः अपूर्ण आहे आणि जगाच्या सहिष्णुता आणि उदारता यांची गरज आहे. त्यामुळे जगाला परिणामकारक उपदेश देण्याची संधी मला मिळत वा मी निर्माण करत नाही तोपर्यंत मी जगाचा अपुरेपणा संहन करत राहतो. *मो. क. गां. १, २८५.*

१४७ वाईट काम करण्याकरिता मी जेव्हा पूर्णपणे असमर्थ ठरेन आणि माझ्या विचारविश्वात कठोरपणा वा अहंकार या भावना क्षणभराकरिताही प्रवेश करू शकणार नाहीत तेव्हाच माझी अहिंसा संपूर्ण जगातील सर्व माणसांच्या हृदयाला हेलावून टाकील. *ला. फे. २,८००.*

१४८ माणूस जर स्वतःला पूर्णपणे ईश्वराच्या हाती सोपवून देईल तर त्याने बरेवाईट, यशापयश या गोष्टी ईश्वरावर सोपवून देऊन त्यातच समाधान मानायला पाहिजे आणि त्यानंतर त्याने कोणत्याही गोष्टीची काळजी करू नये. मला असे वाटते की मी ही स्थिती प्राप्त केलेली नाही आणि म्हणूनच माझे कार्य अपूर्ण आहे. *ला. फे. २, ४५३.*

१४९ “जीवनात अशी एक अवस्था येते की जेव्हा माणसाला आपले विचार अभिव्यक्त करण्याचीही गरज उरत नाही, मग बाह्य कृतीचा तर प्रश्नच उपस्थित होत नाही. तसे झाले की केवळ विचारच काम करतात, त्यांच्यातच सामर्थ्य येते. मग म्हणता येते की त्या दर्शनी आकर्मातच कर्माचा अंतर्भाव झालेला असतो.... माझी धडपड त्याच दिशेने चालू आहे."

*अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४२.*

१५० जगातील अनेक देशांकडून जो प्रश्न विचारण्यात येत असतो आज मी विशेषतः त्याचेच उत्तर देणे पसंत करेन. तो प्रश्न अशा प्रकारचा आहे : 'तुमच्या देशात राजकीय पक्ष आपल्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता हिंसेचा दिवसेंदिवस अधिकाधिक उपयोग करत आहेत. याचे कारण आपण सांगाल ? ब्रिटीशांची सत्ता संपवण्याकरिता गत ३० वर्षांपासून अहिंसेचा ज्या पद्धतीने उपयोग करण्यात आला त्याचाच तर हा परिणाम नसेल ? अजून जगाकरिता तुमचा अहिंसेचा संदेश उपयोगी पडू शकतो काय ? प्रश्न विचारणा-यांच्या भावनेचा सारांश इथे मी माझ्या शब्दात सांगितला आहे. याच्या उत्तरात अहिंसेची नाही तर माझी स्वत:ची दिवाळखोरी मान्य केली पाहिजे. यापूर्वी मी स्पष्ट शब्दात सांगितले होते की गेली तीस वर्षे ज्या अहिंसेचा प्रयोग करण्यात येत होता ती दुर्बलांची अहिंसा होती. माझे हे उत्तर बरोबर वा पुरेसे आहे की नाही ते इतरांनाच सांगावे लागेल. यानंतर दुसरी एक गोष्टही मान्य करावी लागेल. ती म्हणजे आजच्या बदललेल्या परिस्थितीत दुबळ्यांच्या अहिंसेचा काहीही उपयोग होऊ शकत नाही. भारताच्या शूरवीरांना अहिंसेचा अनुभव नाही आहे. शूरांची अहिंसा ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे असे मी वारंवार सांगत राहिलो तर त्यामुळे फारसा लाभ होणार नाही. सातत्याने विशाल प्रमाणावर या सत्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्याची आवश्यकता आहे. जी काही ताकद आहे तिचा पुरेपूर उपयोग करून हेच करून दाखवण्याचा मी प्रयत्न करत आहे. माझी अत्यधिक पात्रताही अतिशय कमी असली तरी त्यामुळे काय होते ? भ्रमिष्टाप्रमाणे मी चुकीच्या मार्गाने तर जात नाही ? अशा प्रकारच्या निरर्थक शोधात आपल्या मागे येण्यासाठी वा या कामात सहभागी होण्याकरिता इतरांना मी का सांगावे ? हे सर्व प्रश्न विचारण्यायोग्य आहेत. या सर्वांचं माझ्याजवळ सरळ आणि स्पष्ट उत्तर आहे. माझ्या मागे या वा माझ्या कामात सहभागी व्हा असे मी कुणालाही सांगत नाही. प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपला आतला आवाज ऐकला पाहिजे. जर एखाद्या स्त्रीला वा पुरुषाला आतला आवाज ऐकू येत नसेल तर त्यांनी आपल्या पात्रतेप्रमाणे आपल्याकडून शक्य होईल ते केले पाहिजे. परंतु कोणत्याही व्यक्तीने शेळ्यामेंढ्याप्रमाणे दुस-याच्या मागे जाऊ नये.

अजून एक प्रश्न विचारला गेला आहे आणि तो सतत विचारला जात असतो : “भारत चुकीच्या मार्गाने चालला आहे असा विश्वास तुम्हांला वाटत असेल तर मग चुकीचे काम करणारांशी तुम्ही

संबंध का ठेवता ? तुम्ही एकटेच तुमच्या योग्य मार्गावरून का चालत नाही ? आणि तुमचे म्हणणे खरे असेल तर तुम्हांला सोडून जाणारे तुमचे मित्र आणि अनुयायी परत तुमचा शोध घेत तुमच्याबरोबर येतील अशी श्रद्धा तुम्हांला का वाटत नाही ?" हा अगदी योग्य प्रश्न आहे. याविरोधात मी कोणताही युक्तिवाद करण्याचा प्रयत्न करणार नाही. मी एवढेच म्हणेन की आजही माझी श्रद्धा पूर्वीएवढीच बलवत्तर आहे. शक्य आहे की काम करण्याची माझी पद्धती चुकीची असावी. आजच्या गोंधळाच्या वातावरणात आधीच ज्यांची परीक्षा झाली आहे अशी आपल्यासमोर असलेली जुनी उदाहरणेच आपल्याला मार्ग दाखवू शकतात. परंतु एका गोष्टीकडे लक्ष ठेवले पाहिजे. कुणीही जड यंत्राप्रमाणे काम करू नये. यामुळे मला सल्ला देणा-या सर्व लोकांना मी एवढेच सांगेन की तलवारीच्या धारेसारख्या अहिंसेच्या दुर्गम मार्गाशिवाय आजच्या दु:खी जगाच्या उद्धाराकरिता दुसरा कोणताही मार्ग नाही या माझ्या श्रद्धेत सहभागी व्हा आणि माझ्याबरोबर जरा धीर धरून काम करा. शक्य आहे की हे सत्य प्रस्थापित करण्यात माझ्यासारखे कोट्यवधी  लोक अपयशी होतील. परंतु हे अपयश अहिंसेच्या सनातन नियमाचे नसेल तर या कोट्यवधी लोकांचे असेल. *ह. से. २९-६-१९४७, १७७.*

१५१ माझ्या इच्छेविरुद्ध ही फाळणी झाली आहे. परंतु ज्या रीतीने ही फाळणी झाली त्या रीतीमुळे मी अधिक दुखावलो आहे. सध्याच्या दंगली शमवण्यासाठी "करो वा मरो" ची शपथ मी घेतली आहे. परमेश्वर सगळ्यांच्याच अंत:करणात वसत असल्यामुळे आणि मानव जातीची सेवा करून माझ्या जीवनातील सर्वोच्च ध्येय मी साध्य करू इच्छित असल्यामुळे माझ्या देशातील लोकांएवढेच प्रेम जगातील सर्व लोकांवर करतो. हे खरे आहे की आम्ही ज्या अहिंसेचे पालन करत होतो ती दुबळ्यांची अहिंसा होती आणि ख-या अर्थाने ती अहिंसाच नव्हती. पण लोकांसमोर मी जे ठेवले ते हे नव्हते असे मी अजूनही म्हणेन. लोक दुर्बल होते आणि त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रे नव्हती वा त्यांना सैनिकी प्रशिक्षण मिळाले नव्हते म्हणून मी माझ्या देशबांधवांना अहिंसेचे अस्त्र दिले नव्हते. उलट इतिहासाच्या अभ्यासातून मी शिकलो आहे की द्वेष आणि हिंसेचा वापर कितीही उदात्त कारणासाठी करण्यात आला तरीही असे करणारे शेवटी शांततेत विघ्न आणतात

आणि त्याच वातावरणाला ते जन्म देतात ज्याला त्यांनी विरोध केलेला असतो. करुणा आणि श्रद्धा यांचा भारताला वारसा मिळालेला आहे, याच गोष्टी भारत जगाला देऊ शकतो. साधुसंत आणि ऋृषीमुनी यांनी दिलेला तोच अमूल्य ठेवा आहे. अण्वस्त्राचा शोध लावून जगाने जो धोका स्वतःवर ओढवून घेतला आहे त्याला याद्वारेच प्रत्युत्तर देता येईल. सत्य आणि प्रेमाचे शस्त्र अमोघ आहे. परंतु त्याचे अनुयायी म्हणवणा-या आम्हा लोकांमध्ये असे काही दोष आहेत की ज्यामुळे आम्ही आजच्या आत्मघातकी संघर्षात सापडलो आहेत. त्यामुळे मी माझाच शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे." *अखेरचं पर्व ३, पृष्ठ २८४.*

१५२ “माझ्या जीवनात मी अनेक कठीण कसोटीच्या प्रसंगातून गेलो आहे. परंतु त्या सर्वात ही वेळ अतिशय कठीण आहे. मला ती आवडते. ही अग्निपरीक्षा जितकी कठीण होत जाईल तितकाच परमेश्वराशी माझा जिव्हाळ्याचा संबंध निर्माण होईल. याचा मला अनुभवसुद्धा येत आहे आणि परमेश्वरावरील माझी श्रद्धा अधिक प्रगाढ होते आहे. जोपर्यंत ती माझ्यासोबत आहे तोपर्यंत माझे कल्याणच होईल.” *अखेरचं पर्व २, पृष्ठ २८४.*

१५३ मला जर पूर्णत्व प्राप्त झाले असते तर मला वाटते की आपल्या शेजा-यांच्या - आजूबाजूच्या लोकांच्या - दु:ख आणि कष्ट यांचा मला तसा अनुभव आला नसता जसा आज येतो आहे. परिपूर्णतेच्या अवस्थेत मी त्यांचे दु:ख पाहिले असते, पाहून ती गोष्ट मी लक्षात ठेवली असती, त्यावर उपाय सुचवला असता आणि आपल्या निस्संदिग्ध सत्याच्या शक्तीच्या आधारे त्या लोकांना त्यानुसार आचरण करण्याकरिता भाग पाडले असते. परंतु अजूनही मला तेवढेच अस्पष्ट दिसत आहे जेवढे आरशातून दिसत असते. त्यामुळेच मला हळूहळू परिश्रमपूर्वक काम करून माझी गोष्ट पटवून द्यावी लागते. शिवाय यात मला नेहमीच यशही मिळत नाही. देशात असे दु:ख पसरलेले आहे की जे दूर करता येऊ शकते हे माहीत असतानाही अशा अवस्थेत मी भारतातील या कोट्यवधी लोकांबद्दल सहानुभूती बाळगली नाही, त्यांच्या सुखदु:खात सहभागी झालो नाही तर मी माणुसकीपासून घसरेन. *यं. इं. १७-११-१९२१, ३७७.*

१५४ जगासमोर मी जाहीर करू इच्छितो की - मग या विरोधात काहीही म्हटले गेले आणि पश्चिमेतील अनेक लोकांच्या आदर आणि विश्वास यांमुळे मी गमावणार असलो तरी - मी माझ्या आतील आवाजाला, हवे असल्यास तुम्ही त्याला अंतरात्मा म्हणा अथवा हवे असेल तर माझ्या स्वभावाची मूलभूत प्रेरणा म्हणा, दाबायला नको. माझ्या आत असे काही आहे की जे आपली वेदना व्यक्त करण्याची मला प्रेरणा देत आहे. ते काय आहे हे मला निश्चितपणे कळले आहे. माझ्या आतील ते तत्त्व, जे मला कधीच धोका देत नाही, आता मला सांगत आहे : "तुला एकट्याने जरी उभे राहावे लागले तरी तुला सर्व जगाविरुद्ध उभे राहावे लागेल. जग तुझ्याकडे रागावलेल्या नजरेने जरी पाहील तरी त्याची पर्वा न करता धैर्याने तुला त्या नजरेशी नजर द्यावी लागेल. तुझ्या आत वसणा-या त्या सूक्ष्म शक्तीवर विश्वास ठेव. ती सांगते आहे की मित्राला, पत्नीला, सर्वांना सोडून दे, परंतु त्या ध्येयावर अढळ राहा ज्याकरिता तू आजपर्यंत जगला आहेस आणि ज्याकरिता तू मरणही पत्करायला तयार असले पाहिजे." *मा.म.गां. १६.*

१५५ जोपर्यंत मी एकाही अन्यायाकडे अथवा दुःखाकडे दीन बनून चुपचाप पाहत राहीन तोपर्यंत माझा आत्मा संतुष्ट होण्याला नकार देत राहील. परंतु माझ्यासारख्या एका दुर्बल, अशक्त आणि दु:खी प्राण्याकरिता प्रत्येक अन्याय दूर करणे अथवा माझ्या डोळ्यासमोर होणा-या प्रत्येक अन्यायाच्या दोषातून स्वतःला मुक्त करवून घेता येणे शक्य नाही. माझ्या आतील आत्मा मला एकीकडे ओढत आहे आणि देह दुसरीकडे. या दोन्ही शक्तींच्या कार्यापासून माणूस मुक्त होऊ शकतो. परंतु ही मुक्ती हळूहळू कष्ट करूनच मिळू शकते. एखाद्या यंत्राप्रमाणे आपल्या कर्मांना बंद करून मला ती मुक्ती मिळू शकत नाही. ती तर अनासक्त भावाने ज्ञानपूर्वक कर्म केल्यानेच प्राप्त होऊ शकते. या युद्धाला निरंतर देहदमनाचे स्वरूप आले पाहिजे. त्यामुळेच माणसाचा आत्मा मुक्त होऊ शकतो. *हिं.न., २०-११-१९२१, १०६.*

१५६ जगातील सर्व धर्मापदेशकांनी दिलेल्या सत्याच्या संदेशावर माझा विश्वास आहे. माझ्या निंदकांबद्दल माझ्या मनात कधीही क्रोधाची भावना निर्माण होणार नाही आणि खुनी माणसाच्या गोळीला माझा बळी पडला तरी रामाचं नाव जपता जपता मी प्राण सोडावा अशी प्रार्थना मी

निरंतर करत असतो. माझ्यावर हल्ला करणा-याविरुद्ध माझ्या शेवटच्या घटकेला एक शब्द जरी मी उच्चारला तरी माझी पाखंडी म्हणून गणना करण्यात यावी. *अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ११७.*

१५७ माझ्यात शूराची अहिंसा आहे काय ? केवळ माझ्या मृत्यूद्वारेच ही गोष्ट स्पष्ट होऊ शकेल. जर कुणी माझा खून केला आणि मी तोंडाने खुनी माणसाकरिता प्रार्थना करत आणि ईश्वराच्या नावाचा जप करत हृदयमंदिरात त्याच्या जिवंत उपस्थितीचे भान ठेवत मेलो तर माझ्यात शूराची अहिंसा होती असे म्हणता येईल. *अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ११७.*

१५८ माझ्या सर्व शक्तीचा लोप झाल्यानंतर अपंग होऊन एखाद्या पराभूत माणसाप्रमाणे मी मरू इच्छित नाही. एखाद्या खुनी माणसाच्या गोळीने माझा अंत झाला तरी चालेल. मी त्या गोष्टीचे स्वागत करेन. परंतु अखेरच्या श्वासापर्यंत आपले कर्तव्य पार पाडत असताना मरण येणे ही गोष्टच मी सर्वात अधिक पसंत करीन. *ला. फे. ५६२.*

१५९ हुतात्मा बनण्याची मला हौस नाही. परंतु माझ्या धर्माचे रक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडत असताना मला हौतात्म्य मिळाले तर मी त्याकरिता पात्र होतो असे समजले जाईल.

*मा. म. गां. ९.*

१६० माझे प्राण घेण्याकरिता भूतकाळात अनेकदा माझ्यावर आक्रमण झाले आहेत. परंतु आजपर्यंत देवाने माझे रक्षण केले आहे आणि माझा जीव घेण्याचा प्रयत्न करणा-या लोकांना आपल्या वर्तनाचा पश्चात्ताप झाला आहे. परंतु एखादा माणूस आपण एका दुष्ट माणसाचा वध करत आहोत असे समजून माझ्यावर गोळी चालवील तर तो माणूस ख-या गांधीचा खून न करता त्याला दुष्ट दिसणा-या गांधीचा खून करील. *मा. म. गां. ९.*

१६१ दीर्घ आजाराने वा फोड वगैरे होऊन मी मरण पावलो तर लोकांच्या नाराजीचा धोका पत्करूनही तू जगाला सांग की मी ईश्वरपरायण असल्याचा माझा जो दावा होता तसा मी खरोखरी नाही. तू असे करशील तर माझ्या आत्म्याला शांती मिळेल. हेही लक्षात ठेव की कुणा माणसाने

गोळी मारून माझे प्राण घेतले, जसा की त्या दिवशी बॉम्ब फेकून माझा जीव घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, आणि मी न कण्हता त्या गोळीला तोंड दिले आणि रामनाम घेताना माझा जीव गेला तरच माझा दावा खरा असल्याचे सिद्ध होईल. (हे उद्गार २९ जानेवारी १९४८ ला गोळी लागण्याच्या २० तास आधी गांधीजींनी काढले होते.)

*अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४१७.*

१६२ मी मेल्यानंतर कोणी माझ्या शरीराची मिरवणूक काढण्याचा प्रयत्न केला तर मी निश्चितच त्याला म्हणेन की - जर मृतदेह काही म्हणू शकत असेल तर - मला यापासून मोकळे करण्यात यावे आणि जिथे मी वारलो तिथेच माझे दहन करण्यात यावं. *अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४७९.*

१६३ मी गेल्यानंतर कोणताही एक माणूस माझे पूर्ण प्रतिनिधित्व करू शकणार नाही. परंतु माझा थोडाथोडा अंश तुमच्यांतून अनेकात असेल. तुमच्यातील प्रत्येक माणूस जर ध्येयाला प्रथम आणि स्वतःला दुय्यम स्थान देईल तर माझी जागा बरीचशी भरून येऊ शकेल.

*अखेरचं पर्व, खंड ४, पृष्ठ ४३५.*

१६४ पुनर्जन्माची मला इच्छा नाही. परंतु माझा दुसरा जन्म झालाच तर अस्पृश्य म्हणून मला जन्म मिळावा अशी माझी इच्छा आहे. अस्पृश्यांच्या सुखदुःखात सहभागी होता यावे, त्यांच्या अडचणींमध्ये आणि अपमानांमध्ये वाटेकरी होता यावे आणि स्वतःला व अस्पृश्य बांधवांना त्या दयनीय स्थितीतून मुक्त करण्याकरिता प्रयत्न करता यावे म्हणून अस्पृश्य म्हणून जन्म व्हावा असे मला वाटते. *सिलेक्शन्स, २३८*

* * *